अ/3/९६3

श्री तुकाराम
नाटक.
१९०१

B
2

Register No. ... 
No 158 L. Rewarded

( शाहूनगरवासी नाटकमंडळीकरितां रचलेलें )

# श्रीतुकाराम.

( ऐतिहासिक नाटक )

---

तुकाराम तुक रामसे दोनों सेतु अभंग ॥
उनका सेतू भंग गया इनका सेतु अभंग ॥ १ ॥

## वासुदेव रंगनाथ शिरवळकर,

अभिस्टंट मास्तर पूना नेटिव इन्स्टिट्यूशन "पानपतचा मुकाबला" नाटकाचा कर्ता व "मौनयौवना", "श्रीविक्रमादित्य" भाग १ ला व २ रा, "राणा भीमदेव" या पुस्तकांच्या कर्त्यांपैकीं एक,

यांनीं रचिलें

तें

## गणेश विष्णू चिपळूणकर

यांनीं मालकाकरितां

पुणें येथें

'आर्यभूषण' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

---

सन १९०१.

किंमत १२ आणे.

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून पुस्तक छापविण्याचा, रंगभूमीवर प्रयोग करण्याचा, संगीत व भाषांतर करण्याचा वगैरे सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपलेकडे ठेविले आहेत.

हा ग्रंथ

नामदार श्रीमंत मेहेरबान सरदार

# नारायणराव बाबासाहेब घोरपडे

## सरकार, संस्थान इचलकरंजी,

यांचे

असामान्य गुणग्राहकत्व, विद्यावृद्धीविषयीं उत्कंठा,
औदार्य, प्रजेच्या कल्याणाविषयीं व शिक्षणा
विषयीं अश्रांत परिश्रम व देशभाषेच्या
उन्नतीकरितां पराकाष्ठेची कळ-
कळ, इत्यादि

## अनेक सद्गुण

मनांत आणून त्यांच्या सेवेशीं परमादरपूर्वक
त्यांच्याच परवानगीनें

## अर्पण केला आहे.

**श्रीमंतांचा नम्रसेवक**

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

THE ELEMENTS.
So mixed in him that Nature might stand up
And say to all the world, "This is a man."
SHAKESPEARE.

स्वात्मानुभव पहातां तुकाया केवळ सखाचि जनकाचा ॥
वैराग्यें डोलविला माथा जेणें मुनींद्र सनकाचा ॥ १ ॥
मोरोपंत.

तुकायासि कोठें तुकाया दिसेना। जनीं हिंडतांना तुकावा दिसेना ॥
तुकावा कसा तो चतुर्भुज जाला। निराकार ब्रह्मीं स्वरूपीं मिळाला।१।
वामन.

तुका हा तुका हा परब्रह्मरूपीं। तुकीतां तुका तूकला सस्वरूपीं ॥
तुकास्वामितें नाम वाचेंसि गातां। बहुसा निळा पावला वर्म हाता॥१॥
निळोबाराय.

ज्यानें कामक्रोधादि षड्रिपूंना बंदींत टाकलें; ज्यानें आपल्या प्रखर वैराग्यानें राजलक्ष्मीस तृणवत् मानलें; ज्यानें इंद्रियांचें दमन करून मानसानें ब्रह्मांडास कवळून धरलें; संसारसुखाला लाथ मारून ज्यानें वासनेचें बीज जाळून टाकलें; ज्यानें विषयवासनेनें जर्जर आणि त्रस्त झालेल्या जीवांना आपल्या सरल, औत्सुक्यपूरक आणि भक्तिरसानें ओथंबलेल्या, नवनीतापेक्षां मृदु परंतु विद्युत्प्राय भेदकता जिची आहे, अशा, प्रेमानें तल्लीन झालेल्या अंतःकरणापासून आपोआप बाहेर पडलेल्या वाणीनें शांत आणि चिरानंद प्रदेशांत पोहोंचविलें; ज्यानें आपल्या पवित्र आचरणानें व प्रसादयुक्त आणि स्वयंभू काव्यानें संपूर्ण भारतीय जनालाच काय परंतु ज्यांच्या राज्यावर भगवान् सविता अंतर्धान पावत नाहीं, अशा आंग्लदेशीय जनाला सुद्धां तल्लीन करून टाकलें, इतकेंच नाहीं, परंतु जो आपल्या आयुष्यक्रमांत धनद्रव्याला मृत्तिकेची उपमा देत होता, त्याचीच कवितावधु भाषांतररूपानें आंग्लदेशांतील पुस्तकालयांत विराजमान

☞ अंक २ रा. प्रवेश ४ था शेवटीं घातलेला आहे.

झाली;* ज्यानें प्रपंचाचा अनुभव घेऊन त्याग केला; ज्यानें अनुतापाच्या ज्वालेंत देहबुद्धीचें हवन केलें; अहंता आणि ममता यांचें बीज खणून काढून ज्यानें शांतीचें पाणिग्रहण केलें; हरिभक्तीचा महिमा दिगंत वाढवून ज्यानें ज्ञानाचा ठेवा जगाला उघडून दाखविला; दुर्जन आणि निंदक यांच्या संशयाचें निरसन करून ज्यानें सर्व जगाच्या उद्धाराचा मार्ग दाखविला; श्री ज्ञानेश्वरमहाराजांनीं ज्या भक्तिरूप मंदिराचा पाया घातला, नामदेवानें ज्या मंदिराचे आवाराची रचना केली, जनार्दनाच्या एकनाथानें ज्या मंदिरावर आपल्या भागवत ग्रंथाचा ध्वज उभारिला, अशा मंदिराच्या शिखरावर जो कळस होऊन बसला; ज्याला प्रयाणकालीं श्री पांडुरंगानें विमान पाठविलें; आणि जो सकल संतांना तोषवून मानवदेह घेऊन श्रीरामचंद्राप्रमाणें निजधामाला गेला; अशा श्रीतुकाराममहाराजाचें चरित्र नाटकरूपानें मार्मिक जनापुढें मांडण्यास त्याच्यासारखाच थोर मनाचा आणि कुशाग्र बुद्धीचा साधु पुरुष पाहिजे होता. परंतुः—

आणि क्षीरसिंधुचिया तटा । पाणिया येती गजघटा ।
तेथें काय मुरकुटा । वारिजत असे ॥ १ ॥
पांख फुटे पाखिरुं । तुडे तरी नभींच स्थिरू ॥
गगन आक्रमी सत्वरु । तो गरुडहीं तेथ ॥ २ ॥
राजहंसाचें चालणें । भूतळीं जालिया शहाणें ॥
आणिकें काय कोणें । चालवेंचिना ॥ ३ ॥
जी आपुलेनि अवकाशें । अगाध जळ घेपे कलशें ॥
चुळीं चूळपणा ऐसें । भरुनि न निघे ॥ ४ ॥
दिवटीच्या आंगीं थोरी । तरि ते बहुतेज धरी ॥
वाती आपुलिया परी । आणीच कीं ना ॥ ५ ॥
जी समुद्राचेनि पैसें । समुद्रीं आकाश आभासे ॥
थिल्लरीं थिल्लरा ऐसें । बिंबेचि पैं ॥ ६ ॥
जियें सागरीं जळचरें । संचरती मंदराकारें ॥

* माजी डायरेक्टर सर आलेक्‌जांडर ग्रांट्‌साहेब यांनीं प्रस्तुत कवीचे अभंग छापण्यास २४००० रुपये दिले व ते अभंग दोन भाग मिळून छापून प्रसिद्ध झाले आहेत, हेंही पुष्कळांस महशूर असेलच.

तेथ देखोनि शफरें येरें । पोहों न लाहती ॥ ७ ॥
अरुण आंगाजवळिके । ह्मणोनि सूर्यातें देखे ॥
मा भूतळींची न देखे । मुंगी काई ॥ ८ ॥ श्रीज्ञानेश्वर.

या न्यायानें अशा गहन विषयाचें आकलन करण्याचा शक्त्यनुसार प्रयत्न केलेला आहे. ज्याच्या चरित्रांत आजपावेतों या पृथ्वीच्या पाठीवर जितके महान् बुद्धिवान्, पंडित, वक्ते, तत्त्वज्ञानी ह्मणून होऊन गेले त्यांच्या तर्कशक्तीस पुरून अनंत उरलेला जो विश्वव्यापक परमेश्वर, याच्याचविषयीं अति विस्तृत विचार भरलेले आहेत, अशा विचारांचें मजसारख्या अल्पमतीकडून यथार्थ विवरण होणें परमाशक्य आहे. असो. प्रस्तुत नाटकांतील शिवाजी या पात्रासंबंधानें विशेष खुलासा करावयाचा आहे तो असाः—

" रामदासास तर शिवाजीनें आपले गुरू करून त्यांस सगळें राज्य वाहिलें होतें, व हें सुचण्यास आपल्या पदरीं भगवा झेंडा बाळगला होता, हीं गोष्ट प्रसिद्धच आहे. पण तुकारामाचा आणि त्याचा घडलेला प्रसंग सर्वांस माहीत नसेल. तो हा कीं, तुकारामाची योग्यता ऐकून शिवाजीनें त्यास आपल्या भेटीस आणण्याकरितां कारकून, घोडे, अबदागिरी वगैरे मोठा लवाजमा पाठवून दिला. पण तुकारामानें तो तसाच माघारीं लावून दिला. पुढें शिवाजी स्वतः होऊन भेटण्यास आला, आणि पुष्कळ जवाहीर नजराणा ह्मणून त्यानें तुकारामाच्या पुढें ठेवलें. पण तितक्या रत्नांच्या प्रकाशानेंही त्या जन्मविरक्त योग्याचें चित्त विरघळलें नाहीं. त्यानें त्यांचा उलटा अत्यंत तिरस्कार दाखविला." निबंधमाला.

" शिवाजीस तुकारामाची कथा ऐकण्याची अतोनात गोडी असल्यामुळें त्यानें केलेले बेत त्यास पुष्कळ वेळां तहकूब ठेवावे लागत; व एके प्रसंगीं तर तुकारामबावांच्या कीर्तनांत आसक्त होऊन राहिला असतां शत्रूची एक टोळी त्यावर छापा घालण्यास आली. पण तें त्यास अगदीं आयत्या वेळेस कळून येऊन तो तेथून युक्तीनें निसटून गेला." ग्रांट डफ.

" एके प्रसंगीं बोवांचा ब्रह्मज्ञानाच्या व संसाराच्या मिथ्यत्वाविषयींचा उपदेश शिवाजीच्या हृदयांत इतका ठसला कीं, त्यानें राज्य सोडून देऊन तो अगदीं विरक्त झाला; तेव्हां त्याची आई जिजाबाई

तुकारामाकडे जाऊन तिनें विनविल्यावरून त्यानें शिवाजीस क्षत्रियांच्या धर्मावर व्याख्यान देऊन पुनः ताळ्यावर आणला. ''

महिपतीनें केलेलें तुकारामाचें चरित्र.

वरील गोष्टीस अनुसरून प्रस्तुतच्या नाटकाची रचना केलेली आहे, तथापि यास मुख्यत्वें आधार महिपतीच्या तुकारामाच्या चरित्राचाच घेतला आहे. तुकारामबोवा हे इ. स. १६५०त वैकुंठवासी झाले, त्या वेळेस शिवाजीचें वय २२।२३ वर्षांचें होतें. म्हणजे शिवाजी केवळ अल्पवयी होता म्हटलें तरी चालेल. श्रीरामदास यांनीं शिवाजीस तारीख १२ एप्रिल सन १६४९ ईसवी रोजीं उपदेश केला. याच्यापूर्वींच जर तुकारामाचा उपदेश झाला असेल तर शिवाजी ह्मणजे केवळ बालशिवाजी, ज्याचें वय केवळ २०।२१ वर्षांचें, असाच होता.

" शिवाजीची योग्यता स्वयंसिद्ध आहे. शिवाजीचें वर्तन न्यायाचें, नीतीचें, पराक्रमाचें, स्वधर्मपरायणतेचें व परधर्मसहिष्णुतेचें होतें. दोन चारशें लढाया मारून त्यांत विजयी होणें; तीन चारशें किल्ले मैदानांत, डोंगरावर व समुद्रतीरावर बांधणें; नवीन सैन्य तयार करणें; नवीन आरमार निर्मिणें; नवे कायदे करणें, स्वभाषेला उत्तेजन देणें; स्वतः पद्यरचना करणें; सारांश स्वदेशाला सुखी करणें; ह्या लोकोत्तर कृत्यांनीं जर कोण्या पुरुषानें ह्या भूमंडलाला अक्षयीं ऋणी करून ठेवलें असेल तर तें शिवाजीनेंच होय. शिवाजीची खासगी वर्तणूक व सार्वजनिक पराक्रम इतके लोकोत्तर होते कीं, त्याच्याशीं तुलना करावयास जी जी म्हणून व्यक्ति घ्यावी ती ती या नाहीं त्या गुणानें, शिवाजीहून कमतरच दिसेल. ह्या अवतारी पुरुषाविषयीं लिहितां लिहितां समर्थ म्हणतात 'तयाचे गुण महत्वासी तुलना कैची ? यशवंत, कीर्तिवंत, सामर्थ्यवंत, वरदवंत, नीतिवंत, जाणता, आचारशील, विचारशील, दानशील, कर्मशील, सर्वज्ञ, सुशील, धर्ममूर्ति, निश्चयाचा महामेरू, अखंड, निर्धारि, राजयोगी' अशीं नानाप्रकारचीं विशेषणें रामदासांनीं शिवाजीला लाविलीं आहेत. ''

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

एवढी योग्यता शिवाजीचे अंगीं येण्यास आह्मांस असें वाटतें कीं, श्री तुकाराम आणि श्री रामदासच कारणीभूत आहेत. अध्यात्म-

ज्ञानाचें बीजारोपण शिवाजीचे हृदयसंपुटांत इतकें खोल रुजलें गेलें होतें कीं, यावज्जीव त्याच्या हातून अयोग्य कृत्य कांहींच घडून आलें नाहीं. अशा पुण्य पुरुषास अवतारी म्हणावयास काय हरकत आहे ? श्री तुकाराममहाराजांनीं क्षात्रधर्माचा उपदेश करून जर शिवाजीला संसारांत घातलें नसतें तर हिंदुपद् पादशाहीची टोलेजंग इमारत उभारली गेली असती काय ? महाराष्ट्र देशाच्या इतिहासांत केवढा फरक पडला असता बरें ? आणि आपल्यास प्रस्तुत कोल्हापूर येथील महाराजांच्या वंशवृक्षाच्या मधूर सुवासिक पुष्पांचा तरी परिमल घेण्यास सांपडला असता काय ? असो.

रामेश्वरभट, मंबाजी गोसावी, दोन्ही संन्यासी इत्यादि पात्रांची योजना महिपतीच्या वाक्याला धरूनच केलेली आहे, तथापि महिपतीचे ग्रंथांत विषयसुखाचे प्राप्तीकरितां एक स्त्री तुकारामावर आसक्त होऊन त्याच्याकडे गेली होती असें आहे, या स्त्रीचे ऐवजीं नाटकास विशेष उठावणी यावी म्हणून आम्हीं सुंदराजी या पात्राची योजना केलेली आहे.

### अभंग.

**अणुरेणुया थोकडा । तुका आकाशा एवढा ॥ १ ॥**
**गिळुनि सांडिलें कलिवर । भवभ्रमाचा आकार ॥ २ ॥**
**सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटीं ॥ ३ ॥**
**तुका ह्मणे आतां । उरलों उपकारापुरता ॥ ४ ॥**

असें जो स्वतःस म्हणतो तो सदेह वैकुंठास गेला नसेल असें कोणीं म्हणावें ? ग्रंथकाराचा जरी या गोष्टीवर सर्वथैव भरंवसा आहे, तथापि अर्वाचीन तत्त्ववेत्त्यांच्या शोधांप्रमाणें ज्याला जसें वाटेल तसें त्यानें समजावें. वैकुंठास सदेह गेल्याबद्दल आपल्याजवळ खालीं लिहिल्याप्रमाणें दाखला सांपडतो. रामेश्वरभटानें समक्ष पाहिलेली गोष्ट तो लिहितो.

### अभंग.

**पंडित वैदिक अथवा दशग्रंथी । सरी न पावती तुकयाची ॥ १ ॥**
**शास्त्रेंही पुराणें गीता नित्यनेम । वाचितां तें वर्म न कळे तया ॥ २ ॥**

मागें कवीश्वर झाले थोरथोर। कोणें कलेवर नेलें सांगा ॥३॥
ह्मणे रामेश्वर सकळिका पुसोनी। गेला तो विमानीं बैसोनिया ४

महिपती लिहितोः—

## ओव्या.

तव पुरंदरासहित सुर। नामघोषें गर्जती थोर ॥
पुष्पक प्रकाशें कोंदलें अंबर। तेजें दिनकर उणा दिसे ॥१॥
तुकया समागमें होते जन। प्रकाशें त्यांचे झांकले नयन ॥
जैसी गगनीं दिसे सौदामिन। तेव्हां झांकती नयन सर्वांचे ॥
तेवीं विमानाच्या प्रकाशें निश्चिती। सकळांची लागलीं नेत्रपातीं
तेव्हां तुका बैसोनि विमानाप्रती। वैकुंठाप्रती चालिला ॥३॥
भाविक प्रेमळ वैष्णवसंत। तयांसी निराळपंथ दिसत ॥
घंटानाद कोंदला गगनांत। गंधर्व गात नामघोषें ॥ ४ ॥
पुष्पक प्रकाश होतांचि दूर। लोक उघडोनि पाहती नेत्र ॥
तों तुका न दिसे क्षितीवर। तेव्हां शोक फार मग करिती॥५॥

## आर्या.

श्रीराम तसा गेला वैकुंठाळा सकाय हा कांहीं ॥
महिमा न भिरु करणें दुष्टांच्या यास काय हा कांहीं॥१॥

मोरोपंत.

परंधाम टाकूनि कैसा उडाला। जिवन्मुक्त होऊनि ब्रह्मीं बुडाला
जयाची तनु ब्रह्मरूपीं बुडाली। भवभ्रांति हे जाण कैसी गळाली १

वामन.

निळोबाराय याची तुकारामाच्या शिष्यवर्गांत पट्टशिष्यांत गणना आहे. त्यानें केलेल्या आरतींत तो म्हणतोः–

प्रयाणकाळीं देवें विमान पाठविलें।
कलिच्या काळामाजि अद्भुत वर्तविलें ॥
मानवदेह घेउनि निजधामा गेले।
निळा ह्मणे सकळा संतां तोषविलें ॥ १ ॥

याशिवाय कचेश्वर, विठ्ठलनाथ, शिवदिन केसरी, गोपाळबोवा, (तुकारामाचा नातु) इत्यादिकांचें म्हणणें तुकाराम सदेह वैकुंठास गेला असेंच आहे. असो.

प्रस्तुत नाटकांतील बहुतेक भाग इतिहासाला धरून आहे, परंतु क्वचित् स्थळीं नाटकाला विशेष गोडी आणण्याकरितां ग्रंथकर्त्यांस पदरची भर घालावी लागली आहे, व स्थलविशेषीं इतिहासांतील गोष्टी मागें पुढें कराव्या लागल्या आहेत.

हें नाटक आह्मीं केवळ नाट्यकलाभिज्ञ जी शाहुनगरवासी नाटक-मंडळी यांच्या गुणावर लुब्ध होऊन त्यांच्याचकरितां रचिलें आहे. आह्मीं केलेल्या कृतीचा त्यांनीं प्रेमभावानें स्वीकार केला व देशभाषेची आणखी सेवा आमचे हातून घडावी म्हणून उत्तेजनार्थ त्यांनीं आम्हांस हस्तेंपरहस्तें अनेक गोष्टींनीं मदत केली, याबद्दल आम्ही आभार प्रदर्शित करतों. आर्यभूषण छापखान्याचे मालकांनीं आमचें नाटक विशेष काळजी घेऊन फारच लवकर व मनाप्रमाणें छापून दिलें याजबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

आमचे मित्र रा. रा. गणेश विष्णू चिपळूणकर, भोरकर आणि कंपनीचे म्यानेजर, यांनीं या नाटकाची हस्तालिखित प्रत वाचून पाहत।च त्यांचा असा ग्रह झाला कीं, असें भक्तिरसानें परिप्लुत नाटक छापून त्याचा प्रसार सर्वत्र झालाच पाहिजे. ग्रंथ छापण्यास लागणाऱ्या खर्चाचा बोजा त्यांनीं सर्वप्रकारें आपल्या शिरावर घेतला, या त्यांच्या उदार कृतीबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फार फार ऋणी आहे.

ग्रंथ शेवटास जाणें हें ईश्वरकृपेचें फळ आहे. ग्रंथकर्तृत्वाचा मीपणा मिरविणें व्यर्थ होय. शेवटीं सुज्ञ वाचकांपुढें एवढेंच म्हणणें आहे कीं:—

**काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें ॥ परी त्या विश्वंभरें बोलाविलें॥**

( श्री तुकाराम. )

मुक्काम पुणें पेठ कसबा घरनंबर २१० तारिख १० सप्तेंबर, सन १९०१ इ.

**वासुदेव रंगनाथ शिरवळकर,**
ग्रंथकर्ता.

*** देशभाषेचा आभिमान बाळगणाऱ्या ज्या सद्गृहस्थांनीं आपला अमोलिक वेळ खर्च करून आम्हास अनेक तऱ्हेनें प्रस्तुत

ग्रंथ तयार करण्याचे कामीं मदत केली, व ज्यांनीं वेळोवेळीं आपली पोक्त मसलत देऊन महाराष्ट्रभाषेची अल्प सेवा आमचे हातून करून घेतली, त्यांचा मी फार ऋणी असून त्यांचीं नांवें मोठ्या आनंदानें सुज्ञ वाचकांपुढें मांडतों.

रा. ब. माधवराव केशव कुमठेकर, सेक्रेटरी म्युनिसिपालिटी पुणें.
रा. सा. विनायक सखाराम देशमुख, हेड मास्तर ठाणा हायस्कूल.
रा. सा. रामचंद्र निळकंठ इनामदार, ऑनररी माजिस्त्रेट पुणें.
रा. रा. गोपाळ रंगनाथ शिरवळकर, नाझर फ. सबजज्य कोर्ट धुळें.
,, ,, बळवंतराव लक्ष्मण ठकार, हेड मास्तर मिड्ल् स्कूल जालना.
प्रो० सदाशिव कृष्ण पिंपळखरे, पुणें.
रा. रा. विनायक त्रिंबक मोडक, पुणें.
,, ,, शंकर आत्माराम पाटकर, पुणें.
,, ,, रामचंद्र बाळकृष्ण कोनकर, पुणें.
,, ,, रामचंद्र नारायण जोशी, पुणें.

ज्या ग्रंथांच्या आधारानें हा ग्रंथ रचिला त्यांचीं नांवें:—

१. नामदार मुंबईसरकारच्या आश्रयानें कै. विष्णु परशरामशास्त्री पंडित व शंकर पांडुरंग पंडित, एम्. ए. यांनीं छापून प्रसिद्ध केलेली तुकारामबावाच्या अभंगांची गाथा.

२. तुकारामतात्या यांनीं तत्त्वविवेचक ग्रंथप्रसारक मंडळीसाठीं छापून प्रसिद्ध केलेली गाथा.

३. माडगांवकर यांनीं छापून प्रसिद्ध केलेली तुकारामाची गाथा.

४. बाळकृष्ण मल्हार हंस, वकील, इंदूर, यांनीं तुकाराम याच्या धर्मसंबंधीं व नीतिसंबंधीं उपदेशपर लिहिलेला निबंध.

५. चिपळूणकरकृत निबंधमाला.

६. कुंटे यांनीं प्रसिद्ध केलेली ज्ञानेश्वरी.

७. केरळकोकिळचे लेखकानें प्रसिद्ध केलेलीं सार्थ व सटीक ज्ञानेश्वरी.

८. राजवाडेकृत मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

९. ग्रांट डफकृत मराठ्यांची बखर.

१०. महिपतिकृत तुकारामाचें चरित्र.

वरील पुस्तककर्त्यांचा ग्रंथकार फार आभारी आहे.

# सूचना.

तुकारामाचें काम करणारे पात्रानें खालीं लिहिलेले अभंग खालीं दर्शविलेल्या प्रसंगीं ह्मणण्याकरतां आहेत.

अंक १ ला, प्रवेश ४ था. आत्मगत भाषणाचे पूर्वीं:-

**गोविंद गोविंद ॥ मना लागलिया छंद ॥ १ ॥**
**मग गोविंद ते काया ॥ भेद नाहीं देवा तया ॥ २ ॥**
**आनंदलें मन ॥ प्रेमें पाझरती लोचन ॥ ३ ॥**
**तुका ह्मणे आळी ॥ जेवी नुरेची वेगळी ॥ ४ ॥**

अंक २ रा, प्रवेश ३ रा. शिवाजीस माळ घालते वेळीं:-

**आह्मी तेणें सुखी ॥ म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ॥ १ ॥**
**तुमचें येर वित्त धन ॥ तें मज मृत्तिकेसमान ॥ २ ॥**
**कंठीं मिरवा तुळसी ॥ व्रत करा एकादशी ॥ ३ ॥**
**म्हणवा हरिचे दास ॥ तुका म्हणे मज हे आस ॥४॥**

संताचा महिमा वर्णन केल्यावर:-

**सेवीन उच्छिष्ट लोळेन अंगणीं ॥ वैष्णवाचरणीं होईन जोडा १**
**ऐसे जन्म आतां मज देई देवा ॥ आवडी हे जीवा सर्व काळ २**
**त्यांचे चरणरज येती अंगावरी ॥ वंदित ते शिरीं जाईन मागें ३**
**तुका म्हणे येथें राहिलासे भाव ॥ सकळही वाव जाणोनियां ४**

अंक ३ रा, प्रवेश २ रा. मंबाजीनें मारल्यावर:-

**न सोडीं न सोडीं न सोडीं ॥ विठोबा चरण न सोडीं ॥१॥**
**भलते जड पडो भारी ॥ जीवावरी आगोज ॥ २ ॥**
**शतखंड देह शस्त्रधारी ॥ करितां परी न भीयें ॥ ३ ॥**
**तुका म्हणे केली आधीं ॥ दृढ बुद्धी सावध ॥ ४ ॥**

अंक ४ था, प्रवेश ४ था. मनास उद्देशून आत्मगत भाषणाचे पूर्वीं:

**काय काय करितों या मना । परी नायके नारायणा ॥**
**करूं नये त्याची करी विवंचना । पतना नेऊं आदरीलें ॥१॥**

भलतियासवें धांवे सैराट। वाट आडवाट दरे दरकूट ॥
न विचारी कुडें कांहीं कपट। घात बळकट मांडियेला ॥२॥
न पुरती भ्रमणा दाही दिशा। सप्तही पाताळ आकाशा ॥
घाली उडी बळेंचि देखोनि फांसा। केलों या देशा पाहुणा ॥३॥
चेतवूनि इंद्रियें सकळ। आशा तृष्णा कल्पना काम क्रोध काळ
दुराविली शुद्धबुद्धी केली राळ। ऐसें चांडाळ अनिवार हे ॥४॥
आतां काय ऐसें करावें यासी। बहु जाचलों केलों कासाविसी
तुकयाबंधु म्हणे हृषीकेशी। धांव मज ऐसी परी जाली ॥ ५ ॥

अंक ५ वा. प्रवेश २ रा. अभंग कोरडे निघाले हें ऐकून:—

थोर अन्याय केला तुझा अंत म्यां पाहिला ॥ जनाचिया बोलासाटीं चित्त क्षोभविलें ॥ १ ॥ भागविलासी केला सीण अधम मी यातिहीन ॥ झांकुनि लोचन दिवस तेरा राहिलों ॥ २ ॥ अवघें घालूनियां कोडें तानभुकेचें साकडें ॥ योगक्षेम पुढें तुज़ करणें लागेल ॥ ३ ॥ उदकीं राखिले का कागद चुकविला जनवाद ॥ तुका म्हणे ब्रीद साच केलें आपुलें ॥ ४ ॥

कापो कोणी माझी मान सुखें पीडोत दुर्जन ॥ तुज होय सीण तें मी न करी सर्वथा ॥ १ ॥ चुकी झाली एक वेळा मजपासूनि चांडाळा ॥ उभे करोनिया जळा माजी वह्या राखील्या ॥ २ ॥ नाहीं केला हा विचार माझा कोण अधिकार ॥ समर्थासी भार न कळे कैसा घालावा ॥ ३ ॥ गेलें होऊनियां मागें नये बोलों तें वाउगें ॥ पुढिलिया प्रसंगें तुका म्हणे जाणावें ॥ ४॥

अंक ५ वा. प्रवेश ३ रा. श्री ज्ञानेश्वराची स्तुति करण्याचे पूर्वीः—

ज्ञानियांचा गुरु राजा महाराव॥ म्हणती ज्ञानदेव ऐसें तुम्हा १
मज पामरा हें काय थोरपण॥ पायींची वाहाण पायीं बरी ॥२॥
ब्रम्हादिक जेथें तुम्हां वोळगणे ॥ इतर तुळणें काय पुरे ॥ ३ ॥
तुका म्हणे नेणे युक्तीची ते खोली॥ म्हणोनि ठेविली पायीं डोई

# पात्रांची यादी.

| | |
|---|---|
| श्री तुकाराममहाराज— | देहू येथील एक प्रसिद्ध साधु. |
| जिजाई— | तुकारामाची बायको. |
| महादेव— | तुकारामाचा मुलगा. |
| काशी— | तुकारामाची मुलगी. |
| शिवाजी— | मराठ्यांच्या गादीची स्थापना करणारा. |
| जिजाबाई— | शिवाजीची आई. |
| सईबाई— | शिवाजीची बायको. |
| रंगू, गंगू | — सईबाईच्या दासी. |
| तानाजीराव, पंडितराव | — शिवाजीचे मित्र. |
| रामेश्वरभटजी, मंबाजी गोसावी, सदानंद, नित्यानंद, अनगडशा फकीर व त्याचा चेला, सुंदराजी वेश्या | — तुकारामाचा छळ करणारे. |
| गिरजाबाई— | एक अनाथ स्त्री. |
| गण्या, गोण्या | — गिरजाबाईचीं मुलें. |
| कोल्हंभट, भटंभट | — मंबाजीचे शिष्य. |

कांहीं रिसालदार, एक म्हातारा, वगैरे.

# श्रीतुकाराम.

## अंक पहिला.

### प्रवेश १ ला.

**स्थळ**–देहू येथील तुकारामाचें घर.
( जिजाई, महादेव आणि काशी बसलीं आहेत. )

**काशी**–आई, मला भूक लागली.

**महादेव**–आई, माझे प्राण भुकेनें कासावीस होत आहेत बरें ! ( गडबडा लोळतो. )

**काशी**–आई, मीं रात्रीं कांहीं खाल्लें आहे काय? तूंच सांग बरें !

**जिजाई**–अशीं सोन्यासारखीं बाळें आई आई करून पोटाला गोळाभर अन्न मागतात, पण तें सुद्धां आमच्या घरांत नाहीं. बाळांनों, आतां घरीं यावयाची वेळ झाली आहे. आतां बरोबर कांहीं तरी खावयाला घेऊन येतील. तोंपर्यंत ही मेथीची भाजी उकडून तुम्हांला घालतें; ती तुम्ही थोडी थोडी खा, पण घरांत मेलं सरपण सुद्धां नाहीं. सगळ्यापुढें उपाय चालतो, पण मेल्या या चुलखंडापुढें कांहीं शहाणपण चालत नाहीं. या मुलांनां काल-पासून अन्न नाहीं, आणि मी तर आज आठ दिवसांची उपाशी आहे. या दुष्काळांतून आह्मी वांचूं, असें कांहीं वाटत नाहीं. मेलीं शेराची धारण ! कधीं कोणीं ऐकली तरी असेल का ?

**काशी**–आई, याच्यापेक्षां चार दिवस पुण्यास अजोळीं च-लेनास ? तेथें मेली पोटाची तरी काळजी नाहीं. परवां आपण

पुण्याहून आलों त्या वेळीं आजोबा चांगलें तुला ह्मणाले कीं, जिजाई, दोन्हीं मुलें येथें ठेवून जा, पण तूं कांहीं ऐकलें नाहीं.

**जिजाई**-अगे, माहेर तें माहेर, आणि सासर तें सासर. सासरीं आपली सत्ता असते. हें कसें झालें तरी आपलें घर आहे. आज नाहीं उद्यां चांगले दिवस येतील. माहेरीं गेलें ह्मणजे भावजयांनीं कपाळाला आंठ्या घालाव्या, भावांनीं कमजास्त बोलावें, भावांच्या मुलांनीं तुमच्याशीं भांडणतंटे करावेत, त्यापेक्षां येथेंच राहिलें तर काय वाईट? परवां त्यांनीं आपल्याबरोबर गोणीभर जोंधळे दिले. पण येथें गोणी आणली, आणखी मी किंचित् बाहेर मात्र गेलें, तों गोणीभर दाणे भिकाऱ्यांनां यजमानांनीं वांटून टाकले. आपलीं मुलेबाळें उपाशीं मारतो, आणखी लोकांच्या मढ्यावर दाणे घालतो. असा बाप जगांत तरी असेल काय? पूर्वजन्मींचा सूड उगवून घेतात, आणखी दुसरें काय? (तुकाराम धोतरांत पीठ घेऊन एका बाजूनें चोरून प्रवेश करून बाजूला उभा राहतो, आणि मंबाजी गोसावी दुसऱ्या बाजूनें प्रवेश करतो.)

**मंबाजी**-आल्लक्.

**जिजाई**-मेलं भिकाऱ्यांनीं तर भंडावून सोडलें अगदीं! या मेल्या गोसावड्यांनां तर आयतीं पिठें लागतात. अजून पीठ दळून नाहीं आलें बाबा.

**मंबाजी**-क्या आम्मा, रोज पिसनेकेवास्ते देते हो? तुम बडे श्रीमान हो.

**जिजाई**-मेल्या गोसावड्या, तुलारे कशाला इतक्या पंचायती हव्यात? पीठ अजून दळून आलें नाहीं म्हटलें, आपलें चालतें झालें. आम्ही श्रीमंत असूं कीं गरीब असूं, आह्मी आमच्या घरचे.

**मंबाजी**-ऐसा नहि अम्मा. मै साधु है. कुयी गरीव होता, तो मै उस्कू आटा, चावल, रोज देता है. मै जातसे भीक मंगके लाता है. तुम गरीव हो तों मै तुमकूभी—

**महादेव**-अग आई, तूं यांनां ओळखलें नाहींस. हे आपले

मंबाजी बोवा गोसावी नव्हेत का? अहो, आमच्या घरांत मुळीं दाणेच नाहींत, तों पीठ कशाचें आलें ?

**जिजाई**–मंबाजी असो, नाहीं तर संभाजी असो. तुला कोणी सांगितली इतकी पंचाइत? चल चालता होरे डोईफोड्या येथून. मोठे मेले साधु आले आहेत. घातला एक माळेचा हायकोल गळ्यांत कीं बनले साधु.

**मंबाजी**–नही अम्मा. ओ लडका महादेव सच कहता है के तुमारे घरमे आटा नहीं. बेटा ये ले आटा.

**जिजाई**–अरे जा मेल्या भिकारड्या. आपण भीक मागतो आणखी आह्मांला पीठ आणून देतो. तुझ्यासारख्या शंभर गोसावड्यांनां जेवावयाला घालण्याचें आह्मांला सामर्थ्य आहे समजलास ? ( तुकाराम पुढें येतो. )

**तुकाराम**–हें घे पीठ. ( मंबाजीच्या तुंब्यांत पीठ ओततो. ) साधुसंतांशीं काय असें हुंबरातुंबरीला यावें. देवाच्या दयेनें आपल्याला कांहीं कमी आहे काय ? ( मंबाजी जातो. )

**जिजाई**–घातलें का त्याच्या डोंबलावर तेवढें पीठ ? आतां पोरांनां काय आपलीं हाडें खायाला घालूं ? ( तोंड वांकडें करून ) आपल्याला ह्मणें कांहीं कमी आहे काय ? सगळें घर लोकांनां देऊन देऊन जसें धुवून टाकलें. घरांत सारवायला शेणसुद्धां राहूं देत नाहींत. पूर्वजन्मीचे दावेदार आहांत. वैर साधायला मला पदरीं बांधलीत. लोकांपुढें मीं किती तरी तोंड वेंगाडावें ? आपण नदींत जाऊन बोडकें तिंबावें, गळ्यांत माळेचें लोहडणें अडकवावें, देवळांत जावें, त्या मेल्या काळ्याच्या नांवानें तोंडाची वचळी वासून टाळ कुटावेत, उदीमव्यापाराच्या नांवानें भोपळ्याएवढें पूज्य. या मेल्या संतांनां कांहीं शरम आहे का !!! मेले लाज वाटून प्याले आहेत जसे कांहीं. यांच्या बायका यांच्या नांवानें खडे फोडतात.

**तुकाराम**–आजची पूजा विशेष आहे. आज आमच्या कुटुं-

वानें नानाप्रकारचीं कमळें आह्मांला वाहण्याचा विचार केला आहे वाटतें. अगे अजून काय झालें आहे ? आतांशीं तर आरंभ आहे. अज्ञानरूपीं रात्र संपून जाऊन या तुकारामाचे अंतःकरणांत ज्ञानाचा प्रकाश किंचित् पडत चाललेला आहे. आज महापूजा बांधण्याचा विचार आहे वाटतें ? मला हवे तितकें बोल. चोर, ह्मण, दुष्ट ह्मण, टाळकुट्या ह्मण, वाटेल तें म्हण, पण त्या पांडुरंगानें तुझें काय केलें आहे ? त्याला काय ह्मणून शिव्या ?

**जिजाई**–काय म्हणून शिव्या ? लाखोली घालीन. या मेल्या काळ्याच्या नादीं लागून आजपर्यंत कोणाचें कल्याण झालें आहे ? घ्या माप पदरांत. नारदानें भक्ति केली, त्याची नारदी करून सोडली. मारुतीनें भक्ति केली, त्याला वानरचेष्टा म्हणतात. गरुडानें भक्ति केली, त्याला सापखाऊ म्हणतात. सांभानें भक्ति केली, त्याला मसणवाट्यांत नेऊन बसविला. बिभीषणानें भक्ति केली, त्याचा भाऊ रावण एवढा पराक्रमी मारून टाकला. पांडवांनीं भक्ति केली, त्याबद्दल द्रौपदीला सभेंत नग्न केलें. अंगदाचा बाप, प्रल्हादाचा बाप ठार मारले. आणखी दुसऱ्याचे दृष्टांत कशाला, माझ्या संसाराची धूळधाण केली, माझें घर घेतलें, माझा घरधनी वेडा केला. झाली का आतां मनाची खातरी ? सोडा आतां त्या काळ्याचें नांव, आणि घाला संसारांत चित्त.

**तुकाराम**–अहाहा ! काय पण उपदेशाचा परिणाम झाला या तुकारामाचे मनावर ! आतां आमची भक्तिरूपीं नांव या संसाररूपीं मृगजळाच्या डोहांत बुडून ठार झाली. वाऱ्यानें पर्वत उडून जाऊन अस्मानांत गिरकांड्या खावयास लागले. ह्या पहा वांझेच्या मुलांच्या जन्मपत्रिका पाहण्याकरितां ज्योतिष्यांच्या झुंडींच्या झुंडी लोटल्या. आकाशाला आलेलीं फुलें पोराबाळांनीं तोडून, पायाखालीं तुडवून त्यांचा चुराडा केला. इतका तुझ्या उपदेशाचा ठसा माझ्या मनावर वठला आहे. इतकीं पुराणांतलीं उदाहरणें देऊन त्यांच्यापासून हेंच सार काढलेंस वाटतें ? भस्मांत गाढव

लोळलें म्हणून त्याच्या मनाला कांहीं अनुताप होणार आहे का? या वर्गांतीलच तुमची जमा. तुमचें म्हणणें असें कीं, साप अन्न खात नाहीं म्हणजे तो आपली एकादशीच करतो, किंवा दगड बोलत नाहीं म्हणजे तो आपला योगीच बनला. पुणेकर अप्पा गुळव्याची मुलगी गोड गोड भाषणें बोलली.

**जिजाई**–हां खबरदार, माझ्या बापाचें नांव घेतलेंत तर. तुमच्या घरीं तो कांहीं पाणी भरायला आला नाहीं समजलांत? कोणीकडून तरी भांडण काढून निघून जायाला पाहिजे. शेर अच्छेर पीठ आणलें होतें विकत, तें घातलें त्या मंबाजीच्या डोसक्यावर. ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी अघळपघळ सांगतां येतात, मी सुद्धां सांगतें पाहिजे असेल तर; पण आतां या पोरांच्या पोटाची काय वाट? यांच्यापुढें मी आपले हातपाय तोडून टाकूं वाटतें खायला? तो मेला पंढरीचा काळ्या देतो आहे का आतां शेरभर दाणे? माझ्या बापाला समजलें तर तोच मात्र आणून देईल!

**तुकाराम**–कांहीं नाहीं, माझा पांडुरंगच देईल. तुझ्या बापाला तरी तोच बुद्धी देणार आहे. पांडुरंगाची भक्ति केल्यावर कांहीं कमी पडणार आहे का? चोखामेळा जातीचा महार, त्याच्या येथें पांडुरंग मेलेलीं गुरें ओढूं लागला, त्याच्या सांगत बसून जेवायला लागला. श्री ज्ञानेश्वरासाठीं निर्जीव भिंत चालविली. रेड्याचे तोंडांतून वेद बोलविले. दामाजीसाठीं महार होऊन बादशहाचे दरबारीं रसद भरली. एकनाथाच्या घरीं कावडीनें पाणी भरलें. लोक फक्त दिवटीच्या प्रकाशाची इच्छा करितात, औषधाकरितां वनस्पतीचा शोध करितात; पण आमच्या पूर्वजांनीं दिवटीच्या ऐवजीं पांडुरंगरूपीं प्रत्यक्ष सूर्यच पैदा करून ठेविला आहे, आणखी औषधांच्या ऐवजीं अमृताचें कुंडच जोडून ठेविलें आहे. त्याला तूं लाथेनें लवंडून देणार वाटतें?

**काशी**— }<br>**महादेव**– } भूक लागली.

**जिजाई**–दम धरा मेल्यांनों. मला त्या काळ्याचे पोवाडे नकोत. त्यानें कांहीं माझ्या मुलांचें पोट भरत नाहीं, समजलांत? खायला आणा, नाहीं तर त्या काळ्याच्या पायांवर हीं दोन कारटीं नेऊन त्यांचीं कपाळें आपटतें आणखी मीहि पण त्याच्या पायावर धडक घेऊन प्राण सोडतें. झक मारतो तो काळ्या.

**तुकाराम**–( तोंडांतून ) पांडुरंगाचें नांव तरी निघतें आहे का? काळ्या! काळ्या!! काळ्या!!! तुला त्याची गरज नाहीं, तर मलाही पण तुमची गरज नाहीं. हा मी चाललों. ( जाऊं लागतो, त्यास जिजाई, काशी, महादेव ओढून आणतात. )

**जिजाई**–चाललांत कोठें? तुम्हांला जाऊन देणार नाहीं. लग्न लावून नुसते मंगळसूत्राला धनी कशाला झालांत? तुम्हांला ह्या जिजाईचा स्वभाव अजून कळला आहे कोठें? आमची खाण्याची सोय लावा. आणखी मग जा त्या काळ्याच्या नांवानें ओरडायला.

**तुकाराम**–पांडुरंगा, तेरा वर्षांचा झालों नाहीं तोंच आईबापांनीं संसाराची बिडी पायांत ठोकली. दोन बायका करून दिल्या. सतरावे वर्षीं आईबाप सोडून गेले. वडील बंधूचें कुटुंब घरांत दक्ष बायको होती ती सुद्धां बिचारी वारली; बंधु विरक्त होऊन उठून गेले. त्यांचा वियोग मनाला सहन होईना. तोंच धाकटा भाऊ कान्हया पोटामागें भटकत फिरूं लागला. पुढें भयंकर दुष्काळ पडून ज्येष्ठ पत्नी, स्वभावानें अत्यंत गरीब, आणि ज्येष्ठ चिरंजीव संताजी, ज्यांच्यावर माझें अत्यंत प्रेम त्या दोघांनीं अन्न अन्न करून तडफडून प्राण सोडले. नंतर या तुकारामाचें दिवाळें निघून संसाराची वाताहात झाली. मलाहि संसाराचा वीट आला. अज्ञानरूपीं रात्र संपून गेली. ज्ञानाचा प्रकाश या हृदयांत पडूं लागला आहे. बरोबरच आहे. समुद्रमंथन केल्यावर शेवटीं जसें अमृत निघालें, किंवा शंकरानें हलाहल प्राशन केल्यानें त्याच्या सर्वांगाचा भडका झाला, आणि मग राम नाम त्यांच्या मुखीं आलें.

त्याचप्रमाणें या संसाररूपीं काळकूट विषानें या तुकारामाचे अंगाचाही डोंब झाला आहे. बरें झालें माझें दिवाळें निघालें. तशांतून या दुष्काळानें तर मजवर फारच उपकार केले म्हणायचे. सगळ्या जगांत माझी फजीती चालली आहे. सगळे लोक अपमान करीत आहेत. किती आनंदाची गोष्ट आहे बरें! सर्वांत आनंदाची गोष्ट ही झाली कीं, अशी कर्कशा बायको देऊन पांडुरंगानें माझ्या आनंदाचा कळस केला. ( जिजाईला व मुलांना बाजूला लोटून तुकाराम भांबनाथ पर्वतावर निघून जातो ).

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—देहू येथील मंबाजीचा मठ.

**मंबाजी**--तुकाराम जातीचा कुणबट, मनानें हलकट, आह्मी ब्राह्मण श्रेष्ठ, आमची लाथ प्रत्यक्ष श्रीविष्णूला सहन करावी लागली, तों इतरांची काय कथा! नुसत्या आळंदीपंढरीच्या वाऱ्या केल्या, ह्मणजे साधु बनत नाहीं. तुकाराम वाणगटाचा धंदा करीत होता. प्रत्येक धंद्यांत अक्कल पाहिजे तर त्यांत बरकत येते. तुकारामानें मिरच्याचा व्यापार केला, त्यांत कांहीं रुपये मिळाले, ते मूर्खानें एका भामट्याला देऊन त्याच्यापासून सोन्याचीं ह्मणून मुलामा दिलेलीं पितळेचीं कडीं घेऊन आला. येथें सुलाख लावण्याबरोबर गांवकऱ्यांत कोण हंशा! दुसरे खेपेस गुळाचा व्यापार केला. अडीचशें रुपये घेऊन आला. ते वाटेंत एका मालेविक्या भिकारड्याला देऊन त्याच्या गळ्यांतला नांगर काढविला. अडीचशें रुपये पाण्यांत गेले. बायको जरा श्रीमंतांची मुलगी मिळाली आहे, ह्मणून याच्या पोटाला मीठभाकर मिळते. पण तीहि आतां याच्या संगतीला कंटाळून गेली आहे. आतां तुकारामानें साधूपणाचें ढोंग माजविलें आहे. भामनाथ डोंगरावर जाऊन उपाशी

बसला आहे. आज सात दिवस झाले. आतां त्याला खावयाला कोण नेऊन देतो, तें पहातों. त्याला वाटलें हा मंबाजी बुवा बनला, आपणही बुवा बनावें. पण या मंबाजीच्या नखाची तरी तुला बरोबरी होणार आहे का? त्याची चांगली एकदां फजीती उडवायची आहे कीं, अरे गाढवाच्या लेंका, तूं जातीचा शूद्र, तुला गीता, भागवत हवें कशाला? गीता वाचीत असतो. वेदांतलीं वाक्यें अभंगांत आणण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याला निदान या देहू गांवांतून तरी हांकून दिलाच पाहिजे. येथें एका म्यानांत दोन सुऱ्या असल्याप्रमाणें झालें आहे. मी साधु आणखी तोही साधु. मला कोणी पुसेनासें झालें आहे. त्याची मात्र लब्धप्रतिष्ठा वाढत चालली आहे. ( सुंदराजी प्रवेश करिते. )

**सुंदराजी**–(त्याच्या पायां पडून) काय चाललें आहे बोवासाहेब?

**मंबाजी**––सुंदराजी, तुमची मी रात्रंदिवस सारखी वाट पहात आहें. मला कांहीं तुमच्या घरीं येतां येत नाहीं. ह्मणजे मनानें येण्याला कांहीं हरकत नाहीं. कारण शिष्याच्या घरीं जाण्याला गुरूला केव्हांही हरकत नाहीं असा शास्त्राधार आहे. पण जनलज्जेकरितां येतां येत नाहीं.

**सुंदराजी**––पण साधूंनां जनलज्जा तरी कशाला? गुरूचे पाय माझ्या घरीं लागावे, अशी रात्रंदिवस इच्छा करितें. आपण सांगितल्याप्रमाणें गुरुदक्षणेचे रुपये पंचवीस, गुरूकरितां शेलापागोटें, पंचपक्वानांचा शिधा, आणखी पूजेचें साहित्य सर्व कांहीं आणिलें आहे. त्याचा स्वीकार करावा. आणखी मला उपदेश द्यावा.

**मंबाजी**–ठीक आहे. सामान सर्व तूर्त आमच्या बिऱ्हाडीं ठेवून जा. एकादा चांगलासा दिवस पाहून तुह्मांला गुरूपदेश करूं. परंतु गुरुदक्षणा जी नुसती पंचवीस रुपये आणली आहे, तिचा तर मी स्वीकार करतोंच, परंतु त्याशिवाय आमचें एक फार नाजूक काम तुम्हीं केलें पाहिजे.

**सुंदराजी**–आपली शिष्यीण झाल्यावर कोणतेंहि काम मला

करावयाला सांगण्याचा आपल्याला अधिकारच आहे. गुरुमहाराजांची सेवा होणें ह्या कपाळीं पाहिजे.

**मंबाजी**–तुमचा स्वभाव फारच मनमिळाऊ आहे. आजपावेतों पुष्कळ आमच्या शिष्यिणी झाल्या, परंतु तुमच्यासारखी आज्ञाधारक एकसुद्धां मिळाली नाहीं. आमचें एवढें जर तुह्मीं नाजूक काम केलें, तर आम्हावर तुमचा मोठा उपकार होणार आहे. इतकेंच नाहीं पण परमेश्वरावर सुद्धां तुमचा मोठा उपकार होणार आहे.

**सुंदराजी**–पण या आज्ञेला इतके आढेवेढे कशाला? बोलण्याचा उशीर कीं केलेंच ह्मणून समजा.

**मंबाजी**–तुकारामाविषयीं तुमचें काय मत आहे?

**सुंदराजी**–बुवासाहेबांचें काय मत आहे?

**मंबाजी**–माझ्या मतें तो अगदीं ढोंगी आणखी पाजी मनुष्य आहे. या गांवचे लोक विनाकारण त्याचें स्तोम माजवीत आहेत. माझ्या मनांत त्याची चांगली फजीती करावयाची आहे. तेव्हां या कामीं तुमची योजना करावी, अशी माझी इच्छा आहे. (हळूच) तुह्मी त्याला असा नादीं लावतां कीं, मेनकेनें जसें विश्वामित्राचें कुत्रें करून त्याला आपल्यामागें नेला, तसें तुह्मी त्याचें कुत्रें करून त्याला आपल्या मागें मागें या गांवचे लोकांचे घरीं हिंडवा.

**सुंदराजी**–मग खरेंच सांगूं का? माझ्या मनांत तर ही गोष्ट आज कैक दिवस घोळत होती, त्यांतून आज या तुमच्या गुरूपदेशानें तर आतां ही गोष्ट मी फारच आनंदानें करीन. कारण स्वामीची आज्ञा सेवकाला प्रमाण. तुकाराम कदाचित् साधु असलाच, तर त्याचे सत्वाचा भंग केल्याचा दोष आतां मजकडे नाहीं.

**मंबाजी**–मी घेतों सर्व पाप आपल्या माथीं. त्याची काळजी तुह्मांला नको.

**सुंदराजी**–ठीक आहे. चांगलीशी संधि पाहून हें काम उरकून टाकतें. (रामेश्वर व दोन संन्यासी प्रवेश करितात. सुंदराजी जाते.)

**मंबाजी**–हे कोण बरें येत आहेत? हे तर आमचे रामेश्वर महाराज वाघुलीकर. हे तर केवळ प्रतिसूर्यच आहेत. यांचें सहा शास्त्रांचें अध्ययन झालेलें आहे – यावें, यावें महाराज, आपल्या आगमनानें या मंबाजीचें घर आज पवित्र झालें.

**रामेश्वर**–आपलें वर्तनच अगोदर गंगाजलाप्रमाणें शुद्ध आहे, त्यामुळें आपलें घर सर्वदां पवित्रच आहे. त्यांत आमच्या आगमनानें अधिक पवित्र तें काय होणार? हे यतिमहाराज आपल्यास भेटण्याकरितां आले आहेत.

**मंबाजी**–( एकीकडे ) बरें झालें यांची आणखी सुंदराजीची गांठ पडली नाहीं. नाहींतर या मंबाजीबुवाला पोबाराच करावा लागला असता. बाकी मीं काय, सांगून दिलें असतें आमच्या एक नातेवाईकांपैकींच आहे ह्मणून. ( उघड ) रामेश्वर महाराज आपल्या योगानें तरी या परमहंसांचें दर्शन झालें. महाराजांचें वास्तव्य कोठें असतें?

**रामेश्वर**–हे तिकडे नाशीकेंपंचवटीकडे गंगातटाकीं असतात. यांचें नांव सदानंद,–यांचें नांव नित्यानंद. उभयतांनीं मोठी खडतर तपश्चर्या केलेली आहे, त्यामुळें शरीराची कांती किती तेजःपुंज आहे पण! तुमच्या या गांवच्या तुकारामाचा लौकिक नाशकास यांचे कानावर गेला. त्याचें कीर्तन यांनीं लोहोगांवीं ऐकिलें. तुकाराम जातीचा शूद्र असून ब्राह्मणांस उपदेश करतो कीं, कर्ममार्गापेक्षां भक्तिमार्ग सोपा आहे, त्याचें अवलंबन करा. भक्तीनें ईश्वर लवकर पावतो. नामाचा महिमा अगाध आहे. नुसत्या नामानें हा भवसागर तरून जाल. आतां या कामांत कसबे पुणें येथील महाराजांचे गुरु सर न्यायाधीश जे दादोजी कोंडदेव त्यांच्याकडे यांना घेऊन जाऊन तुकारामास चांगलें शासन करण्याचा माझा इरादा आहे.

**सदानंद**–शूद्रलोकांनीं आपला धर्म सोडून जर ते ब्राह्मणधर्म बुडवूं लागले किंवा त्या धर्माची अवहेलना करूं लागले, तर

त्यांना शासन करण्याचा अधिकार आह्मांला आहे; कारण आह्मीं संन्यास धारण केला आहे.

**नित्यानंद**–तुमचे गांवचा तुकाराम जातीचा शूद्र असून वेदांतील वाक्यें कवितारूपानें जें आहे तें लोकांपुढें ह्मणून दाखवितो. "कर्मधर्म त्याचा झाला नारायण" असें म्हणतो. आज वशिष्ठवामदेवांनीं जी कर्ममार्गाची स्थापना केली आहे तिचा हा उच्छेद करण्याचा प्रयत्न करीत आहे. यास्तव याला शिक्षा झालीच पाहिजे.

**रामेश्वर**–यांचे बरोबर दादोजी कोंडदेव यांना पत्र देऊन यांना रवाना करतों. त्यांनीं यांची दाद घेऊन तुकारामास शिक्षा केली तर बरें, नाहीं तर आह्मी हें प्रकरण शिवाजीमहाराजांकडे नेऊं. त्यांनीं योग्य न्याय केला तर बरें, नाहींतर आह्मी परमपूज्य श्रीमच्छंकराचार्य यांच्याकडे जाऊन शिवाजी, दादोजी कोंडदेव, आणखी तुकाराम या त्रिवर्गांना श्रींचे दंडास पात्र करूं. वाघोलीच्या पाटलाकडून आह्मी देहूचे पाटलास ताकीदपत्र पाठवितों कीं, तुमचे गांवांतील तुकाराम आवळे, जातीचा शूद्र, यास गांवाबाहेर काढून द्यावें नाहीं तर तुमचे गांवचा व आमचे गांवचा भाईचारा राहणार नाहीं.

**सदानंद**–यानेंच बहुतेक काम होणार आहे. आतां तुकाराम प्रथम वाघुलीचे पाटलाकडे येईल. त्या वेळीं तुह्मीं तेथें जवळ असावें. तुम्हांस वाटेल तें शासन करण्यास तुम्हीं पाटलास आज्ञा करावी.

**नित्यानंद**–त्यास शिक्षा ह्मणून इतकीच कीं, त्यानें आजपावेंतों जे अभंग लिहिलेले आहेत, त्यांच्या वह्या त्यानें एक तर जाळून टाकणें, नाहीं तर इंद्रायणीचे डोहांत बुडवून टाकणें. पुनः अभंग करणार नाहीं अशी शपथ घेणें.

**रामेश्वर**–फार चांगलें. जशी श्रीपादांची आज्ञा असेल तसें करतों. मला वाटतें आपली ही शिक्षा फारच सौम्य आहे. कसें मंबाजीबोआ ?

**मंबाजी**–कांहीं तरी त्याच्या शरीराला शिक्षा झाली पाहिजे. त्याचा हात कलम केला पाहिजे. अहो, वह्या बुडवून टाकल्या किंवा जाळून टाकल्या म्हणजे त्याचें तोंड कांहीं बंद पडत नाहीं. हात टाळ वाजवितांना राहत नाहींत. चांगल्या वडग्याखालीं यथेच्छ धोपटून काढावा म्हणजे झालें. त्याला शिवाजी कशाला आणि शंकराचार्य कशाला ?

**रामेश्वर**–तें काम तुह्मी करा. तुह्मी आणखी तो एका गांवचे आहांत. वह्या बुडविण्याचें काम आह्मी करतों. चला तुमचा आमचा बेत ठरला. द्या वचन.

**मंबाजी**–हें घ्या वचन.

**नित्यानंद, सदानंद**–हें घ्या आमचें वचन.

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**–सईबाईचा रंगमहाल.

( सईबाई आपल्या दासीसहवर्तमान मोतियाचे फुलांचे गजरे करीत बसली आहे. )

**सईबाई**–काय गे रंगू, आज इतकीं थोडीं कांगे फुलें ? यांत सरकारचे दोन गजरे आणि हार कसेगे होणार ?

**रंगू**–बाईसाहेब, आज फुलें आणावयाला मी नव्हतें गेलें, गंगू गेली होती. कायग गंगे, तुला ऐकूं नाहीं कां आलें, बाईसाहेब काय ह्मणाल्या त्या ?

**गंगू**–( रंगूस दरडावून ) माझे कांहीं कान फुटले नाहींत समजलीस ? ( नम्रपणें ) बाईसाहेब, तो आपला रामजी माळी आतांशा माझें ऐकतच नाहीं. बाईसाहेब, तो किनई सरकार अंबाबाईला जावयाला लागले ह्मणजे तेवढा पुढें पुढें करितो. सरकारला मनाजोगीं फुलें देतो, आईसाहेबांना मनाजोगीं फुलें देतो. मी

मागायला गेलें कीं, मेला ह्मणतो फुल हैती कुठं? समदी फुलं गेलीं देवाला.

**रंगू**–बाईसाहेब हें एकदां सरकारचे कानावर घातलेंच पाहिजे. परवां देवाचे उत्सवाचे वेळीं सरकारांनीं त्या राम्याला एक शेत इनाम करून दिलेलें आहे, तेव्हांपासून तो फार शेफारून गेलेला आहे. आह्मी बागेंत गेलों कीं, एकदम आमच्यावर तोंड टाकितो.

**सई०**–असल्या हलक्यासलक्या गोष्टी सरकारचे कानावर मी कधींच घालीत नाहीं. अगोदर स्वारी नेहमीं स्वाऱ्याशिकाऱ्यांत गुंतलेली, त्यांतून फुरसतीअंतीं एखादे वेळीं इकडे येणार, तों आह्मीं त्यांचेपुढें कांहीं तरी रडकथा सांगत बसावें, यांत कांहींच अर्थ नाहीं. त्या माळ्याचा बंदोबस्त करावयाला सरकार कशाला पाहिजेत? त्याला एकदां ताकीद देऊं. एवढ्याशा फुलांत एक हार व दोन गजरे होणार तरी कसे? ( शिवाजी प्रवेश करतो. )

**शिवाजी**–( ऐकलेसें करून ) शहाण्यासवरत्या माणसांना माणसें ह्मणजे माणसें तीं कांहीं देव नाहींत हें का समजत नसतें? देवाच्या पूजेला धूप दीप फुलें लागतात आणि माणसाचे पूजेला एकच पुष्प पुरें असतें.

**सई०**–कां बरें, माणसें का देव नाहींत. बायकांना पतिच देव आहेत, त्यांना इतर देवतांहून नवरदेवच जास्त पूज्य आहेत.

**शिवाजी**-आपल्याला असें ह्मणावयाला थोडेच आधार सांपडतील.

**सई०**–थोडे काय ह्मणून अठरा पुराणांत बायकांनीं सार काढावयाचें तें हेंच. जागजागीं साध्वींच्या कथांतून याच गोष्टी चटकदार रीतीनें कशा पण दाखविल्या आहेत! पुराणीक बोवा वाचूं लागले ह्मणजे धर्मार्जुनांनीं, रामरावणांनीं, अहिमहींनीं, जरासंधभीमांनीं, किंवा भीष्मद्रोणांनीं केलेल्या पराक्रमाकडे इकडून पहावयाचें होतें. पण आह्मी सीता, मंदोदरी, अहिल्या, द्रौपदी, तारा, सावित्री, सुभद्रा, रुक्मिणी यांच्या कथांकडेच पाहतों. हें का

इकडे ध्यानांत येत नसेल, पण झोंपीं गेलेल्याला जागें करतां येतं. इकडे का हें समजत नसेल. आपले पुराणीकबुवा असें सांगत होते. एक दिवस सावित्रीआख्यानाची कथा पुराणांत निघाली होती. त्यावेळीं त्यांनीं असें सांगितलें कीं, बायकांचें दैवत पति. म्हणून मी ह्मणतें.

**शिवाजी**-बायकांचें दैवत पति, मग सावित्रीनें आपला पती जीवंत व्हावा ह्मणून यमाची प्रार्थना कां केली ? मग तिनें आपला पति जीवंत करावा कीं नाहीं ?

**सई०**-सर्व कांहीं इकडे कळत आहे, पण आमची उगीच परीक्षा करावयाची झालें. आह्माला बोलण्यांत अडवायचें. आह्माला कांहीं कळतच नाहीं. झालें आतां ?

**शिवाजी**-नाहीं नाहीं, मी कांहीं तशा बुद्धीनें विचारीत नाहीं. मला खरोखरच अशी शंका आली कीं, सावित्री ही जर महापतिव्रता होती, आणि स्त्रियांना पति हें जर मुख्य दैवत आहे, तर मग सावित्रीला आपल्या पतीचे प्राण वांचविण्याकरितां यमाची प्रार्थना काय ह्मणून करावी लागली ?

**सई०**-ह्मणजे असें कसें ह्मणायाचें ? सावित्री पतिव्रता होती, ह्मणून यम स्वतः आला. तिनें यमाची प्रार्थना केली, तो प्रसन्न झाला. त्यानें तिला चार वर दिले. पतिव्रता ती होती, ह्मणून तिचा पति जीवंत झाला.

**शिवाजी**-असें नाहीं. आपण थोडे चुकलांत. आपल्याला पुराणांतलें तत्त्व कळलें नाहीं. राग नका येऊं देऊं. स्त्री किती जरी महान् साध्वी झाली तरी तिला परमेश्वराचे स्वरूपाचें ज्ञान असलेंच पाहिजे. द्रौपदी मोठी पतिव्रता होती, परंतु श्रीकृष्ण परमात्म्याचे ठिकाणीं अनन्य भावानें शरण होती. त्यानेंच तिला असंख्य संकटांतून मुक्त केलें. (एक गजरा तयार करितो.)

**सई०**-तें असो. पण हा गजरा कोणासाठीं चालला आहे ?

**शिवाजी**-ह्मणजे? आपला कोणाकरितां चालला आहे?

**सई०**-मी आपला इकडच्याकरितां करितें आहें.

**शिवाजी**-मला नाहीं तुमची भाषा समजत. तूं गजरा आणि हार कोणाकरितां चालविला आहेस? तूं जसे तयार करते आहेस तसा मीही पण तयार करीत आहें. समजलीस?

**सई०**-मी सरकाराकरितां तयार करितें आहें. आतां इकडून कोणाकरितां तयार होतात तें सांगायचं व्हावं.

**शिवाजी**-तुमचे सरकार कोण? ( सईबाई शिवाजीकडे बोट करिते, तो तिला तिचा हात धरून आपले शेजारीं बसवितो. ) तसेंच आमच्या सरकाराकरितां आम्ही तयार करितों. तुमच्या सरकारापेक्षां आमच्या सरकाराला हा कितीपण शोभतो ( तिचे वेणींत गजरा घालतो. )

**सई०**-कांहीं तरी बोलावें झालें.

**रंगू**-(हात जोडून) महाराजांपाशीं थोडा अर्ज आहे. आतांशा बाईसाहेब अन्न खात नाहींत, नेहमीं आपल्या दुर्मुखलेल्या असतात. त्यांना कोणत्या गोष्टींत आनंद वाटत नाहीं. थोरल्या आईसाहेबांनीं सुद्धां पुष्कळ वेळ विचारिलें कीं, असें कां, पण कांहीं बोलतच नाहींत.

**सई०**-रंगे, तुला कोणीं इतकी पंचाईत सांगितली गे? उगीच मध्यें लुबऱ्यासारखें बोलावें? तुला कोणीं विचारलें कां होतें? मध्येंच विचारल्याशिवाय बोलूं नये. तुम्हांला कसें समजत नाहीं? ( त्यांना जाण्यास खूण करिते, त्या जातात. )

**शिवाजी**-चाकरमाणसांशीं कसें प्रेमानें वागावें! तिला वाटलें मला सांगावेंसें यांत तिची चूक आह्मांला नाहीं दिसत. त्यांची आतां येथें जरूरी नाहीं ह्मणून हळूच जायला जसें सांगितलेंस तसेंच आपल्याला शब्दांनीं खास प्रेम दाखवितां येतें. असो ह्मणा, तीं माणसें तरी आपलींच आहेत. त्यांच्यावर आपली ममता असणारच. पण रंगू आतां काय ह्मणत होती? तूं अशी उदास कां, जगदंबेच्या कृपेनें आपल्याला काय कमी आहे?

**सई०**-तिचें काय ऐकायाचें? ती आपली कांहीं तरी बोलली. मला काय झालें आहे? चांगली खातें, पितें, हिंडतें, वागतें, चांगली आहें.

**शिवाजी**-माणसांना रोगाचा प्रादुर्भाव होऊन तो वाढूं लागला, ह्मणजे त्याच्या चर्या बदलतात. मग दुसरीं माणसें त्यांना त्या रोगाच्या चिन्हांवरून तुम्हांला अमुक अमुक होत आहे, तर असें असें करा म्हणतात; पण मी ह्मणतों, चर्या बदलून रोग वाढण्याचे पूर्वीच बंदोबस्तानें जर त्याचा पाडाव केला, तर चांगलें नाहीं बरें? खरेंच पुसतों तुला काय होतें? काय वाटतें?

**सई०**-मला नाहीं कांहीं होत.

**शिवाजी**-तर मग रंगु खोटेंच का बोलली म्हणावयाची? तुला कांहीं होत नाहीं अशी शपथ वहा. (जवळ घेऊन) नाहीं पण मला कां सांगायला इतके आढेवेढे? तुला का संसाराची काळजी आहे? का राज्य कसें प्राप्त होईल याची काळजी आहे? माझ्या हातून काळजी निवारण होण्यासारखी असेल तर पाहूं. सांग सांग काय तें.

**सई०**-आतां काय करावें. तें कांहीं इकडे सांगण्यासारखें नाहीं. आणि तें माझ्याच्यानें उघड करून सांगतांही पण येणार नाहीं. उगीच आग्रह कांहीं करूं नये.

**शिवाजी**-असें आहे तर मीही पण ऐकल्याखेरीज येथून उठणारच नाहीं. मीही पण हट्टीच आहें. पाहूं आतां मी हटतों कीं तूं हटतेस?

**सई०**-सासूबाईंनां सर्व माहित आहे. आतां मला झोंप येते. मेली माणसांनीं वाट तरी किती पहावी कोण जाणें? थोडें लवकर आलें तर नाहीं चालायचें? आतां दोनप्रहर रात्र उलटून गेली. मी किनई पहिल्यानदां बोलणारच नव्हतें. अगोदर पंधरापंधरा दिवस आमची आठवणच नाहीं. आह्मीं मात्र चातक पक्षाप्रमाणें वाट पहात बसावें.

**शिवाजी**–ह्मणजे हें काय बरें विनाकारण टोंचून बोलणें ? येथें असून अशा थोर माणसाच्या भेटीला आलों नाहीं असें मला तर कांहीं वाटत नाहीं. बाकी महत्वाच्या कामकाजांत गुंतलों असलों अगर बाहेरगावीं गेलों असलों तर मात्र इलाज नाहीं. कोणीकडून तरी भांडण काढून गोष्ट उडवावयाची. मी समजलों पण.

**सई०**–गडे माझे डोळे आतां चुरचुर करीत आहेत.

**शिवाजी**–तुला झोंप येते, पण मला कोठें येते ? आईला ठाऊक आहे. तुला ठाऊक आहे. आतां मी आपला घरांत परका ह्मणायचा ? मला कांहीं समजूं नये असें तुमचें मत. किती तरी आढेवेढे ? इतके आर्जव मीं आजपर्यंत कोणाचेच केले नाहींत. खरोखर तुह्मां बायकांच्या मनांतली गोष्ट काढून घ्यावयाची ह्मणजे रेशमाची गांठ सोडण्यासारखी आहे. हं कळूंद्याच काय आहे तें एकदां कसें ?

**सई०**–आतां काय करावं ? काय तरी पण हा आग्रह. (लाजते) बरें तर सांगतें. अं ! बायका सुंदर केव्हां दिसतात ?

**शिवाजी**–नवऱ्यावर रुसल्या म्हणजे. नाहीं तर पुष्कळ डागिने घातले म्हणजे. यांत काय उघडच आहे. बायकांना डागिन्यांची हांव फार. डागिन्यांकरितां हवें तें करतील.

**सई०**–कांहीं तरी बोलावें झालें. हें कांहीं माझ्या विचारण्याचें उत्तर नाहीं. सर्व कळतें आहे. माणसाची उगीच थट्टा करायची झालें. माझ्या विचारण्याचा झोंक असा होता कीं, बायकांच्या साऱ्या जन्मांत त्यांना तेज कधीं चढतें.

**शिवाजी**–असें असें. गरोदर असतांना त्यांची रमणीयता विकास पावते. पण मला वाटतें जी सद्गुणी स्त्री कडेवर बालक घेऊन देवाला जाते ती खरी सुंदर दिसते.

**सई०**–झालें तर मग. आतां आणखी काय बाकी सांगायचें राहिलें ?

**शिवाजी**–मग तुला का मुलासाठीं खंती वाटते? त्यांत काय आहे?

ही गोष्ट कांहीं आपल्या स्वाधीनची थोडीच आहे. अन्नपाणी वर्ज केलें म्हणजे पुत्रप्राप्ति होत नसते. जगदंबेच्या कृपेनें सर्व कांहीं मनाजोगें होईल.

सई०-परवां भारतांतील जरत्कारू ब्रह्मऋषींची कथा निघाली होती. तेव्हां ज्यास संतान नसेल त्यांच्या पित्रांना गति नाहीं, त्यांचा उद्धार होत नाहीं, इतकेंच नाहीं पण वांझेचा शकूनसुद्धां घेऊं नये, असें पुराणीकबोवांचे तोंडचे शब्द ऐकून मनाला फार वाईट वाटलें. सासूबाईंनीं तर दोनचारदां माझ्याकडे पाहून मोठ्यानें उसासा सोडला. मग मेलें मला आपलें चोरट्याचोरट्यासारखें वाटूं लागलें. मुलें होणें का कोणाचें हातीं आहे ? देवानींच तीं द्यावीं अशी मनाची समजूत केली. पण हुरहुर लागली. ती कांहीं मनांतून जाईनाच. मी आणखी काय करूं ? रोज तुळसीची पूजा करितें. औदुंबराला प्रदक्षिणा घालतें. अंबाबाईची पूजा करितें .उपासतापास, नेमधर्म करितें. नाहीं म्हणायला एक साधुसंताची पूजा-अर्चा करून आशीर्वाद घ्यावा, पण आपल्या येथें साधुसंत तरी कोण येणार आहेत ? (डोळ्यांत पाणी आणून ) माझ्या कपाळीं असेल तसें होईल.

शिवाजी-(तिचे डोळे पुसून) वेडी नाहीं तर. असाध्य गोष्टींबद्दल मनाला कधींही वाईट वाटूं देऊं नये. हें बघ गोब्राम्हणांच्या, प्रजाजनांच्या आणि साधुसंतांच्या आशीर्वादानें काय होणार नाहीं ? परमेश्वराचें तेज, त्याचा चांगुलपणा, त्याची दया शांति, क्षमा, सर्वव्यापकता, इत्यादि अनंत गुणांचा आपल्या निस्सिम भक्तीनें अनुभव घेऊन आमच्यासारख्यांना हा भवसागर तरून जाण्याकरितां परमेश्वराच्या ठिकठिकाणीं उत्पन्न झालेल्या विभुति आम्हाला उपदेश करण्याकरितां त्यांच्याच रूपेनें मिळतात. आपले गुरु एक श्री रामदास. खरे साधु. ते कांहीं आपल्या हातून सेवा घेण्यास आपले घरीं येऊन राहणार नाहींत. बाकीचे साधु म्हणजे जो उठतो तो पैशाकरितां आणि बायकांकरितां साधुपणाचें ढोंग माजवितो.

अशा साधूच्या दर्शनालासुद्धां मला जाण्याचा तिटकारा आहे. परवां ज्ञानोबाचे आळंदीस मंबाजीबोवा म्हणून एक साधु देहूहून आला होता. आमच्या येसाजी निकमानें माझ्याजवळ त्याची मोठीं स्तुति केली, तेव्हां मीं त्याला शंभर रुपये त्या साधूपुढें ठेवण्यास दिले. तेवढ्यांत तृप्त न होतां उलट त्याचा असा निरोप आला कीं, सरकारांतून आह्मांस कांहीं सालीना वेतन असावें.का आहेत का नाहींत साधु ? आतां एकदां देहूकर तुकारामबुवा म्हणून आहेत त्यांचा मोठा लौकिक ऐकतों आहें. बाकी मंबाजी तर तुकारामाला शिव्याच देत होता. त्यांनां एकदां मंबाजीप्रमाणें कसाला लावून बघावयाचें आहे. पुष्कळ लोक त्यांच्या निष्कामबुद्धीचें वर्णन करितात.

**सई०**–तुकारामबोवा हे खरे साधु आहेत बरें. त्यांचा छळ करूं नका. नाहींतर आपलें कल्याण होणार नाहीं. आपल्या रंगीच्या घरीं लोहोगांवचे लोक पाहुणे आले होते. ते सांगत होते कीं, तुकारामबोवा पैशाला शिवत नाहींत. नेहमीं शांत स्वभाव. राग कसा तो ठाऊक नाहीं. ते पशुपक्षी मनुष्य स्थावर जंगम सर्वांला देवाप्रमाणें मानतात. मुखानें नेहमीं हरिनाम चाललेलं असतें. दुसरा ध्यास नाहीं.

**शिवाजी**–असें जर आहे तर त्या पुण्यपुरुषाचे दर्शनाला असाच जाणार. असेल आपले नशिबांत तर लागतील त्यांचे पाय आपले घराला. त्यांची आपण मनोभावें सेवा करूं. संताची सेवा आपले हातून घडल्यास आपल्यास महत् पुण्य जोडणार आहे. संत आणि देव भिन्न नाहींत. संताचे अवतार जगाचे कल्याणाकरितांच आहेत.

**सई०**–माझें बोलणें माझ्याच गळ्यांत आलें. मी अगोदर जर तुकारामबोवाची गोष्ट न काढते तर आतांच कशाला स्वारी निघाली असती ? उद्यां गेलें तर नाहीं का चालायचें.

**शिवाजी**–इतका माझ्या मनाला धीर नाहीं.

सई०–ह्मटलें मी येऊंका बरोबर दर्शनाला!

शिवाजी–इतक्यांत नाहीं. माझ्या मनाला अगोदर तुकारामबोवा मानवले पाहिजेत. थोड्यांत परीक्षा आहे. जवाहिरानें भरलेलें ताट पाठवितों. जर घेतलें तर मंबाजीप्रमाणेंच त्या साधूंत कांहींच अर्थ नाहीं. माझ्या मनाचे ठिकाणीं जर पूज्यभाव उत्पन्न झाला तर लागलींच आईला आणि तुला घेऊन जाईन. आतांच अडीच तीन प्रहर रात्र होऊन गेली आहे. आह्मी आतां निघालों तर उजाडावयाला देहू गांठूं. तानाजी आणि पंडितराव यांनां पुढें पाठवितों. आणि त्यांनां नकळत मागाहून मी जातों. बघूं काय मौज होते ती. आतांच जातों. जेवायला परत येतों. (जाऊं लागतो.)

सई०–( हात धरून ) पण सकाळीं का नाहीं जायचें होत? सासूबाईला विचारलें पाहिजेना?

शिवाजी–साधुसंत, देव, यांच्या दर्शनाला केव्हांही जाण्याची मला तिची नेहमींच परवानगी आहे. उलट न गेलों तर रागावते. तथापि मी आईला आतां विचारूनच जातों. ( जातो. सईबाई हिरमुसलेली उभी राहते. )

---

## प्रवेश ४ था.

स्थळ–तुकारामाचें घर.

( तुकाराम बसलेला आहे, त्याची बायको व मुलें निजलेलीं आहेत.)

तुकाराम–प्रातःकाळची वेळा किती तरी पवित्र असते! हा रामाचा प्रहर, यावेळीं बहुतकरून मन शुद्ध असतें. यावेळीं मनाला गोविंद नामाचा छंद लागला, तर ज्या तोंडानें गोविंद नामाचा उच्चार होतो तें तोंड देहाचा एक भागच असल्यानें तो देहच गोविंदरूपी बनून जाईल. असें झालें असतां या आपल्या देहांत आणि परमेश्वरांत काय भेद राहिला? पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं। जागृतीं स्वप्नीं पांडुरंग॥ अशी जर आपल्या मनाची

स्थिति झाली, तर मनापासून शरीर कांहीं वेगळें नाहीं. मनानें आपल्याबरोबर शरीरालाही ओढिलें. शरीरानें सर्व इंद्रियें ओढलीं, आणखी इंद्रियें आपला विषय विसरून गेलीं. हिलाच सहज-स्थिति ह्मणतात. तूं आपल्या मनाला जिंक. इंद्रियाचें दमन कर. म्हणजे हाच मोक्ष आहे. मोक्ष म्हणजे कांहीं देवाजवळ शेला-पागोट्याचें गांठोडें नाहीं आणि तें तुला देव देणार आहे? अज्ञानाचा नाश झाला म्हणजे मोक्षच मिळाला. कोणत्याही जातीचा मनुष्य असो, स्त्री असो, किंवा पुरुष असो, जपी, तपी, संन्यासी, विषयी, सर्वत्रांस हा तुकाराम छातीला हात लावून असें सांगतो कीं, तुह्मीं पांडुरंगाचें नाम घेतलें तर प्रत्यक्ष पांडुरंगच व्हाल. तुम्हांस घर सोडावयास नको, दार सोडावयास नको, रानांत जावयास नको, कुळधर्म कुळाचार सोडावयास नको, कोणत्याही प्रकारें श्रम कर-ण्याचें कारण नाहीं. एक पांडुरंगाचें नाम सर्व प्रकारचीं कामें क-रितें. आम्ही हा नामाचा शिक्का वैकुंठाहून घेऊन याच कामा-करितां आलों आहों. जो आमचा शिक्का मानणार नाहीं त्याचें यमाजी भास्कराचे हातून नाक कान कापले जातील. रावणानें रामनामाचा शिक्का मानला नाहीं, त्यामुळें त्याचें राज्य जाऊन त्याच्या कुळाचा नाश झाला. शंकरानें रामनामाला मान दिला, त्यायोगानें त्यानें हलाहल प्राशन केलें तरी तो सर्वांगीं शीतल झाला. उघडच आहे, मन रामीं रंगलें । अवघें मनची राम झालें ॥ (मुलांकडे पाहून) या मुलांनां बरी गाढ झोंप लागली आहे. आतां आपण इंद्रायणीला स्नानाकरितां निघून जावें, नाहींतर ही का एकदां जागीं झालीं म्हणजे खाण्याकरितां माझे लोळे तोडतील. ज्या परमेश्वरानें त्यांनां उत्पन्न केलें त्यानें खाण्याचीही तजवीज केलीच आहे. (जाऊं लागतो; इतक्यांत शिवाजीचे लोक आल्या-ची चाहूल लागते, तें पाहून एका कोपऱ्यांत आड उभा रहातो.)

**जिजाई**–(आळस देत देत) महादेव, महादेव, महाद्या, ये मेल्या महाद्या. काशी, काशे, ये रांडे काशे. मेल्यांनों उठा, तुम-

चा बाप गेलाना पळून. आतां खाल काय माझीं हाडें. तो आतां दुपारां आयता आदळायला मात्र उगवेल.

**काशी**–पण आई, तूं कसें बाबाला जाऊं दिलेंस ? आतां आम्हाला रागें भरतेस. परवां बाबा रुसून गेले, तेव्हां भामनाथ डोंगरावरून तूंच त्यांनां समजावून घरीं घेऊन आलीस, तशीच आणजा त्यांनां आतां.

**महादेव**–नुसतें बाबाला घेऊन कांहीं खावयास मिळतें वाटतें ? ते कांहीं तरी दाणेविणे आणायलाच गेले असतील. काशीलान् आईला तेवढें बाबांनीं खायला आणलें, पैसे आणले म्हणजे बाबा गोड, नाहींतर कुत्र्यासारख्या त्यांनां चावावयाला धांवतात.

**जिजाई**–का फार जीभ चुरचुर करते ? पाहिजे वाटतं चौदावं रत्न ?

**महादेव**–सकाळच्या प्रहरीं होऊन दे कीं बोहनी एकदां आतां. कांहीं बाबा जवळ नाहींत कांहीं नाहीं. हें आमचें रोजचेंच फराळाचें आहे. ( तुकाराम हांसतो, तानाजी व पंडितराव प्रवेश करितात. शिवाजी चोरून प्रवेश करतो आणि लपून बसतो. ) कोण हो तुम्ही ? तुम्ही आमचे बाबाचे दर्शनाला आलांत काय ?

**तानाजी**–बाळ, तुझा बाबा कोठें गेलारे? आम्ही त्यांच्या दर्शनाकरितां आलों आहोंत. आम्हांस शिवाजीमहाराजांनीं त्यांनां घेऊन येण्याकारितां पाठविलें आहे. त्यांचे स्वारीकरितां घोडा, अबदागीर, मशालजी, मोठा लवाजमा आमच्याबरोबर दिलेला आहे. शिवाजीमहाराजांची आम्हांस अशी आज्ञा आहे कीं, तुकाराममहाराजांस घोड्यावर बसवून वर अबदागीर धरून वाजत गाजत त्यांची स्वारी पुण्यास आणावी. आमचे सरकारास त्यांचें दर्शन घ्यावयाचें आहे.

**पंडितराव**–श्री तुकाराममहाराजांचे चरणापाशीं विनंति करून महाराजांस आमच्या सरकारांनीं ही पत्रिका दिली आहे. ही मोहोरबंद थैली व जवाहिरानें भरलेलें हें ताट, तुकाराममहाराज

यांचें खाजगत स्वाधीन करण्याविषयीं आमचे सरकारची आम्हांस सक्त ताकीद आहे.

**जिजाई**–आम्ही कोठें म्हणतों कीं, आमच्या स्वाधीन करा. आम्ही आपले चोरच आहोंत. त्यांच्याच स्वाधीन करा. पण तो पोषाख कोणाकोणाकरितां आणिला आहे,, कसला पोषाख आहे, काय काय आहे, हें तर आह्मांला पाहण्यास कांहीं हरकत नाहीं? का शिवाजीमहाराजांनीं असें सांगितलें आहे कीं, त्यांच्या प्रत्यक्ष बायकामुलांनां नुसतें दाखवूं सुद्धां नका?

**तानाजी**–दिवाणजी, बघून द्या त्यांनां. बाई तुह्मांला दाखवूं नये तर कोणाला हें जवाहीर दाखवावें? हें तुमचेंच आहे. हे पोषाख तुमचेच आहेत. फक्त तुकाराममहाराजांचे हातून तुह्मांस मिळावयाचे आहेत.

**जिजाई**–काशे, ये महाद्या; ह्या मेल्यांनीं आतां हवे तितके डागिनेच डागिने! पैसेच पैसे! आज माझ्या माहेरचा बहिरोबा आणि मंगळाई देवी हीं एकदमच पावलीं. आतां मात्र दहींभात नारळ दोनी देवाला दिलाच पाहिजे. ( तुकाराम हंसतो. )

**महादेव**–आणि आतां हीं आपल्या घरांतील, चांदीचीं भांडीं, हीं सोन्याचीं भांडीं, पार नाहींशीं करतों. चांदीचीं भांडीं! सो-न्याचीं भांडीं! ( लाथा मारमारून मडकीं फोडतो. )

**काशी**–दादा मीही पण तुला मदत करितें. ( मडकीं फोडूं ला-गते. दोघे आनंदानें उड्या मारतात.)

**जिजाई**–( अत्यंत हर्षभरित होऊन इकडे तिकडे फिरते. ) काय त्या बहिरोबाचें आणि मंगळाईचें औदार्य! धन्य आहेत माझ्या माहेरचे देव!

**महादेव**–धन्य आहे राजा शिवाजी! धन्य आहे पांडुरंग! को-ठली आणली मुंगळाई आणि बहिरोबा!! कसें ग ताई आपल्या आईला तर अगदीं वायु होण्याचा बेत आला आहे नाहींगे?

**जिजाई**–नथ, बुगड्या, मोत्यांचें पेंडें, हातांत गोठ, पाटल्या

घालून, भरजरी पैठणी नेसून, एकदां सगळ्या गांवांत सोयऱ्या-धायऱ्यांच्या घरीं जाऊन आल्याखेरीज मला कांहीं चैन पडावयाचें नाहीं. आज सारे रात्र मला कांहीं झोंप यावयाची नाहीं. ( सर्व हंसतात. )

**काशी**–पण राजा शिवाजी ह्मणतात आपल्या आईचेच स्वाधीन आहे. तेव्हां तिनेंच आज्ञा केली असेल ह्मणून ही दौलत आपलें घरीं आली आहे.

**महादेव**–पांडुरंगा, शिवाजी राजाला; त्याच्या राणीला आणखी त्याच्या आईबापाला पुष्कळ आयुष्य दे. ह्मणजे ते आम्हांसारख्या गरीबांचा असाच समाचार घेतील.

**काशी**–देवा, त्यांनां आमच्यासारखींच मुलें होवोत, म्हणजे तीं राजाशेजारीं सिंहासनावर बसतील.

**जिजाई**–कशाला छळायला वाटतें. तुम्ही छळतां कीं नाहीं मला?

**तानाजी**–मुलांनों, तुमचे तोंडांत साखर पडो. हे घ्या रुपये तुम्हांला खाऊकरितां. ( उभयतांस रुपये देतो. ) पोरगा पण अगदीं बापासारखाच होणार बरेंका दिवाणसाहेब !

**शिवाजी**–( एकीकडे ) शाबास मुलांनों ! तुम्हीं मला आयुष्य इच्छिलेंत यांत कांहीं नवल नाहीं. पण माझ्या आईबापाचें नांव तुमच्या तोंडांतून निघालें, हें पाहून मला तुमची धन्यता वाटते. या मुलांनां द्रव्य पाहून काय पण आनंद झाला आहे ? खरोखर परमेश्वरा, पैसा ही किती दुःखाची गोष्ट आहे ! याच्यापासून जीवाला काय काय अपाय होतात, याची या मुलांनां कल्पना सुद्धां नाहीं. विचारे दरिद्रानें गांजलेले आहेत. दुष्काळामुळें पोटभर अन्नसुद्धां मिळत नसेल. या बाईला तर असें झालें आहे कीं, हें जवाहीर एकदां आपल्या घरांत केव्हां जाईल. मला तर वाटतें, कीं तिच्या मनांत त्या ताटावर एकदां झडप घालून तें घरांत घेऊन जावें. द्रव्याचा लोभ फार कठीण आहे. कदाचित् माझ्याकडेसच धांवत येईल. मी येथें लपून बसलों आहें हें तानाजीला व पं-

डितरावालासुद्धां ठाऊक नाहीं. बाकी तुकोबाचे घरांत लपायला जागा विपुल! सर्व घरच्च चंद्रमौळी आहे!

**जिजाई**–पण काय हो दिवाणसाहेब, आमच्या शेजारीं ठमाबाई रहाते तिला हें जवाहीर दाखवून आणूं का? कारण आह्मांला ती फार भिकारी भिकारी म्हणत असते.

**पंडितराव**–बाई, तुह्मांला वेडबिड तर लागलें नाहींना? एकदां आम्ही तुकाराममहाराजाचे स्वाधीन हें जवाहीर केलें, म्हणजे मग तुह्मीं ठमाबाईला दाखवा कीं चिमाबाईला दाखवा.

**तुकाराम**–( एकीकडे ) पांडुरंगा, आतां मला याच्यांत कशाला गोंवतोस? अबदागीर, छत्री, घोडे, आणखी हा लवाजमा घेऊन माझ्या मनाला तिळमात्र तरी सुख वाटणार आहे काय? हे सर्व सुखाचे प्रकार माझ्यांत आणि तुझ्यांत अंतर आणतील. माझी तुझी ताडातोड करतील. मायलेंकरांची ताडातोड केल्यावर तें बालक कसें वांचेल? मानमरातब आणखी धनदौलत हीं मला श्वानाचे विष्ठेप्रमाणें आहेत. पण आमची कारभारीण पहा. स्मशानांत कावळे जसे पिंडांवर झडप घालतात, तशी तिच्या मनांत त्या ताटावर झडप घालावयाची आहे. ( जिजाई जवाहिराचे ताटावर झडप घालून पळविते, तुकाराम हाताला हिसडा देऊन ताट हिसकावून घेतो व उघड बोलतो. ) हं हात आटप. हा तुकाराम जीवंत असतां त्याच्या घरांत या संपत्तीरूपी अकाबाईचा फेरा! जिच्या नुसत्या आगमनानें घरांतल्या मडक्यागाडग्यांचा चुराडा उडाला. प्रत्येकाच्या मनांत लोभरूपी मांगानें आपला पगडा बसविला. घरांतली शांतता नष्ट झाली. आणखी या घराची पुण्यभूमि भ्रष्ट होऊन जिकडे तिकडे दाणादाण झाली. आणारे ते खाऊचे रुपये. ( रुपये हिसकावून घेतो. तानाजीकडेस वळून ) शिवाजीमहाराजांनीं आम्हांला काय अर्पण करावें! आह्मी निरिच्छ, आमचे घरीं कांहीं कमी नाहीं. शिवाजीचें देणें म्हणजे समुद्रावर पाऊस पाडणें, सुवर्णमेरूला एक ताटभर पितळेचे अलंकार अर्पण करण्याप्रमाणें

आहे. ( तानाजी व पंडितराव तुकारामाचे पायां पडतात. ) लागलीच गर्वानें फुगून जाऊन ठमाबाई चिमाबाईला डागिन्यांची ऐट दाखविण्याकारितां धांव मारलीस. तुला लाज नाहीं वाटत.

**जिजाई**–मोठे मेले सुवर्णाचे मेरु! घरांत चिमणी कोकलली तर मूठभर दाणे नाहींत. ह्मणें आम्ही समुद्राप्रमाणें तृप्त आहोंत. डागिने कांहीं तुह्मांला अंगावर घालावयाचें नाहींत, कांहीं नाहीं. तुह्मी अडकवा ते माळेचे हायकोल. मी आणखी हीं माझीं सोन्यासारखीं मुलें आम्ही घालूं ते जवाहीर अंगावर.

**तुकाराम**–मग तुझ्या अंगावर रस्त्यावरचीं कुत्रीं भुंकतील आणखी मुलें तुला खडे मारतील त्याची काय वाट?

**जिजाई**–ते डागिने परत केलेले मला माझ्या या नजरेनें पाहवत नाहींत. कारट्यांनों चलारे येथून चालते व्हा. ( दोन्ही मुलांना मारीत मारीत घेऊन जाते. )

**तानाजी**–महाराज, आमचे अन्नदाते स्वामी शिवाजीमहाराज यांनीं आपल्या चरणापाशीं अशी विनंति करावयास सांगितली आहे कीं, स्वामींनीं कृपा करून एक वेळ या दासाला चरणाचें दर्शन द्यावें. हें जवाहीर स्वामींचे चरणीं अर्पण करावयास दिलें आहे. शिवाय लवाजमा बरोबर दिला आहे, हें विनंतीपत्र दिलें आहे. ( पत्र तुकारामाचे हातीं देतो. )

**तुकाराम**–( पत्र वाचून हंसतो. ) ब्रह्मदेवानें ही सृष्टि निर्माण केली, त्यांत नाना प्रकार आणि नानाप्रकारच्या युक्ति केल्या आहेत. परंतु त्यांत शिवाजी राजे म्हणजे युक्तीचें केवळ आगरच आहेत. शिव हें नांव फार पवित्र आहे, मोठा ब्रह्मनिष्ठ असून न्यायी आहे. गुरुभक्ति करावी अशी मनांत फार इच्छा आहे. विश्वासही आहे. व्रत, नेम, तप, ध्यानयोग हीं सर्व जाणत आहे. मग आतां आमच्या दर्शनाचा मोठासा सोहळा तो काय होणार? आम्ही अरण्यवासी, उदासीन, अमंगळ, दर्शन घेण्यास अयोग्य, वस्त्रहीन, शरीर मलिन, अन्नरहित असल्यानें हे हातपाय असे

रोडावून गेलेले, असे आम्ही आहों. तेव्हां त्यांना आमची विनंति कळवा कीं, भेटीचें नांव कांहीं काढूं नका.

**शिवाजी**–( एकीकडे ) सुंदर कांता आणि सुवर्णाची रास हीं पाहून ज्याचें मन चळत नाहीं, तोच खरा विरक्त. तुकाराममहाराजांची मीं व्यर्थ कसोटी पाहिली. हें द्रव्य ते घेणार नाहींत.

**तुकाराम**–बरें, तुमच्या स्वामीजवळ येऊन आम्हीं मागावें तरी काय? आमच्या आशेचें शून्य झालेलें आहे. त्यांत पांडुरंग आमचा पालन करणारा आहे. त्यानें आम्हांस कृपाळू होऊन निराशेचा गांव जहागीर दिला आहे. त्यांना आमचा असा उपदेश सांगा कीं, तुमचे संगतीला जे दुर्जन आणि निंदक असतील, त्यांच्या युक्ति मनावर घेऊं नका. विवेक करून, राज्याचे खरे रक्षक तुमच्यासारखे कोणी असतील, त्यांचा प्रतिपाळ करावा. तूं सर्वज्ञच आहेस. अनाथाला साह्य करावें, धर्माचें रक्षण करावें. एवढें तूं केलेंस म्हणजे आम्हांस समाधान आहे. मग आमची भेट घेण्याचें कारण नाहीं. तुझी ख्याती त्रैलोक्यांत होईल. श्रीरामदासचरणीं मन अर्पण केलेंस ह्मणजे सर्वाभूतीं एकच आत्मा आहे हें तुला समजेल. मग वृत्ति चळूं देऊं नको. ह्मणजे तुझे हातून रामदास्य घडेल आणि तुला आह्मी चातुर्याचा सागर असें म्हणूं.

**शिवाजी**–( एकीकडे ) स्वामीचा एकेक शब्द माझ्या मनाला बाणासारखा लागतो आहे. मीं व्यर्थ कपट केलें आणि दुष्ट बुद्धीनें माजलेला ठाणबंदी घोडा स्वामींस बसण्याकरितां पाठविला.

**तुकाराम**–अन्न मागावें तर भिक्षा कांहीं कमी श्रेष्ठ नाहीं. वस्त्र मागावें तर रस्त्यानें चिंध्या पुष्कळ सांपडतात. पाषाणासारखा मऊ बिछाना आणि आकाशाचें प्रावरण. मग आतां आम्हांला कशाची जरूर आहे? आह्मांला येऊन काय करावयाचें आहे? हें द्रव्य घेऊन जा. तें पाहून आम्हांस किळस येते. त्याला आम्ही स्पर्श सुद्धां करणार नाहीं. त्याच्याकडे आम्ही पाहणार सुद्धां नाहीं.

प्रतिनिधि, पेशवे, सुरनीस, चिटणीस, राजाज्ञा, सुमंत, सेनापति, सर्वांना आमचे नमस्कार सांगून विनंति करा कीं, आमचे भाषणाचा मतलब विवेकानें प्रभूला समजावून सांगा. सात्विक, प्रेमळ असे दृष्टांत देऊन प्रभूचें मन पांडुरंगाच्या भक्तिमार्गाकडे वळवा. आमचे भाषणाचा अर्थ वायां जाऊं देऊं नका. भिडेकरितां शब्द गाळले तर तुह्मांस अनर्थकारक होतील. कारण शिवाजी राजे श्रीशंकराचे अंशभूत आहेत. ते सर्वत्र आहेत. येथें सुद्धां आहेत. तुम्ही आम्ही काय बोलतों हें ते ऐकतच आहेत असें समजा.

**शिवाजी**–( एकीकडे ) आतां बरीक ठीक नाहीं. आतां येथें येऊन माझा हात न धरोत, म्हणजे मिळवली. आतां येथें राहण्याची सोय नाहीं. पळा येथून आतां. ( जातो. )

**तानाजी**–स्वामीच्या आज्ञेप्रमाणें प्रभूस निरोप सांगतों.

**पंडितराव**–स्वामीस बसण्याकरितां प्रभूनीं घोडा पाठवून दिला आहे तो आह्मी येथें ठेवून जातों.

**तुकाराम**–त्या घोड्यावर तुम्हीं बसून जावें.

**तानाजी**–महाराज, तो बेफाम आहे. स्वारी होऊन देत नाहीं.

**तुकाराम**–आणा आमच्यासमोर. ( घोड्याचे अंगावर जातो. )

**तानाजी**–हं हं महाराज, तो चावेल, फार दुष्ट आहे. टापा झाडलि.

**तुकाराम**–तुझा धर्म तुला पाळला पाहिजे. ( घोड्याच्या मानेवर थोपटतो. )

**तानाजी**–दिवाणजी, तुमचा घोडा अगदीं गरीब झाला. तुकाराममहाराजांनीं गळ्याला मिठी मारतांच त्याच्या नेत्रावाटें प्रेमाश्रु गळावयास लागले. तो आपलें तेज विसरून गेला. त्याचा मीपणा नष्ट झाला. त्याचें खेंकाळणें आणि दुलाच्या झाडणें बंद पडलें. काय चमत्कार आहे ! आमच्या महाराजांनां हें फारच आश्चर्य वाटेल. कारण आजपावेतों प्रत्यक्ष महाराजांनांसुद्धां त्यानें बसूं दिलें नाहीं तों इतराची काय कथा ? ( तुकारामाचे

पायांवर तानाजी व पंडितराव मस्तक ठेवतात ) महाराज येतों आतां आम्ही.

**तुकाराम**–जेवून जा आमचे घरीं. काय कण्याभाकरी असतील त्या गोड करून घ्या. पंडितरावाकरितां ब्राम्हणाच्या घरीं शिदा देऊन स्वयंपाक करवितों.

**तानाजी**–नको महाराज आतां.सरकारांनीं आह्मांला जेवायला परत बोलाविलें आहे.

**तुकाराम**–ठीक आहे. तुम्ही सर्व शिवाजी राजाचे प्रत्यक्ष अवयवच आहांत. तेव्हां तुम्हांला अधिक काय सांगावयाचें आहे ? तुम्हीं आपल्या प्रभूचे ठिकाणीं एक भाव ठेवून स्वामिभक्ति दृढ केलीत, तर पांडुरंग तुमची कीर्ति या महाराष्ट्रांतच काय, परंतु सर्व पृथ्वींत अजरामर करील इतकेंच आमचें सांगणें आहे. ( तानाजी व पंडितराव जवाहीर घेऊन जातात. जिजाई व मुलें प्रवेश करितात. ) चला आतां आपल्या घरांत. स्वयंपाकघरांत जाऊं चला.

**जिजाई**–स्वयंपाकघरांत जाऊन चूल बघायाची आहे काय ? चांगली घर चालत आलेली लक्ष्मी लाथ मारून हाकून लावलीत, तुम्हांला कांहीं लाज वाटते का ?

**महादेव**–ताई तूं मडकीं मात्र व्यर्थ फोडलींस.

**काशी**–मीं फोडलीं कारे महाद्या ? अगोदर कोणीं फोडलीं ?

**जिजाई**–दोघांनीं मेल्यांनीं फोडलीं. कसलीं चांगलीं मडकीं पण त्यांचा कचाल केला. ( मुलांना मारते. ) आणा आतां मडकीं. आणा मडकीं.

**तुकाराम**–आणूं बरें आतां. वेळ आली म्हणजे घेऊन येऊं.

**जिजाई**–त्याचीच तर वाट पाहात आहों, पण तें येईनाना. मी मेलें एकदांची म्हणजे मोकळे झालांत.

**तुकाराम**–नाहीं पण आतांशा बरीच वाळलेली दिसतेस. आहारही पण आतां अगदीं तुटतच चाललेला आहे. अन्नद्वेष झाला आहे. पायलीभर गव्हांत फार झालें तर तीन वेळां सांजा

होतो. दहा शेर साखर आठ दिवस कशी तरी पुरते. तुला नेहमीं पोटदुखीची व्यथा असल्यानें दूधभात, साखर, तूप यांची पथ्य. मुलें सुद्धां जवळ सहन होत नाहींत. इतकें खाल्लें तरी तुला भुकेनें लहरी येतात. शरीरांतलीं सगळीं हाडें नाहींशीं झालीं. तुझें दुःख कोणी जाणत नाहीं. असल्या बायका नवऱ्याला सुद्धां खाऊन टाकायाच्या. जीवंतपणींच त्याला गाढव करायच्या आणखी मेल्यावर नरकाला न्यायच्या. पण मी कांहीं तुझ्या सपाट्यांत सांपडलों नाहीं.

**जिजाई**–( तुकारामाचा हात धरून त्यास फरफर ओढते. ) चला घरांत, पावशेर तरी दाणे आहेत का दाखवा मला. तुपसाखरेचें नांव कशाला घेतां ? चला घरांत.

**तुकाराम**–नाहीं. नाहीं. हा विनोद झाला.

**महादेव**, **काशी**–आई सोड आमच्या बाबाला. काय म्हणून त्याला फरफर ओढतेस ( सर्व घरांत जातात. )

[ अंक पहिला समाप्त. ]

# अंक दुसरा.

## प्रवेश १ ला

**स्थळ**—जंगल.

( शिवाजी प्रवेश करतो. )

**शिवाजी**–धन्य धन्य तुकाराम महाराज ! या दुर्दैवी शिवाजीच्या हातून तुकारामाची सेवा काय होणार आहे ? काय त्यांचें सत्व ! केवढा मनाचा थोरपणा ! उपदेश किती गंभीर ! विचार किती पोक्त ! पांडुरंगावर केवढा विश्वास ! संसाराविषयीं किती तरी उदासीनता ! संपत्तीचा तिट्कारा ! संसारांत असून अलिप्त ! असा साधु कोणीच झाला नसेल व पुढेंही होणार नाहीं. परमेश्वरा, अशाची संगती आह्मां मूढ जनांला रात्रंदिवस दे, यांतच मला गोडी वाटते. राज्य प्राप्त झाल्याचें सुख या संतसंगतीचे सुखापुढें तृणवत् आहे. आतां घरीं जावेंसें वाटत नाहीं. आईसाठीं घरीं जावयाचें. घरीं जाऊन तरी काय करावयाचें आहे. नित्य राज्याच्या उलाढाली, किल्ल्याला शह, आणखी लूट मिळाल्याचा हिशेब. असें करतां करतां एक दिवस राम ह्मटलें ह्मणजे झालें. पुढची तयारी कांहींच नाहीं, असो. ( लांब पाहिलेंसें करून हांसतो. ) हें गुराख्याचें पोर या गाईच्या मागें धांवतां धांवतां अगदीं थकून गेलें आहे बिचारें ! ( गोप्या प्रवेश करतो. )

**गोप्या**–( इकडून तिकडे पळत पळत ) गवळीव, व, गवळी व, व, हो, हो, हो ! कालपुन भाकर नहि. आईला आतां भाकरीच इचारल तिनं एक रपका दिला पाठीमंदी, आन् सांगितल कीं, रानामंदी भाकर घेऊन शेनी येंते म्हनुनशान. गवळी व, व. ( धांवतो व आडखळून पडतो. ) अगबया, बया, बया ! मोडला पाय ! ( रडूं लागतो. ) अग आई, आई, आई ! पोटामंदी आन नाहि, गुडग्या-

तून भळा, भळा, भळा रघत आलया. ( शिवाजी त्याला उठवितो.)

**शिवाजी**–अरेरे, गरीबाचें पोर पडलें बिचारें! बाळ रडूं नको अँ, तुला खायला देईन.

**गोप्या**–नग मला. पन दादा तुझ्या पाया पडतो तेवढी गवळी गई वळुनश्यानि आन. तो बामन लई वंगळ हय. सांची गई घरीं गेली नई तर कुत्र्यावानी मला बडवील. ( रडूं लागतो. )

**शिवाजी**–रडूं नको बाळा. ( त्याला पोटाशीं धरून त्याचे डोळे पुसतो. ) तुझ्या गाईला मी बांधून इकडे आणतों, मग तर कांहीं हरकत नाहींना ? (त्याची गाय वळवून आणण्याकरितां जातो. )

**गोप्या**–पाहार दिस आलाया. दोपार झालिया. अझून भाकर आनतीया. गन्या बरं लवकर न्येऱ्ही करतो आन् गोप्याला पाहार दिस आला म्हून काय झाल. कसा न्याव है ? राती बि भाकर नहि. बाबा गेल्यापुन लई हाल चालल्याति. ( शिवाजी प्रवेश करतो. ) लोक घोड्यावर बसूनशान शिवाजीबरोबर जात्याति. आन आह्मी म्हशीवर बसतो. थू आमची जिनगानी. आम्हाला घोड्यावर बसतां येत नाय की काय ? पन घोडा देतय कोन ? नग हा गुराख्याचा रोजगार. पण पोट जाळाव लागतना ?

**शिवाजी**–गुराख्याचा रोजगार नको, तर शिवाजीच्या पागेंत रोजगार धरीनास ? चल मी येतों तुझ्याबरोबर. तुला कोण कोण आहे रे ? तुझें नांव काय ?

**गोप्या**–माझ नांव गोप्या. माझ बाबा गेल्याला सहा महिनं झाल. तव्हांपुन आमच लई हाल चालल्याति. यंदा पाउस नहि. शेतामंदी काइ पिकल नहि. मला आई हाय, एक धाकला भाऊ गन्या म्हून हाय्. दोन बैल घरीं हायेत. आन् गईबि हाय्. तीबि कालपुन लई वंग वंग करतिया. चाराबि खात नहि, पानिबि पीत नहि. काय कराव ? काय पुसतोस दादा ? शिवाजीराजा लई मायाळु हाय् असं म्हनत्याती, पन आपल्याला कोन इचारतुया ? आम्ही गुराखी, आन् शिवाजी राजा ! गांठ पडनार कशी ?

**शिवाजी**–पण कायरे शिवाजीची आन् तुझी एकदम गांठ पडली आणखी शिवाजी खुष झाला तर तूं काय मागशिलरे? शेत मागशील, का गांव मागशील, का घोडा मागशील?

**गोप्या**–आईच्या पोटाला भाकर आन् वस्तार. काय सांगू दादा, माझा बाप मेल्यापुन माझ्या आईला निऱ्या दान्याची भाकर एक दिसबि मिळाली नाय्. दान्यामंदी कोंडा घालुनशान् माझी आई भाकर खाती. धाकल्या भावाला भाकर मागन, आन् म्यापल्याला घोड्यावर बसून लढाईला जान्याची चाकरी.

**शिवाजी**–( एकीकडे ) आईचेविषयीं इतकें प्रेम! किती मुलगा गुणवान् आहे! परमेश्वर याला कांहीं कमी करणार नाहीं. ( उघड ) पण कायरे तूं लढाई मारशील का?

**गोप्या**–शिवाजी महाराजाला खुस करन्याकरता या जिवाचं कांहीं बिका व्हइना. लढाईवर जाईन आन् दुस्मानाला या मर्दाचा हात दाखवीन. बाकी आम्ही काय कुनबी गडी. ( लांब पाहिलेंसें करून ) दादा पन ती पहा माझी आई गन्याला घेऊन हिकडच येत हाय्. आमच्या संग तूबि वाइच भाकर खाशिल का? भाकर आपली कोंड्याभोंड्याची असल. गईच दूध भाकरीसंग खायाला दील माझी आई. ( गिरजा व गण्या प्रवेश करतात. )

**गिरजा**–बसला मेला शिळोप्याच्या गोष्टी बोलत. हा एक दादा कुनी मिळाला हाय् गप्पा फाकाया. गई तिकड लोकाच्या वावरांत शिरून लोकांनीं तिला लंगडी करूं दे, म्हनजे मग तो बामन हैय् आन् तूं हयस.

**गण्या**–आई दे मला मोत्याच पेंडक. म्हणजे मी गळ्यामंदी घालुनशानी शिवाजी राज्यागत बाजारांत जाईन. दे मला पेंडक मोत्याच.

**गिरजा**–मेल्या कशाचर पेंडक आलया?

**गण्या**–ते मघाशी दादान आनल ते देतिस का नहि! ( लोळण घेतो. )

**गिरजा**-( चापट्या मारते. ) घे पेंडक. हो शिवाजी. हो राजा. घे मोत्याच पेंडक. ( गण्या रडतो. )

**शिवाजी**-गोप्या हा काय मागतोरे ? तुझा भाऊ आपल्या आईला काय मागतोयरे ? पेंडकें कसलें ?

**गोप्या**-काय इचभन लई पुदाक. गाईला पानि पाजायाला नदीवर गेलतो. तिथ एक गंठुड घावल. सोडूनशेनि पवितल तो आतमधी मोत्याच असलल पेंडक ( हातानें दाखवितो. ) आन् काचच खड कस चमचम करत्याति-इतक मोति हायाति-पघा राव. आईजवळ मुकाट्यानी नेऊनशेनी दिल. हा गन्या जवळ व्हता. आई म्हंगाली मोत्याची पेंडकी हायती. पाटलाला समजल तर कोलदांडा घालून मार देईल कुनाची तरी चोरून आणल्याती म्हुनशानी म्हनल. मंग समद गंठुड जमिनींत पुरुनशानीं ठेवलया. तेव्हां गन्या रडतोया. पेंडक घालाया मागतोया. आतां काय कराव.

**शिवाजी**-गण्या तुला पेंडक घालून काय करायचें रे ?

**गण्या**-मंग शिवाजी बर घालतो ? घालतों म्हून माझी आई सांगती. नाहीं तर दाव शिवाजी कसला हाय् तो.

**गिरजा**-तो राजा हय्. तूं मेल्या नांगऱ्या, तुला कशापायीं पेंडक हावरे ? आतां बऱ्याबोलान भाकर खातोयास का देऊं आणखीन रट्टा—दादा, मी रांडमुंड है-नवरा गमावला-खायाला नाई-आन हे एक कडच्याळ आलया गळ्यामंदी. कुनी त्यांतल एक मोतीबि जिरून देनार नाइ.

**गोप्या**-गाईच्या माग धांवता धांवता पलडों गुडघे वि फुटल. पन हा दादा लई नामी मनुक्ष हय्. यान गईला संभाळुन आनली. मी रडाया लागलों तर मला समजावल. त्या बामनाची गई लई खट्याळ. हा दादा म्हनतुया कीं तुला शिवाजीच्या पागत चाकरी देतो म्हुनशानी ( हळूच. ) त्याला वाइच भाकर खायाला दे वाईच दूधवि दे.

**गिरजा**-बरं दादा, तूं आपला या मुलाला एक धर्माचा बापच

भेटलास, वाइच चटणीभाकर खा. नग म्हनू नको. ( त्याच्या हा-तांत चटणीभाकर देते. )

**शिवाजी**–या चटणींत कांदे घातलेत होय गिरजाबाई ?

**गिरजा**–व्हय बाबा. तुला नग असली तर दुधासंग खा.

**शिवाजी**–( एकीकडे ) मी या बाईला भाकरी खात नाहीं म्हटलें तर तिला वाईट वाटेल. तिच्या मनाचा हिरमोड होईल. ( उघड ) गिरजाबाई, मी आपलें नुसतें दूधच पितों. ( तानाजी व पंडितराव प्रवेश करतात. )

**गिरजा**–बर बाबा.

**तानाजी**–सरकारची स्वारी इकडे केव्हां आली ? आणखी ही बाई वेडी तर नाहींना ? भाकरी कसली देते सरकारच्या हातांत. ( दरडावून ) ये बाई, अरे पोरांनों, बाजूला हटा इतके चिकटून कसले बसलांत. चला हटा.

**पंडितराव**–महाराज, येथून तुकारामबुवाचें घर जवळ आहे. पाहिजे असल्यास दर्शनास चलावें.

**शिवाजी**–तुमच्याबरोबर दिलेल्या जवाहिराचा तुकाराममहा-राजांनीं स्वीकार केला कीं नाहीं, किंवा तें तुम्हीं परत आणलेंत ?

**तानाजी**–मी त्यांची थोरवी काय वर्णन करूं ? सरकार, अभि-लाषबुद्धीनें आपल्या मोत्यांकडे आणि रत्नांकडेस त्यांनीं पाहिलें सुद्धां नाहीं. घोड्याचे मस्तकावर हात ठेवतांच तो गाईसारखा गरीब झाला. आपल्याला पुष्कळ उपदेश केला आहे; पण सगळा मजकूर सांगण्याच्या पूर्वी आमची महाराजांजवळ एक विनंति आहे कीं, आमचे उभयतांचे हातून एक भयंकर चूक झाली आहे.

**शिवाजी**–काय झालें ?

**तानाजी**–पंडितराव आणखी मीं उभयतांनीं विचार केला कीं, इंद्रायणीचें स्नान करून जाऊं. दोघांनीं स्नानें केलीं. धांदलींत जवाहिराचें गांठोडें नदीवर विसरलों. बरेंच लांब आल्यावर स्मरण झालें. नंतर जाऊन पहातों तों तेथें कांहीं नाहीं. आमच्या हातून

सरकारचें नुकसान झालें आहे.

**पंडितराव**–खरें म्हटलें तर चूक माझी आहे. तानाजीरावाकडे कांहीं नाहीं. सरकारांनीं मला हवी ती शिक्षा करावी, कारण जवाहीर माझ्या ताब्यांत दिलें होतें.

**तानाजी**–सरकारांनीं मलाच शिक्षा करावी, कारण लक्ष ठेवण्याचें काम माझें होतें. ( दोघे हात जोडून उभे राहतात. )

**गिरजा**–( गोप्याच्या कानाशीं लागून. ) गोप्या, मेल्या, हा शिवाजीराजा दिसतुया. आतां आपली धडगत नाहीं. आतां मला, तुला, आन् या माज्या गन्यालाबि ठार मारून टाकत्याल, ते गंठुड यांचच हय्. आतां आपन तिघबि याच्या पाया पडूं. परानदान मागूं. ( तिघे पायां पडतात. )

**गोप्या**–सरकार, मायबाप, न्याव बरोबर करा. माझा अपराध हय्. मीच ते गंठुड आईच्या हवाली केलं. मला ठार मारा. पन माज्या आईला आन गन्याला सोडुनशानी द्या.

**गिरजा**–सरकार माझा कसूर हय्. मी ते गंठुड त्याच्यापुन घेतलं. माझ्या पोरांना जित ठेवा आन् मला हाव आसल तर मारा.

**गण्या**–सरकार माझ्या आईल्यान् भावाला ठार मारूं नका. ( रडत रडत ) मग मला भाकर कोन देईल ?

**शिवाजी**–( गण्याला जवळ घेऊन ) मी देईन तुला भाकर, तुझ्या आईला देईन आणि तुझ्या भावाला पण देईन. नुसती भाकरच नाहीं देणार, पण तुला मोत्यांचें पेंडकें हवेंनारे गण्या ?

**गण्या**–आह्मांला कोन देतय गरीबाला ?

**शिवाजी**–मी देतों तुला. तानाजीराव, स्फटिकाच्या शिळेच्याच सुंदर मूर्ति घडल्या जातात. कोळशाच्या खाणींतच हिरे सांपडतात. ही इमानदार भावांची जोडी पुढें मोठाले शूर शिपाई होतील. अशीं सोन्यासारखीं माझीं देशभावंडें, यांच्यांत आणि माझ्यांत परमेश्वराच्या घरीं कांहीं तफावत असेल काय? मला वाटतें आपण देवाघरीं सर्व सारखेच आहों. देवाचे मनांत तें जवाहीर याच

मुलांना यावें असें आहे, ह्मणून तें गोप्याच्या हातीं सांपडलें. तुमच्याकडे कोणाकडेस दोष नाहीं. गिरजाबाई, आणा तें जवाहीर ह्मणजे मी आपल्या हातानें तुमच्या मुलांच्या अंगावर घालतों. ( गिरजा जाते. ) गोप्याचें आणखी गण्याचें नांव, तानाजीराव, आपल्या पागेंत दाखल करा. त्यांना कायमची तनखा सुरू ठेवा. तुम्ही दोघे रोज मला येऊन भेटत जारे. ( गिरजा गांठोडें आणते. त्यांतील मोत्यांचीं पेंडीं दोन्ही मुलांचे गळ्यांत घालतो. )

**गोप्या–** } (शिवाजीचे पायावर डोकें ठेऊन) आमच्या सरकारा-
**गण्या–** } ला शंभर वरस आवुक्ष हो.

**गिरजा**–सरकार मी गंठुड घेऊन सरकारच्या पायापाशीं येनार होते, पन आळंदीच्या गेनुबान सरकाराला हित धाडल. सरकारांनीं माझ्या दोन मुलाच जल्माच कल्यान केल. सरकारच्या पायाची मी वहाण हाय. सरकाराला रामलक्षुमनापरमान दोन पराकरमी मुलग व्हत्याल. ( शिवाजी हंसतो. )

**तानाजी**–सरकार, आईसाहेब आतां वाट पहात असतील, त्यांच्या दर्शनाला चलायाचेंना ?

**शिवाजी**–चलारे मुलांनो आमच्या आईकडे. तुम्हांला पाहून आमच्या आईला फार आनंद होईल. ( दोन्ही हातांत दोन मुलगे घेऊन जातो. पंडितराव व तानाजी एकमेकांचे हात धरून जातात व त्यांचे मागून गिरजा जाते. )

---

## प्रवेश २ रा.

स्थळ–पुणें शहरांतील शिवाजीमहाराजांच्या
वाड्यांतील दिवाणखाना.

( जिजाबाई, सईबाई, गंगू, रंगू, चाकर वगैरे बसले आहेत. )

**जिजाबाई**–आज तीन दिवस झाले, डोळ्याला डोळा नाहीं. शिवाजी माझें दर्शन घेतल्याखेरीज एक दिवस अन्न खायचा नाहीं. त्या दिवशीं एकदां तुकारामबुवांचं दर्शन घेऊन येतों ह्म-

णून गेला तो दर्शन न घेतांच परत आला. मग मनाला तळमळ लागली. आतां फिरून उभाउभीं तुकाराममहाराजांचें दर्शन घेऊन येतों ह्मणून गेला. मेलं देहू तें काय, फार झालें तर प्रहराचा रस्ता. तानाजी आणखी पंडितराव यांना काय समाचार आहे तो काढून आणा ह्मणून पाठविलें, पण तेहि तिकडेच. काय करावें माणसानें ? घरचीं माणसें नेहमीं विजापुरास. त्यांना कांहीं काळजी आहे का ? वर्षांतून आठचार दिवस इकडे आले ह्मणजे झालें. का मोंगलांनीं कांहीं कारस्थान करून विजापुरास धरून नेला, का काय, समजावें तरी काय ?

**सईबाई**–अशी काय वेडीवाकडी कल्पना आपण मनांत आणावी ? जगदंबेच्या कृपेनें कांहीं वांकडें होणार नाहीं. पण सासूबाई, आपल्या हें ध्यानांत आलें का, कीं तानाजीराव आणखी पंडितराव यांनीं जवाहीर आणि घोडा तुकारामाला न देतां परत आणल्यापासून हिकडे मनाला सारखी हुरहुर लागली होती ? कोणाजवळ बोलून दाखविणें झालें नाहीं. मग आपल्याजवळ कांहीं बोलणें झालें असल्यास नकळे.

**जिजाबाई**–मला इतकेंच ह्मणाला कीं, आई, तुकाराममहाराजांनीं घोडा, अबदागीर, जवाहीर यांचा कांहीं स्वीकार केला नाहीं. जो घोडा पूर्वीं नुसतें जीनसुद्धां चढवून देत नव्हता तो अगदीं गाईसारखा गरीब झाला आहे. याच्यावरून तुकाराममहाराज हे खरोखर विरक्त आहेत. साधु आहेत. त्यांचे दर्शनाला जाण्याची माझ्या मनाला तळमळ लागली आहे. त्यांच्या चरणाचें दर्शन घेऊन येतों. असें ह्मणून माझी आज्ञा घेऊन गेला. आज जर माझा बाळ परत आला नाहीं, तर मी कांहीं अन्न घेणार नाहीं. मी जेवायला उशीर केला कीं, ती गिरजा आणखी तिचीं दोन मुलें कांहींच खात नाहींत. फार गरीब दोन्हीं मुलें. दुपारीं मी देहूला स्वतःच जाईन म्हणतें. तुह्मी घरीं सगळा बंदोबस्त ठेवा. संभाळा.

**सईबाई**–हो पण, मला कोणीं संभाळावें ? अगोदर तिकडे जाणें झालेंच आहे. आपण गेल्यावर मीं पोरीनें इथें काय करावें ? राज्यप्रकरणीं कोणते वेळेस काय भानगड होईल याचा कांहीं नियम नसतो. मी आपली काळजी करूं कीं, येथील व्यवस्था ठेवूं ? माझ्या मनाला तरी स्वस्थता पाहिजेना ? सारखी मला तळमळ लागली आहे. ( डोळ्यांस आंसवें आणून ) मी कांहीं इथें घटकाभरसुद्धां पाणी प्यायला राहावयाची नाहीं. मी आपल्या-बरोबर येतें.

**जिजाबाई**–( तिला जवळ घेऊन ) वेडी नाहीं तर ! तुला रडायला काय झालें ? अगदीं मुलगी कोवळ्या मनाची ! शिवाजी महिना महिना स्वारीला नाहीं का जात ? मग आतां तर तुकाराम-महाराजांचे दर्शनास गेला आहे. तूं पक्कें समज कीं, साधूचे दर्शनापासून कल्याणच होईल. त्यांच्या प्रसादानेंच आपल्यास हे दिवस आले. त्यांच्या प्रसादानेंच आपण राज्यवैभवाला चढूं, आणि त्यांच्या कृपेनेंच दोन मुलेंबाळें दृष्टीस पडतील. तूं चांगली धूर्त मुलगी आहेस, तुला अधिक काय सांगावें ?

**रंगू**-पाहिलेंस का गंगे ? नाहीं तर आपल्या सासवा ! अगोदर सून सून करितात, आणखी मग एकदां सून हाताखालीं आली कीं लागल्या फुण फुण करायाला.

**गंगू**-खरेंच ग बाई, कांहीं पुसूं नकोस. त्यांतून माझ्या सासू-सारखी सासू तर त्रिभुवनांत नसेल. पण इकडे पाहिलें का, अगदीं पोटच्या मुलीप्रमाणें जवळ घेऊन तोंडावरून हात फिरवीत आहेत तें ? बाईसाहेब नशीबाच्या खऱ्या !

**जिजाबाई**–रंगे, गंगे, मुलीला नीट संभाळा. तिच्या मनाला देवाधर्माच्या गोष्टी सांगून करमणूक करीत जा. बहुतकरून शिवाजीला घेऊन मी आज उद्यां परत येतें. ( सर्व उभे रहातात. )

**सईबाई**-जा गडे. मेलें हें काय पण, मला नाहींका तुकाराममहाराजांच्या दर्शनाची इच्छा ? माझ्या मनांत आपल्याबरोबर

दर्शनाला येण्याचें आज किती दिवसांपासून आहे पण? आतां अनायासाच योग आला आहे. आपल्याबरोबर मी आलें ह्मणजे मला कोणी रागें भरणार नाहीं कांहीं नाहीं. होय कीं नाहींगे रंगे?

**रंगू**-हो आईसाहेब, बाईसाहेब ह्मणतात तें खरें आहे, जोडीनें तुकोबाच्या पायां पडावें असें त्यांच्या मनांत आहे, ह्मणजे ते आशीर्वाद देतील.

**जिजाबाई**-काय हट्टी मुली आहेत? बरें चला, करा तयारी. गंगे तूं जाऊन येसाजी निकमाला माझा निरोप कळीव कीं, आह्मी तुकाराममहाराजांचे दर्शनाकरितां देहूस जात आहों. मेण्यांची आणखी घोडेस्वार कांहीं आडहत्यारी आमच्याबरोबर पाठविण्याची तयारी ठेवा. स्नानाकरितां आम्ही इंद्रायणीवर जाणार. तसेंच तुकोबाला पोषाख, त्यांच्या बायकोस चोळीलुगडें बरोबर असूंद्या. ते जरी स्वीकार करणार नाहींत तरी आपलें नेण्याचें काम आहे. तिथें सुवासिनींला वांटायला लुगडीं चोळ्या लागतील त्या बरोबर घ्या. मी जातें आतां, दरबारची सर्व व्यवस्था लावतें. तुह्मी लवकर आटपा. (जाते.)

**गंगू**-बाईसाहेब, आईसाहेब जर म्हणाल्या कीं मीं नाहीं तुम्हाला बरोबर आणलं तर मग सरकार तुम्हाला रागें भरतील.

**सईबाई**-हं हं! तर तर! सासूबाई बरोबर असल्यावर माझ्याकडे पाहील कोण? मग बोलायची गोष्ट तर लांबच आहे. तूं नेहमीं पहात आहेस म्हणून बरें आहे.

**रंगू**-तसें नाहीं बाईसाहेब, सरकार आईसाहेबांच्या देखत जरी कांहीं नाहीं बोलले, तरी इथें आल्यावर तुह्मांला रागें भरतील कां आलांत ह्मणून?

**सई०**-तुह्मी आहांत मग साक्षीदार. सासूबाई चल ह्मणाल्या ह्मणून आलें. माझ्याकडे काय आहे? सासूबाईला विचारणें व्हावें. असें मी बोलेन.

**गंगू**-आपण नाहीं बाई खोटी साक्ष देणार. आपल्या कानीं

सात बाळ्या. ( कानावर हात ठेवते. ) सरकाराजवळ मुळीं खोटें बोलतांना जीभ अडखळते, आणखी खरें कायतें बाहेर पडतें.

रंगू–हें मात्र अगदीं खरें. आपणही बाई खोटें नाहीं बोलणार.

सई०–मग कशाला शेण खायला बोललीस ? कीं "हां आईसाहेब बाईसाहेब ह्मणतात तें खरें. जोडप्यानें बाईसाहेबांच्या मनांत तुकोबांच्या पायां पडावें असें फार आहे."

रंगू–मग आपण खुणावलत ह्मणून ह्मटलें. आपल्या मनांत खरोखरच जोडीनें पायां पडावयाचें असेल ह्मणूनच मघांशीं मला खुणावलीत आणखी म्हणूनच मीं म्हटलें हो.

सई०–तुम्ही चाकर कोणाच्यागे ? माझ्या कीं कोणाच्या ?

रंगू }
गंगू }–सरकारच्या पायाच्या.

सई०–अस्सं काय ? बरें मी तुह्माला रजा देतें. येऊं नका माझ्याबरोबर देहूला. ( रागावून जाऊं लागते. )

रंगू– }
गंगू– } बरें नाहीं बाईसाहेब, चुकलों.

सई०–आतां थट्टा करायची हीच वेळ आहे नागे ? आतां चला लवकर तयारी करा. निघा येथून. ( रंगू व गंगू जातात. ) कधीं आह्मांला बायकाला बरोबर न्यायचें नाहीं. सासूबाईबरोबर आलें असें पहातांच मोठें आश्चर्य वाटेल. पुण्याला परत येईपर्यंत एक शब्द सुद्धां बोलणें व्हायचें नाहीं. पण मग काय ताशेरा झाडणें होईल तें होवो. मी आपली सासूबाईंच्या आड लपेन. सांगेन कीं त्यांनीं आग्रह केला, मी कांहीं येत नव्हतें, ह्मणजे मग गप्प. कांहीं बोलणें होणार नाहीं. सासूसासरे असले ह्मणजे आमच्यासारख्या सासुरवाशिणीला असें आड लपायला सांपडतें. बाकी सासुरवास कसला असतो याचा मला मुळीं अनुभव नाहींच ह्मटलें तरी चालेल. आई जगदंबे, मामंजीला आणि सासूबाईला पुष्कळ आयुष्य दे. म्हणजे आमच्यावर कस-

लाही प्रसंग आला तरी त्यांच्या पायांच्या रूपेनें आम्ही त्यांतून पार पडूं. जन्मोजन्मीं ह्याच पायांची सेवा, आणखी असेच सासू-सासरे देवानें द्यावेत, हेंच तुकोबाच्या चरणाजवळ मागणें मागायचें,–पण मी आतां काय नादांत गुंतलें? मला अजून जाण्याची तयारी करावयाची. ( गडबडीनें जाते. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—देहू येथील तुकारामाचें घर.

( शिवाजी, तानाजी व पंडितराव प्रवेश करितात. )

**शिवाजी**–कायहो तानाजीराव, तुकारामबोवांचें घर अगदीं जवळ आलें.

**तानाजी**-सरकार, हेंच पलिकडच्या बाजूचें तुकारामाचें घर. आपण त्यांच्या द्वारांतच आलों म्हणावयाचें.

**पंडितराव**–सरकारांनीं पाहिजे असल्यास क्षणभर येथें विसावा घ्यावा. तुकाराम काय करीत आहेत तें आम्ही पाहून येतों.

**शिवाजी**–ठीक आहे. तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें आपली रोजचीच वहिवाट आहे. कसें तानाजीराव? त्यांचें आणि त्यांच्या कुटुंबाचें भांडण चाललें नसलें म्हणजे आपल्यास जाण्यास कांहीं हरकत नाहीं. आपण आज तीन दिवस रोज येऊन, दर्शन घेऊन, रात्रीं महाराजांचें कीर्तन ऐकून, मग जात आहों. पण प्रथम घरीं आलों कीं, नवराबायकोचा आपला तंटा चाललेला आहे! बरें. तुम्ही बघून या बरें महाराज काय करीत आहेत तें. ( उभयतां जातात. ) तुकारामबोवांचें कीर्तन ऐकून मनांत नाना प्रकारचे विचार येतात. पुंडलीकाप्रमाणें आमच्या हातून आईबापाची सेवा घडणें दुरापास्त! गोरक्षनाथाप्रमाणें गुरूची सेवा होणें कठीण. बळीनें दानाच्या योगानें वामनाला आपला द्वारपाळ बनविलें. ह्या

गोष्टी आमच्या हातून होणेंच कठीण. आम्हांस ईश्वर पावणार कसा ? मोठें राज्य कमावलें, देश स्वतंत्र केला, यज्ञयाग केले, गोब्राम्हणांचा प्रतिपाल केला, आणखी या पुण्याच्या जोरानें स्वर्गप्राप्ति झाली, म्हणजे कांहीं नरदेहाला येऊन जन्माचें सार्थक झालें असें नाहीं. तुकारामबुवा तर स्वर्गप्राप्तीला कवडीची किंमत देत नाहींत. आत्मज्ञान झालें पाहिजे, सगुणभक्ति करून परमेश्वराला ओळखिलें पाहिजे, असें त्यांचें म्हणणें असतें. संत कोणाला म्हणावें, ब्रह्म म्हणजे काय, अध्यात्मज्ञान म्हणजे काय, संतपणा मिळण्याला काय उपाय करावा, वगैरे विचार मला त्यांच्याकडून समजावून घ्यावयाचे आहेत. आतांशा रात्रंदिवस मनाला हीच तळमळ लागली आहे. आजपावेतों कांहीं केलें नाहीं याजबद्दल पश्चात्ताप वाटत आहे. पण आतां बोलून काय उपयोग ? तानाजी आणखी पंडितराव आलेच वाटतें. ( तानाजी व पंडितराव प्रवेश करितात. )

**तानाजी**–महाराज, रोजच्याप्रमाणें भांडणच चाललेलें आहे, परंतु आपल्यास दर्शनास जाण्यास कांहीं हरकत नाहीं.

**शिवाजी**–भांडण त्यांच्या आंगवळणींच पडलेलें दिसतें. चला आपण जाऊं दर्शनाला. ( तुकारामाचे घरांत शिरतात. तुकाराम पोथी वाचीत असून त्याचें व जिजाईचें भांडण चाललें आहे. महादेव मुतखड्यानें आजारी आहे. )

**जिजाई**–जों जों तुम्ही त्या काळ्याच्या नादीं लागाल तों तों तुमच्या संसाराचें तळपट होणार आहे. आज आठ दिवस झाले, पोरगें माझें मुतखड्यानें आजारी आहे, तुह्मी त्याला कांहीं औषधपाणी तरी करतां आहां का ? वैद्याकडे मुलाला न्यावें तर तुह्मी भिकारडे आहांत, हें वैद्याला ठाऊक असल्यानें नुसतें मुलाला काय भावना होत आहे हें सुद्धां ते सांगत नाहींत.

**तुकाराम**–आपल्याला वैद्याचे घरीं जाण्याचेंच कारण नाहीं. तूं जातेस कशाला ? पांडुरंगासारखा धन्वंतरी असल्यावर या नाका-

डोळ्याच्या वैद्यानें काय होणार आहे ? तूं आपली स्वस्थ ऐस. मूल मेलें तर झालेंच नाहीं असें समजावें. किंवा ज्यानें दिलें तो घेऊन गेला. यांत कोणाच्या बापाचें काय गेलें. जगलेंच तर तुला आनंद आहेच. मला जगणें आणि मरणें दोन्हीं सारखींच वाटतात. वैद्याला पैसे द्यावयाचे त्याच्यापेक्षां त्याच पैशाचा देवाला नवैद्य केला तर चांगलें.

**जिजाई**–देवाच्या बापानें ठेवलेत नैवेद्य आणि पूजा. कारट्याचे माझ्या प्राण कासावीस होत आहेत. रात्रंदिवस त्याच्या उशाशीं मी बसलें आहें. सटवाईचे, ह्मसोबाचे, आंबाबाईचे अंगारे लावते, पंचाक्षरी सांगतात कीं, त्याला पिशाच्यानें झपटलें आहे, हडळ लागली ह्मणून, त्यांचे गंडे भालदोऱ्या अंगारे सारखे चालले आहेत. मुलाच्या अंगावरून नानाप्रकारचीं सात्रीं उतरून टाकतें आहें. जोतिषी सांगतात कीं, त्याला ग्रहांची पीडा आहे. साडेसाती मागें लागली आहे. (डोळ्यांत पाणी आणून) लघ्वी होतांना पोराच्या सगळ्या अंगाला तिडका लागतात; पोर माझें माशासारखें तरफडत आहे. त्याच्या तोंडाची मोरी करून त्याला औषध पाजतें आहें, आणखी तुह्माला त्या काळ्याला नैवेद्य करायाचें सुचतें काय ? ( मोठ्यानें ओरडून ) हडळ लागली मुलाला ! साडेसाती लागली !

**तुकाराम**–तूंच जीवंत हडळ आहेस आणखी साडेसाती आहेस, मग दुसऱ्या हडळीचा आमच्या घरांत प्रवेश होणार तरी कसा ?

**जिजाई**–मी हडळ आणि तुह्मी खवीस. मी साडेसाती आणि तुह्मी शनैश्वर. माझा खेटर अडलाय त्या काळ्याला नैवेद्य करायाला.

**तुकाराम**– नैवेद्य करूं नको आणखी माझ्या पांडुरंगाला शिव्याही पण देऊं नको.

**जिजाई**–शिव्या ? नुसत्या शिव्यांनीं काय होतय ? कारट्याची

तंगडी धरतें एका हातांत आणि एका हातांत घेते जोडा. पोरग नेऊन त्याच्या पायावर आपटतें आणखी चांगला खूड घेतें. नवरा माझा वेडा केला, आणखी कारट्याला मरूं घातला आहे. मुरदंगासारखें त्याचें पोट फुगलें आहे, त्याला लघ्वीला होत नाहीं. हातपाय गार पडले आहेत.

**तुकाराम**–माझ्या टाळक्यांत पाहिजे असल्यास पन्नास जोडे मार; पण देवावर जोडा उगारतेस? तत्काळ जळून जाशील. पोरग देवळांत ने, तुला काय पाहिजे तें कर, पण तो जोडा आण इकडे.

**जिजाई**–कारट्याला त्या काळ्यावर नेऊन आपटतें आणखी वर हा जोडा मारतें. ( मुलाला फर फर ओढीत नेते, तुकाराम धांवून जोडा हिसकावून घेतो. शिवाजीचा हात धरून त्यास आपल्या शेजारी आणून बसवितो. शिवाजी तुकारामाचे पायां पडून हात जोडून बोलतो. तानाजी जवाहिरानें भरलेलें ताट पुढें ठेवतो. )

**शिवाजी**–महाराज तीनचार दिवस कीर्तन ऐकून या मनावर नानाप्रकारचे तरंग उद्भवूं लागले आहेत. गुरुदास्य करावें, संतसेवा करावी, माझ्या हातून कांहींच होत नाहीं. वैराग्य धारण करून वनांत जाऊन इंद्रियांचें दमन करणें माझ्या हातून होत नाहीं. तीर्थयात्रा कराव्या तर मन शुद्ध नाहीं. व्रतवैकल्य करावे तर त्याचा विधि ठाऊक नाहीं. हृदयांत देव आहे ह्मणूं, तर आपपरभेदाभेद मनांतून नाहींसा होत नाहीं. तात्पर्य, कांहींच कळत नाहीं, कांहीं हातून होतही नाहीं, ह्मणून महाराजांनां केवळ शरणागत आहें. आपल्या पायाचा दास आहें.

**तुकाराम**–( शिवाजीचे पाया पडतो. शिवाजी अनमान प्रदर्शित करतो. ) शिवाजी, आह्मी पंढरीचे वारकरी. आह्मी असें समजतों कीं, सर्वांभूतीं ईश्वर भरलेला आहे. ह्मणून राव किंवा रंक दोन्ही आह्मांस सारखे. दोघांचेही आह्मी पायां पडतों. तुह्मी द्रव्य पुनः पुनः कशाला आणतां? आह्मा वैष्णवांनां सोनें आणखी माती सारखीच आहे. धनद्रव्य गोमांसाप्रमाणें

आहे. आमचा ठेवा कायतो पांडुरंग हाच आहे. तो आमचा पाठीराखा असल्यानें त्रिभुवनीचें राज्य आज आह्मीच करीत आहों. धन, सत्ता आणखी बळ यांत कायतो राजाचा थोरपणा, पण त्या तिहींतही आह्मी राजाहून श्रेष्ठ आहों. आमची इच्छा पूर्ण करणें असेल तर तुमच्या मुखांत नेहमीं हरीचें नाम असूं द्या. गळ्यांत तुळसीची माळ मिरवा. एकादशी व्रत करा. आणखी हरीचे दास म्हणवा. त्यांत आमचे चित्तास संतोष आहे. ( आपल्या गळ्यांतील एक माळ काढून त्याचे गळ्यांत घालतो, पडद्यांत दंगा होतो. )

**शिवाजी**–तानाजी काय दंगा आहे ?

**तानाजी**–सरकार, चाकणच्या ठाणेदाराकडून आपल्यास धरणें येवून सुमारें दोन हजार पठाण घोडेस्वारांनीं आपल्यासभोंवतीं गराडा घातला आहे. प्रसंग आणीबाणीचा आहे. आपण नेहमीं तुकाराममहाराजांचे कीर्तनास रात्रीचे येत असतां, याची पाळत ठेऊन त्या ठाणेदारानें ही संधि गांठली आहे. या वेळीं त्या पठाणांचे तोंडावर जाण्याकरतां सरकारांनीं मला आज्ञा द्यावी. माझा देह जमीनदोस्त होईपावेतों सरकारांनीं पंडितरावाच्या साह्यानें पुण्याचा रस्ता धरावा. दोन हजार पठाण ह्मणजे सरकाराला जबरदस्त वाटत असतील, परंतु स्वामींच्या आशीर्वादानें आणखी सरकारच्या पायांच्या कृपेनें दोन हातांत पट्टे चढवून दोन हजार पठाणावर तुटून पडतों. शीर धडावेगळें झालें तरी माझें कबंध शें दोनशें पठाणांच्या गर्दनी छाटील. ( जाण्याचें अवसान दाखवितो. )

**पंडित**०–मीच पठाणांच्या अंगावर चालून जातों. तानाजीराव, तुह्मी महाराजांना संभाळून पुण्यास घेऊन जा. स्वामिकार्यीं देह लावण्याचे प्रसंग वारंवार येत नसतात. सरकारांनीं मला या वेळीं हें युद्धदान द्यावें, म्हणजे या पंडितरावाच्या जन्माचें सार्थक झालें. अथवा तानाजीराव आणि मी आम्ही दोघे चालून जातों. सरकारांनीं पुण्याचा रस्ता धरावा.

**शिवाजी**–तुमच्या स्वामिभक्तींची खातरजमा आज नव्यानें नाहीं. अनेक घोर प्रसंगीं तुह्मी जीवाची तमा न धरितां तळहातावर शिरें घेऊन शत्रूवर तुटून पडलेले आहांत. दोन हजार पठाण कोणीकडे आणि तुह्मी दोघे कोणीकडे! तुमचे जीव बळी देऊन हा शिवाजी पळून जाऊन मराठ्यांच्या नांवाला काळीमा आणील, हें स्वप्नांतसुद्धां आणूं नका. मी आपल्या स्वतःच्या प्राणापेक्षां तुमचे प्राण–माझ्या प्रत्येक चाकराचे प्राण–माझ्या प्रजेचे प्राण लाख पटीनें अधिक किंमतीचे समजतों, अशी मनांत खात्री ठेवा. ( तुकारामाचे पायां पडून ) महाराज, आम्हांस जाण्याची आज्ञा असावी. माझ्याकरितां आपल्या जीवावर देवानें संकट आणूं नये अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. आपण पाहिजे असल्यास आमच्याबरोबर चलावें. प्रसंग फार कठीण आहे. ( कांहीं पठाण व त्यांचे रिसालदार प्रवेश करितात. )

**पहिला रिसालदार**–यहि तुकारामका मकान् है. ह्या सेकडो आदमी बैठे है. इस्मे शिवाजी जिसने बिजापूर पादशहाकी दौलत् लूटके मानिंद पादशहाके दौलत्मन्वनाहै वो कौंसा है मै क्या जाने. किलेदारूका ये हुकुम् है के, शिवाजीकु बिलफेल कैद करना और फोरन हमारे तरफ् ले आना. मगर इसमे शिवाजी कौंसा खुदा जाने. क्यं भाई ? तुमारी राय़ इसवक्त क्या हय् ?

**दुसरा रिसालदार**–लाहोलवला ! खुदा जाने शिवाजी पाक सूरत् हय् या बत् सूरत हय्, लेकिन् उस्ताद शरीफ ये ताजूबकीबात् हय् के चेहेरे एक सरीके मुजे नजर आते हय्. ये क्यां बला हय् ? ये शिवाजी क्या वो शिवाजी क्या वो शिवाजी ? अप सबकु कतूल फरमाना. यहि मेरी राय़ हय्. चलो समसेर हातमे लेके वैसाही हामला करेंगे.

**पहिला रिसालदार**–सबूर. जरासा ठैर जाव्.

**तुकाराम**–कोण हा आकांत ! कोण घोर प्रसंग ! पांडुरंगा, तूं या जगांतून नाहींसा झालास काय ? तुझ्या भक्ताचें कीर्तन ऐक-

णारावर परचक्र ! देवा, आजतागाईत तुझी जी एकनिष्ठपणानें सेवा केली त्याला काळोखी आणलीस. हरिकथेचें चांगलें फळ दिलेंस, याचप्रमाणें भक्तांचा उद्धार करतोस काय ? धिःकार असो अशा देवाला आणखी त्याच्या भक्तांना. या नेत्रानें शिवाजीला कतल करतांना पहाणें हेंच आमचें मरण ! पांडुरंगा, तुला हें समजलें पाहिजे काय ? इतकें तरी कशाला ? भजनांत विक्षेप हेंच आह्मांला मरण. या तुकारामाच्या कीर्तनांत शिवाजी आणखी त्याचे जिवलग दोस्त तानाजीराव, पंडितराव यांची कतल होऊन या तुकारामाच्या नांवाचा बदनामीचा डंका सर्व दुनियेंत वाजण्यापेक्षां या तुकारामासुद्धां सर्वांच्या गर्दना छाटल्या जाऊंदे, आणखी ज्या ठिकाणीं भक्तांला आघाताचा वारा लागणार नाहीं त्या ठिकाणीं आम्हांस जन्मास घाल. शिवाजी राजे, कीर्तनांतून उठूं नये अशी धर्मनीति आहे. तुह्मीं स्वस्थ असावें. देवाला भक्तांची लाज असली तर संकट दूर करील. तुह्मी धर्मनिष्ठ आहांत, शूर आहांत.

**शिवाजी**–आपल्या वचनावर भरंवसा ठेवून मी स्वस्थ आहें. मस्तकावर पर्वत कोसळला तरी डगमगत नाहीं. तशांतून आज एकादशी आहे. आपल्यासारखे वैष्णवजन माझ्या सन्निध आहेत. या प्रसंगीं कीर्तनांत मरण आल्यास मी आपणास भाग्यवान् समजतों. तानाजीराव, पंडितराव, तुह्मी अगदीं स्वस्थ बसा. ( सर्व बसतात. पडद्यांत शब्द होतो “ ए देख शिवाजी तुमारे सामने घोडेपर् सवार् होके तुमारे छातीपरसे चले जाता हय्. ”

**पहिला रिसालदार**–( जोरानें ) ओ देखो शिवाजी अपने सामने नंगी समशेर हातमे धरके घोडेपर् बैठके भागता हयू. पकडो उस्कु चलो. दवडो. ( पळत जातात. )

**तुकाराम**–आंधळ्या माणसांनां प्रत्यक्ष सूर्य सुद्धां दिसत नाहीं, तसा या पठाणांनां शिवाजी कांहीं दिसला नाहीं. आज परमेश्वरानें शिवाजीमहाराजांनां जीवदान देऊन या तुकारामाचा माथा उजळता केला. तुमची मातुश्री येथें येऊन तिनें आपल्या पोट-

च्या गोळ्याचे तुकडे तुकडे झालेले पाहिले असते, म्हणजे त्या पांडुरंगाच्या नांवाला काळोखीच लागली असती ह्मणावयाची. तुकारामाचें नांव निघालें तर सचैल स्नान करावें, असा लोकांचा ग्रह झाला असता. देव भक्तांचा कैवारी कसा असतो याचें हें प्रत्यक्ष उदाहरण पहा.

**शिवाजी**- महाराज, हा सर्व आपल्या पायाचा प्रताप आहे. चमत्कार कसा झाला हें मला कांहींच कळत नाहीं. आतां महाराजांनीं मला संत म्हणजे काय व तें पद धारण करण्यास कोण समर्थ होतो, त्याचप्रमाणें ब्रम्हज्ञान म्हणजे काय हें सांगावें.

**तुकाराम**-संतांचा महिमा वर्णन करण्यास मी असमर्थ आहें. तथापि मूल जसें बोबड्या भाषणानें बापाच्या जीवाला समाधान उत्पन्न करितें, तसा आपणही संतांचा महिमा जाणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या पायांच्या कृपेनें आपल्यास संतांच्या स्वरूपाचें थोडें तरी ज्ञान होऊन बापाप्रमाणें संतांनांही आपल्या कृतीचें समाधान वाटेल.

**शिवाजी**-महाराज, संताचें स्वरूप कसें असतें? आपण त्यांनां कसें ओळखावें? पुष्कळ कवित्व केलें किंवा संतांच्या कुळांत जन्म झाला असला, तर तो संत होईल किंवा नाहीं?

**तुकाराम**-पुष्कळ कवित्व केल्यानें किंवा संतांचा आप्त असल्यानें तो संत होत नाहीं. हातांत भोपळा घेऊन दारोदार ' भिक्षां देहि ' केल्यानें, भस्माचें उद्धूलन केल्यानें, माळा-मुद्रा धारण केल्यानें, ईश्वरास न ओळखतां नुसत्या वेदपठणानें, सर्वसंग परित्याग करून रानोरान भटकत फिरल्यानें संत होत नाहीं. ज्यानें आपल्या देहावर तुलसीपत्र ठेविलें, जे देहाच्या ठिकाणीं उदास, ज्यांना कशाची आशा नाहीं, नारायण हाच ज्यांचा विषय, ज्यांचें आई, बाप, बायका, पोरें, धन, दौलत यांचे ठिकाणीं मन नसतें-परंतु एक परमेश्वराकडे ज्यांचा हेतु गुंतून राहिला आहे, जे कायावाचामनेंकरून तृप्त होऊन, नामस्मर-

णानें डुलत आहेत, जे देहींच विरक्त, उदास, आणखी ज्यांना विषयांची आठवण नाहीं, तेच संत.

**शिवाजी**–ब्रह्मज्ञान कशाला म्हणावें महाराज ?

**तुकाराम**–( हांसतो. ) शिवाजी, ब्रम्हज्ञान असें जर एका घटकेंत समजूं लागलें तर वेद, शास्त्रें, ब्रम्हज्ञानाच्या पुढें कुंठित कां झालीं असतीं ? ब्रम्हज्ञानाचे प्राप्तीकरतां शास्त्रांचें अध्ययन करतात, जप करतात, तप करतात, तीर्थयात्रा करतात, याचकरतां व्यासांनीं भागवत केलें. असो, तुमची इच्छा आहेच तर मी आपल्या अल्प मतीप्रमाणें सांगतों.–ममतेचा मळ अंगाला लागूं देऊं नये. निरिच्छ असावें. पांडुरंगाचे ठिकाणीं मन निश्चल असावें. इंद्रियांचा जय, वासनेचा क्षय, सूर्य जसा रसाचें शोषण करतो परंतु गुणदोष जसे त्याच्या अंगीं जडत नाहींत, त्याप्रमाणें सर्वांवर समत्व राखणें. कोणाविषयीं आपपरभेदाभेद नाहीं. मनांत कोणत्याच गोष्टीचा संकल्प येत नाहीं. आणखी मनांत किंचित्सुद्धां गर्व नाहीं. नेहमीं आनंदी आणि प्रसन्नवृत्ति असावी यालाच अद्वैत खरें ब्रह्मज्ञान ह्मणतात. बाकी सर्व अनुभवावांचून बडबड. लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण. श्री रामदासस्वामी यांचे ठायीं हें ज्ञान पूर्णपणें वसत आहे. तुह्मीं त्यांची सेवा करावी, ह्मणजे तुम्हास ब्रम्हज्ञानी म्हणतील. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, आज हा किल्ला घेतला, उद्यां त्या किल्ल्याला शह दिला, आज विजापुरावर हल्ला केला, उद्यां दिल्लीवर ढाला फिरविल्या, घे, मार, पकड, लूट, जाळ, उडव फत्ना. अटकेवर झेंडा फडकावीन, हिंदुपद बादशाहीची टोलेजंग इमारत उभारीन म्हणून ज्याचे बाहु स्फुरण पावत आहेत, अंगीं पहिल्या पंचविशीची भरज्वानी, सौंदर्य मदनासारखें, आणि अर्जुनाप्रमाणें पराक्रम, अशा पुरुषाच्या हातून निष्पाप शारीर तप घडून तो आपल्या देहाचें सार्थक कसें करणार ? चित्तवृत्ति एकाग्र होऊन ईश्वरमय होऊन जाणार कशा ?

**शिवाजी**–महाराज, मला आतां काय करावें तें सुचत नाहीं. मी

अगदीं अंध झालों, पंगु झालों, माझ्या मनाला शांतता उत्पन्न करा.

**तुकाराम**—या सुंदर शरीराची उद्यां वाळून काचरी होईल. पंचविशी गेली, चाळिशी गेली, दाढी पांढरी झाली, दांतांडवाडी ओस पडली, नाकपुर वाहूं लागलें, कानपुराचे वेशींत दट्टे मारले, हातापायांच्या काड्या होऊन कमळाप्रमाणें नेत्र अंध झाले; मग आपल्या हातून काय होणार? अंतीं आपल्यास कोणी सोडविणार नाहीं. ज्या राजधानींत सात कोट घरें शुद्ध कांचनाचीं असून जिला समुद्राचा वेढा होता, जिच्या संरक्षणाकरितां मदोन्मत्त निशाचर, ज्या राजाची कामाची शांती करण्याला ऐशीं हजार स्त्रिया तयार, ज्याची पट्टराणी मंदोदरी, इंद्राला पादाक्रांत करणारा ज्याचा पुत्र, कुंभकर्णासारखा बंधुवर्ग, ज्याला चौदा चौकड्यांचें आयुष्य, ज्याचे घरीं तेहतीस कोट देव राबत होते, अशा रावणाबरोबर एक कवडीसुद्धां गेली नाहीं. त्याचा प्रचंड देह कधींच धुळीला मिळून जाऊन त्याजवर घोर जंगल माजलें आहे. ( शिवाजी तुकारामाचे पायावर मस्तक ठेवून जाण्याची परवानगी घेतो. तुकाराम उठून जातो. )

**शिवाजी**—बस. आपलें काम झालें. आतां राज्यप्राप्तीची गरज राहिली नाहीं. शत्रूचें पारिपत्य करून गड, कोट, किल्ले घेण्याची आतां जरूर राहिली नाहीं. संसारापासून अलिप्त झालों. सर्वसंगपरित्याग करून आतां वैराग्य धारण करणार. या भूषणांची, या मौल्यवान वस्त्रांची आतां जरूरी नाहीं. तानाजी, संभाळा आतां आपली ही तरवार. घ्या हीं आपलीं वस्त्रें-भूषणें. तुमची आमची हीच भेट. आतां संबंध उरला नाहीं. ( वस्त्रें भूषणें काढून फेंकून देतो. ) आम्ही श्रीरामचंद्राप्रमाणें राज्याचा त्याग करून वनांत जाणार. झालेली हकीकत मातुश्रीस निवेदन करा.

**तानाजी**—महाराज, हें काय ? आम्हांस कोणाचे स्वाधीन करतां ? मराठ्यांच्या गादीचा मालक कोण ? चाललांत कोठें ? आम्ही जाऊं देणार नाहीं.

**पंडित०**–महाराज, कापराच्या राशीवर ज्याप्रमाणें अग्नि ठेवा-वा त्याप्रमाणें मराठ्यांच्या वैभवाचा कळस केलात. आम्हाला कोणी त्राता नाहीं. गोब्राम्हणाला कोणी या जगांत त्राता नाहीं. आम्ही आपलीं लेंकरें, आपल्याशिवाय आमचे प्राण वांचणार नाहींत, आम्हीही महाराजांशिवाय आमचीं काळीं तोंडें घेऊन मातुश्रीकडे जाणार नाहीं, आम्ही आपल्यास जाऊंच देणार नाहीं, मातुश्रीपर्यंत चलावें, नंतर जावें.

**शिवाजी**–( हंसतो. ) तुकाराममहाराजांचे उपदेशाप्रमाणें ही काया ब्रह्मरूप करणार. तुमच्या भाषणाचा विचार करण्यास मन जागा देत नाहीं. आम्ही चाललों. ( तानाजी व पंडितराव यांनां लोटून जातो. )

**तानाजी**–हाय हाय ? गेले महाराज आमचा त्याग करून. पार दिसेनासे झाले. तुकाराममहाराज, हें काय केलेंत ! फिरून आमचे महाराज आले नाहींत तर या तरवारीनें आह्मी आपल्या माना सपासप उतरून घेऊं. पंडितराव, चला आपण महाराजां-च्या मागोमाग जाऊं. ( जिजाबाई, सईबाई, रंगू, गंगू वगैरे प्रवेश करितात. )

**जिजाबाई**–तानाजीराव, पंडितराव, शिवबा कोठें गेला ? कोठें आहे माझा बाळ ? तुमचीं तोंडें अशीं हिरमुसलेलीं कां ? तुम्ही असे रडतां कां ? बोला लवकर. त्याला मोंगलांनीं धरून नेला का ? धीर निघत नाहीं. कांहीं तरी विपरीत गोष्ट घडून आली आहे.

**सईबाई**–माझ्या काळजानें ठाव सोडला, स्वारी इथें दिसत नाहीं. तानाजीराव कसाही प्रसंग आला तरी न डगमगणारा, असें असून तो सुद्धां रडतो आहे ! काय माझ्या कपाळीं आहे कोण जाणें ! आई अंबाबाई, आम्हांला या संकटांतून पार पाड.

**तानाजी**–आईसाहेब, महाराजांनीं राज्याचा त्याग करून वन-वास धारण केला. आतांच आम्हांला सोडून विदेही होऊन त-पश्चर्या करण्याकरितां अरण्यांत गेले, व पुनः आतां परत येणार

नाहीं म्हणाले. आम्हांला तुमचे स्वाधीन केलें आहे. राज्य नको, संसार नको, आईबापाची, कुटुंबाची गरज नाहीं, अशी त्यांची वृत्ति बनून गेली आहे! आम्हीं आतां काय करावें? तुकाराममहाराजांचे उपदेशानें त्यांना राज्याचा व संसाराचा वीट आला ते ईश्वरभजनीं लागले.

**जिजाबाई**–हाय हाय! मला आतां आई म्हणून गोड हाक कोण मारील? माझ्या पोटीं एकच पुत्र. तोही विरक्त होऊन वनांत गेला. त्याच्या पोटीं एक मूल सुद्धां नाहीं. कोणच्या रीतीनें मीं आपलें समाधान करावें? मी अंध झालें. शिवाजीशिवाय पंगु झालें. माझी आंधळ्याची काठी परमेश्वरानें हिसकून घेतली. रामा, तूं जसा वनवासास गेलास, दशरथानें जसा राम राम करून प्राण सोडला; तसा विजापुरास ही हकीकत समजली म्हणजे शिवाजी शिवाजी करून प्राण टाकतील! माझ्या लाडक्या, आणखी मी कशाला जगतें? रामाच्या वियोगानें कौसल्येचें अंतःकरण जसें व्याकुळ झालें, तसें शिवराया या तुझ्या आईचे अंतःकरणाला तापलेल्या लोखंडाच्या सांडसानें कोणी डागण्या देत आहे असें वाटतें. एकदां तरी मला येऊन भेट. मला तुझ्या गळ्यास मिठी मारूं दे, तुझें तोंड कुरवाळूं दे, मी आतां जगत नाहीं. ( मूर्च्छा येऊन पडते. )

**सईबाई**–हें मी काय पहात आहें! सूर्य मावळल्यावर त्याची प्रभा मागें रहाते काय? त्यांच्याखेरीज या जगांत सर्वत्र अंधार दिसतो आहे. भेट सुद्धां झाली नाहीं. भेटीची आशा राहिली. ते माझा प्राण! ते आत्मा, मी कुडी! प्राण गेल्यावर शरीरांत काय आहे? तें धरणीवर पडणारच. आतां विवेक होत नाहीं. जिकडे जाणें झालें आहे तिकडेच आतां मी जातें. (मूर्च्छित पडते. तानाजी, पंडितराव, रंगू, गंगू दुःखानें हातावर कपाळें टेंकून बसतात. सर्वांचें लक्ष चोरून सईबाई वनांत निघून जाते. )

[ अंक दुसरा समाप्त ]

# अंक तिसरा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**—तुकारामाचें घर.

( सुंदराजी प्रवेश करते. )

**सुंदराजी**–आह्मां स्त्रियांपुढें पुरुषांचें कांहीं चालत नाहीं. आम्हांला पुरुष आपले सामान्य समजतात, परंतु आम्ही म्हणतों आमच्या इतकें थोर कोणीच नसेल. तारुण्य आणि स्वरूप हीं जर आम्हास अनुकूल असतील, तर आह्मी इकडची दुनिया तिकडे करूं. मोठमोठ्या राज्यांच्या उलथापालथी करूं. आमच्या प्राप्तीकरितां आजपावेतों कितीएक लोकांचे खून झाले असतील, कितीएक लोक आपल्या आईबापांना, बायकामुलांना, घरादारांना, इष्टमित्रांना किंवा राज्यवैभवाला सुद्धां आंचवले असतील. पतंग जसा दिव्याच्या जोतीवर झडप घालतो तसे कामी तरुण पुरुष विषयवासना तृप्त करून घेण्याच्या लालसेनें आमच्याशीं लगट करतात. पतंगाचा जसा परिणाम आपला सर्वस्वी नाश करून घेण्यांत होतो तसाच विषयी पुरुष आमच्या संगतीनं आपल्या जीविताला आंचवतो. या तुकारामाची कथा काय! जराशी गालांत हंसून थोडासा मुरका मारून चंचल अशा दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें कीं त्याच्या वैराग्याचें पाणी होऊन जाईल. कुत्र्याप्रमाणें माझ्या मागें मागें सुंदराजी सुंदराजी करीत हिंडायला लागेल. विश्वामित्र गेला कीं नाहीं कुत्रें होऊन मेनकेच्या मागें? सांब लागले कीं नाहीं भिल्लिणीच्या मागें? हेंच तुकारामाचें घर. तो देवळांतून घरीं येत असतां मी पाळत ठेवून त्याच्या मागोमाग चोराप्रमाणें आलें. ( घरांत प्रवेश करते. ) स्वारी चांदण्यांतच

धोंगडीवर बसली आहे वाटतें. अगबाई, मला यानें पाहिलें वाटतें? काळजांत कसें धस्स होत आहे. माझें तोंड कां कोरडें पडलें बरें?

**तुकाराम**–कोण आहे तिकडे? ( जोरानें ) कोण आहे बोलत कां नाहीं?

**सुंदराजी**–म्हटलें मी आपली—

**तुकाराम**–माझी कोण?

**सुंदराजी**–मी आपली सुंदरी आहें. ( हळूच ) कांहीं नाजूक काम आहे, म्हणून इतक्या रात्रीं आलें. दिवसां कांहीं आपली भेट एकांतांत होत नाहीं म्हणून मुद्दाम रात्रीं आपल्या कीर्तनास येऊन इतका वेळ जागून आपल्या मागोमाग आपल्या घरीं आलें.

**तुकाराम**–पण आहो बाई, तुमचें काम काय आहे?

**सुंदराजी**–पण इथें कोणी दुसरें तिसरें आहे का?

**तुकाराम**–तुमचें काम काय आहे एवढ्या रात्रीं?

**सुंदराजी**–पण जिजाई, तुमची बायको कदाचित्—

**तुकाराम**–काय तुमचें तिचें भांडण झालें होय? ती फ भांडखोर आहे.

**सुंदराजी**–तशांतला कांहीं प्रकार नाहीं. तुम्ही खालीं बस मी सांगतें. ( मुरका मारून ) पण किनई बाई, मला बोलायची लाज वाटते.

**तुकाराम**–( एकीकडे ) या बाईच्या एकंदर आचरणावरून ही गैरचालीची दिसते. इतक्या रात्रीं येथें येण्याचें कांहींच कारण नाहीं. हिचें नाजूक काम माझ्याबरोबर कशाचें आलें आहे? नको, स्त्रियांची संगती नको! त्या लाकडाच्या आणखी दगडाच्या असल्या तरी सुद्धां मनाला भूल पाडतील. मग जीवंतच असल्या तर काय नाहीं करणार? शुकाचार्यानें रंभेची निर्भर्त्सना करून जेव्हां तो तपास गेला तेव्हां आम्ही होतों. ( उघड ) बाई, तुम्ही कां आलांत तें मी समजलों. पण तुमचें काम माझ्या हातून—

**सुंदराजी**–आपण असे निसटून जाऊं नका. स्त्रीहत्येचें पातक भ्रूणहत्येचें पातक आपल्या कपाळीं आदळणार आहे. तुम्हाला मीं सांगावें असें नाहीं. तशांतून आपल्या ठिकाणीं हें मन इतकें जडलें आहे कीं, रात्रंदिवस आपलें ध्यान करण्यांत हें मन आणखी हें शरीर गर्क होऊन गेलें आहे. माझ्या मनाप्रमाणें गोष्ट घडून आली नाहीं तर मी कांहीं जीव ठेवणार नाहीं.

**तुकाराम**–जीव ठेवणार नाहीं! शाबास. कामाचा तडाखा जबर आहे. ब्रह्मदेवानें आपलें डोकें गमावलें. रावणदुर्योधनांनीं आपलीं राज्यें धुळीस मिळविलीं. पराशरानें दिवसा ढवळ्या अंधकार पाडून धीवरकन्येचा उपभोग घेऊन आपली तपश्चर्या भ्रष्ट केली. इंद्रानें सर्व शरीराला भगेंद्रें पाडून घेतलीं आणि वालीसुग्रीवाची कुस्ती होऊन तींत रामचंद्रानें वाळीला ठार केलें. कामक्रोधाची ही जोडगोळी प्रति रुतांत आहे. ज्ञानाच्या ठेवीवरचे हे भुजंग आहेत. भजनमार्गांतले जीव घेणारे हे मारेकरी मांग आहेत. या देहरूप गडाचे हे फत्तर आहेत, आणि इंद्रियरूप गांवचा हे भक्कम कोट आहेत. यमाजी भास्कराच्या दरबारांत यांचा मानमरातब मोठा असून ते याचे मोठे प्यारे दोस्त आहेत. या दुष्टांना जर भूक लागली तर ते या विश्वासाचा एकच घास करतील. आपल्या हौसेनें जगास नाचविणारे मान आणि अहंकार यांचा मोठा मान ठेवतात, आणि यांच्याशीं देवघेव करतात. यांनीं सत्याचा कोथळा बाहेर काढून त्यांत गवताचा पेंढा भरला. शांतिरूप पतिव्रतेला यांनीं लुटलें. मायारूप मांगिणीला शृंगारून तिच्याकडून साधुसमुदाय विटाळून सोडला. हे विवेकाला कधीं कधीं जमीनदोस्त करतात, आणि वैराग्याचीं चामडीं लोळवितात. उपशमाची मान मोडतात. संतोषरूपी वन तोडून टाकतात. धैर्यरूप किल्ले खणून काढतात. आनंदाचें रोप उपटून टाकतात. उपदेशाला खच्ची करतात. हे शरीराला जडलेले, आणि जीवाला खिळलेले आहेत, पण ब्रह्मादिकांनां सुद्धां सांपडत नाहींत.

असें जरी आहे तरी त्यांच्याशीं झालेल्या लढाईंत पुष्कळ विजयश्रीचीं निशाणें फडकावीतही पण आलेले आहेत. भीष्माचार्य, शुकाचार्य, वज्रदेही हनुमान–एकंदरींत देव तरी आपली कसोटीच पहात असतो. बाई, तुमच्या नवऱ्याचें नांव काय बरें ?

**सुंदराजी**–( एकीकडे ) हा अगदींच भोळा हो! आम्हांला कोठें नवरा बोलला आहे कीं काय? आम्ही बोलून चालून वेश्या! आम्ही रूपाकडे पहात नाहीं, वयाकडे पहात नाहीं, गुणाकडे पहात नाहीं. जो अधिक पैसा देईल तोच आमचा यजमान, त्याचें मात्र आमच्यावर खरें प्रेम. पण आमचें प्रेम तिसऱ्यावरच. आम्ही दाखवूं एक आणि करूं एक. ( उघड ) मला बाई सांगायची लाज वाटते. पण खरेंच सांगूं का? आजपावेतों मीं पुष्कळ यजमान केले; परंतु आजपासून मीं कायावाचामनानें पहिल्यानें आपल्यासच वरिलें आहे.

**तुकाराम**–तूं का वेश्या आहेस का?

**सुंदराजी**–होय महाराज.

**तुकाराम**–मग तर फारच सोंवळी. सर्व जगांत सोंवळी ! अगदीं वेशीवरचा आरसा. वाटेल त्यानें येतां जातां तोंड पाहावें. किंवा धर्मशाळेंतील उखळ, तुला तुकारामच कशाला हवा ? तूं वेश्या आहेस हें पाहून मला इतका आनंद झाला आहे कीं, बोलायची सोय नाहीं. प्रथम मला असें वाटलें कीं, कोणा मराठ्या सरदाराची बायको आहे कीं एखाद्या वेदज्ञ ब्राह्मणाची आहे ! कोणाच्या कपाळीं हें असलें रत्न पडलें आहे कोण जाणे, कीं नवऱ्याला धाब्यावर बसवून आपण चालली रात्रीचे गुंगारे मारायला. कायहो, पशूंत आणि तुमच्यांत काय भेद ?

**सुंदराजी**–मला नाहीं भेद समजत.

**तुकाराम**–बरोबर आहे, नाहींच समजणार. कारण आजपावेतों रस्ता पशूंचाच धरलेला आहे. पण मला वाटतें तुमच्यापेक्षां पशु बरे. नेमलेला ऋतु आणि आधाशीपणा कमी. ( रागानें )

ऐन तारुण्याच्या भरांत आलेले, ज्यांनीं देशहिताच्या मर्दुमकीचीं काम शेंकडों करून आपलें नांव अजरामर केलें असतें, किंवा हरिचरणीं लीन होऊन ज्यांनीं आपल्या देहाचें सार्थक केलें असतें, अशा पुरुषांची तुह्मीं वेश्या थोड्याशा पैशाच्या लालचीनें आणि शरीराला सुख व्हावें ह्मणून राखरांगोळी करतां, तारुण्याला करपून टाकणाऱ्या, वीरश्रीला नष्ट करणाऱ्या, कुलवान आणि तरुणांना भ्रष्ट करणाऱ्या, आयुष्याचा मोड खोडून टाकणाऱ्या, वैराग्याचा भडका उडवून देणाऱ्या, कुलस्त्रियांचा तळतळाट घेणाऱ्या–

**सुंदराजी**–हें काय पण बाई, मला काय ह्मणून शिव्या, मी सांगतेंना कीं, आजपासून सत्याचरणानें चालणार ह्मणून. आजपावेतों झालेंलें पाप विसरून जातें. येथून पुढें नवीन करणार नाहीं.

**तुकाराम**–शेणाचीं बनविलेलीं चित्रें नारळ वगैरे सोनेरी-रुपेरी मुलामा दिलेलीं जत्रेमध्यें विकावयाला येतात, पण त्यांत कांहीं खोबरें सांपडतें कांहो? नारळ फोडला कीं आंत शेण. तशी तुमची वृत्ति. वरचा तेवढा टाकमटिकला पाहून घ्यावा. आंतमध्यें शेणसडा. असो. आह्माला काय करावयाचें आहे. आम्ही वैष्णव असे नाहींत. तुह्मांला आम्ही भुलणार नाहीं. सुंदर स्त्रिया आह्मांला आस्वलीप्रमाणें दिसतात. शुकाचार्यासारखे वेदपुरुष परस्त्रीला मातोश्रीप्रमाणें समजतात हें खरें, परंतु अप्सरेच्या सौंदर्यानें आपण कदाचित् मोहित होऊं ह्मणून डोळे मिटून घेतात. पण हा तुकाराम डोळे उघडे ठेवून तुला असें सांगतो कीं परस्त्रीला मी रुक्मिणीसमान समजतों. तेव्हां आपली स्वारी आतां परत जावी. आपल्याला माझ्याशिवाय या जगांत थोडे का पुरुष आहेत? आह्माला विषयाचा विसर पडून गेलेला आहे. आम्ही कीर्तनानें शुद्ध झालों आहों? समजलें सुंदराजी? (तुकारामाची बायको हातांत केरसुणी घेऊन येते. सुंदराजीचे दोन्ही हात आपल्या हातांत धरते व केरसुणीनें मारते.)

**जिजाई**–समजलें का सुंदराजी उंदराजी इतक्या रात्रीं तुला माझ्या

घरीं येण्याचें कारण काय ? बरें, आलीस ती आलीस, आणखी मी याची लग्नाची बायको धडधडीत उरावर जीवंत असतां "माझें लोढणें गळ्यांत अडकवा," ह्मणून त्याला गळ घालावयाला तुला लाज नाहीं वाटत ? शंभर मारून एक मोजावा या किमतीचें तूं सांडरू. तुला या जिजाईचा तडाखा ठाऊक नाहीं वाटतें ? (एकीकडे) उगीच मी आपली मघांपासून तोंडांत बोट घालून लक्ष देऊन ऐकत आडबाजूला उभी आहें; कांहीं तरी मेली लाज ! (तिला केरसुणीनें मारते.) येशील का पुन्हां माझ्या घरीं ? पाहिजे का तुकाराम ? पाहिजे का तुकाराम ?

**सुंदराजी**-नको, नको, नको, मला जीवंत जाऊं दे ह्मणजे झालें. तुझ्या पायां पडतें. आतां तुझ्या घरीं कधीं येणार नाहीं. मला चांगली अद्दल घडली.

**जिजाई**-कां बरें ? कां ? कायावाचामनानें तुला माझा नवरा आवडला आहेना ? मग दे त्याच्यासाठीं प्राण. माराला कां भितेस ? (तुकाराम सोडविण्यास धांवतो. पडदा पडतो.)

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—मंबाजीचें घर.

(मंबाजीबुवा व सुंदराजी समोरासमोर प्रवेश करितात.)

**सुंदराजी**-मारलें हो त्या आकाबाईनें ! तुमच्या पायीं मला विनाकारण मार मात्र बसला.

**मंबाजी**-तुझे हात का कोंकणांत गेले होते वाटतें ? खाऊन खाऊन बोक्यासारखी माजलीस मात्र ! तूंही दोन तडाखे जिजाईला मारावयाचे होतेस. आजपावेतों कसब करावयाचा धंदा करून यःकश्चित् तुकाराम तुझ्यानें वळला नाहीं. तूं आपल्या जातीला खालीं पाहावयास लावलेंस. माझ्याजवळ लांब जीभ करून मोठ्या गप्पा मारून प्रतिज्ञा करून तुकारामाकडे गेलीस, आ-

णखी नाक कापून मला अपशकुन करावयाला परत आलीस? जीव घावयाचा होतास!

**सुंदराजी**–पण गुरुजी, इतके रागावतां काय ह्मणून?

**मंबाजी**–मी मुळींच तुला गुरु शोभत नाहीं. काम करण्यांत कच्ची असली शिष्यीण काय कामाची. आज जर तूं तुकारामाचें सत्व हरण केलें असतेंस, तर या मंबाजीचे आनंदाला पारावार नसता. तुझी अगदीं पट्ट शिष्यांत गणना केली असती. पण तूं माझ्या सर्व मनोराज्याचा भंग केलास. मला तुझें तोंड पहावेंसें वाटत नाहीं. चालती हो येथून.

**सुंदराजी**–मलाही पण तुमचें तोंड पहावेंसें वाटत नाहीं. जशी मीं आपल्या जातीला काळिमा आणली, तशीच किंबहुना हजारपटीनें जास्त तुम्हीं साधु या पवित्र नांवाला आपल्या आचरणानें काळीकुट्ट काळिमा आणलीत. तुम्ही अझून विषयांत गटकाळ्या खात आहांत. नरकांतल्या किड्यांना ज्याप्रमाणें नरकाची किळस येत नाहीं, त्याप्रमाणें तुम्हांला विषयाचा तिटकारा येत नाहीं. तुकाराम विषयसुखाला वांतीप्रमाणें समजतो आहे. त्याच्या एका फाटक्या खेटराची सुद्धां तुमच्यासारख्या भोंदूला बरोबरी करतां येणार नाहीं. तुकारामाला कसाला लावून पाहिला, तो तर निष्कलंक आहे. तुम्हाला कसोटीला लावल्याबरोबर तुमच्या सत्त्वाचें खोबरें झालें. (मोठ्यानें) सगळ्या गांवांत तुमच्या ढोंगाची आतां दंवंडी पिटवितें. मी नांवाची सुंदराजी आहें समजलांत?

**मंबाजी**–जास्त बोललीस तर जीभ कापून टाकीन. दीड दमडीची तुझी किंमत. तुझ्या बोलण्यावर विश्वास ठेवण्याला लोक अगदीं बेवकूब असतील वाटतें?

**सुंदराजी**–सणकाडीची किंमत कांहींच नाहीं. परंतु ती मोठ्या हवेलीला आग लावूं शकते. आपल्या साधुपणाच्या भ्रमाचा भोपळा मी फोडल्याशिवाय रहात नाहीं, समजलांत?

**मंबाजी**-( एकीकडे ) हिला जरा चवदावें रत्न दाखविलें पाहिजे. त्याशिवाय ही ताळ्यावर येणार नाहीं. ( उघड ) येऊं का मुसकाड रंगवायला ?

**सुंदराजी**-आणि मीं उलट रंगवलें ह्मणजे मग ? तुमच्या माझ्या लढाईंत मी हटलें तर कांहीं मोठेंसें नवल नाहीं. बोलून चालून मी बायकोच. पण तुह्माला जर का मीं हटविलें आणखी तुमची चांगली कणीक मऊ केली, तर सगळ्या गांवांत तुमची फटफजिती उडेल.

**मंबाजी**-( एकीकडे ) आतां आपणच आटपतें घेतलें पाहिजे. शेराला वांसलें तर तो आपल्यालाच उतणार. हें पहा सुंदराजी, तूं चांगली शहाणीसुरती बायको असून अशी मूर्खांत शिरतेस ?

**सुंदराजी**-मी गांवच्या पाटलाला जाऊन सांगणार कीं, मंबाजीनें मला मारलें. मजवर जुलूम केला. माझी अब्रू घेतली. कां तर मीं तुकारामाचें सत्त्व हरण केलें नाहीं ह्मणून.

**मंबाजी**-( आर्जवानें ) हें पहा ह्यांत दोघांनाही कमीपणा असून यांत दोघांचीही अब्रू खराब होणार आहे. याचा तूं विचार केलास काय ?

**सुंदराजी**-मला कशाची अब्रू नी गैर-अब्रू ? मीं कधींच अब्रूचें गांठोडें करून झाडाला टांगलें आहे. पण तुमचें पागोटें दहांत खालीं केल्याशिवाय रहात नाहीं. तुकारामाच्या बायकोनें मारल्याचें मला कांहींच वाटत नाहीं. तिचें करणें न्यायाचें होतें. आह्मी वेश्या झालों तरी पापपुण्य कशाला म्हणतात हें आह्माला चांगलें समजतें. समजलांत मंबाजीबुवा ? तुमचें आचरण आमच्यापेक्षां गैरचालीचें असून तुह्मी आम्हालाच ज्या अर्थीं हलकट ह्मणतां त्या अर्थीं ही पंचाइत पंचापुढें पाटलाच्या मार्फतीनें गेलीच पाहिजे.

**मंबाजी**-( गरीबीनें ) असें काय बरें करितेस ? रागाच्या भरांत जें झालें तें झालें. तूंही दोन शब्द मला बोललीस, मींही तुला बोललों.

**सुंदराजी**–तुह्मी बोलल्यावर मी बोललें. तुमच्या अपराधाबद्दल तुह्मीं माझ्या पायां पडून माझी क्षमा मागितली पाहिजे. नाहीं तर मी अशीच पाटलाच्या घराचा रस्ता धरितें. ( जाऊं लागते. )

**मंबाजी**–( तिच्या मागें जाऊन तिचा हात धरून आणतो. ) चुकलों. पाया पडतों. माफी मागतों. पण गांवांत माझ्या नांवाचा डंका पिटूं नकोस. ( तिचे पायां पडतो. )

**सुंदराजी**–आतां ठीक झालें. आतां माझ्या मनाजोगें झालें. आम्ही हलकट कीं ढोंगी बुवा हलकट याचा निकाल झाला. ( जाण्याचें निमित्त करून लपून बसते. )

**मंबाजी**–कांहीं चिंता नाहीं. याचा सूड घेतल्याशिवाय रहाणार नाहीं. आज गांवांत कशी झाली तरी मला अब्रू आहे. लोक मला बुवा म्हणून समजतात. रामेश्वरभट सुद्धां मला मान देतात. अशांच्या मनांतून मी उतरून जाऊन माझें वजन कमी होईल ह्मणून मला या हलकट रांडेच्या--

**सुंदराजी**–( पुढें येऊन ) फिरून हलकट ! हलकट कोण ?

**मंबाजी**–हलकट मी. तूं नाहींस. मी हलकट ठरलोंच आहें. ( टाळमृदंगाचा आवाज ऐकलासा करून सुंदराजी जाते. ) टाळमृदंगाचा आवाज ऐकूं येत आहे. ही तुकारामाची दिंडी विठोबाच्या देवळाकडे जाण्याला येत आहे. आतां या वेळीं कांहीं तरी कुरापत काढून तुकारामाशीं भांडण करून त्याला खूप ठोकायचा, मग जें होणें असेल तें होवो. ही गोष्ट माझ्या मनांत फार दिवसांपासून घोळते आहे. ( तुकाराम एक दोन माणसांसह प्रवेश करतो. )

**तुकाराम**–( मंबाजीच्या पायां पडून ) मंबाजीबोवा, दिंडीचे लोक इकडून जातांना त्यांच्या पायांत या तुमच्या बागांतल्या कांट्यांचे कांटे मोडतील म्हणून या देवळाच्या प्रदक्षिणेच्या वाटेवरच्या बाभळीच्या कांट्या उचलून जरा बाजूला ठेवतों. ( कांट्या उचलून बाजूला ठेवतो. )

**मंबाजी**–( त्वेषानें ) ये भिकारड्या, कुणाच्या कांट्याला हात

लावलास ? हा येथें तुझा बाप जीवंत उभा असतां, चोरा, तं कांट्यांला हात लावणार कोण ? ( तुकारामाचें मणगट धरून त्यास पुढें ओढतो. ) तुझें साधुपणाचें बंड मोडून टाकतों, तुझी चांगली कणीक मऊ करतों. त्या कांट्या बाजूला केल्यास त्याच्या योगानें माझा भोपळीचा वेल दुखवला त्याची वाट काय? परवां तुझी ह्मैस रात्रीं मोकळी सुटली, माझ्या बागेंत शिरली, साऱ्या झाडांचा नाश केला. तूं आपल्याला मोठा संत ह्मणवितोस नाहीं का?

**तुकाराम**–कलियुगांत घरोघर संत झाले आहेत. या वीतभर पोटासाठीं दारोंदार हिंडतात. दुसऱ्याच्या सुंदर सुंदर बायका पाहिल्या ह्मणजे त्यांचें चित्त चंचळ होतें, माळा घालतात, मुद्रा लावतात , चंदनाचे टिळे लावतात, सकलादीच्या टोप्या घालतात, आणखी आपल्याच तोंडानें आपल्याला साधु म्हणवितात. बाकी दयाधर्माच्या नांवानें भोपळ्याएवढें. ते नांवाचेच साधु ह्मणावयाचे. देवाच्या प्रदक्षिणेच्या वाटेवरच्या कांट्या बाजूला केल्यानें मला वाटतें, मीं कांहीं कोणाचा अपराध केला नाहीं. देवाचें काम करावयाला मी कोणाच्या बापाला भिणार नाहीं. तुमच्यानें काय करणें असेल तें करून घ्या.

**मंबाजी**–आणखी तोंड करून चबर चबर बोलतोस. मुसकाड रंगवीन तें ठाऊक नाहीं वाटतें? काय ह्मणे, मला कोणाच्या बापाची भीति नाहीं. बाप काढतोस काय हरामखोरा, बाप काढतोस बाप काढतोस, बाप बाप-बाप-( काठीनें तुकारामास मारितो.)

**तुकाराम**–नुसत्या काठीनेंच कां मारतां बुवासाहेब? शस्त्र घेतलेंत तर तुमच्या जिवाला इतके आयास पडणार नाहींत. शस्त्रानें तुकारामाचा हा देह जरी शतखंड झाला, तरी पांडुरंगाच्या कामाला मी मागें सरणार नाहीं. तुमच्या मारण्यानें मला काय होणार ! कृतांत कोपला तर माझा एक रोम सुद्धां वांकडा होणार नाहीं.

**मंबाजी**–बाप काढतोस,-बाप काढतोस-बाप-बाप-बाप ( आणखी काठीनें मारतो. )

**तुकाराम**–बुवासाहेब, तुमचा माझा बाप कांहीं निराळा नाहीं. तुमची आई तीच माझी आई. तुमचा बाप तोच माझा बाप.

**मंबाजी**–गाढवाच्या लेका, संसार बालविलास फुका, तूं कुणबट, मी पवित्र ब्राह्मण. तुझा माझा बाप एक काय ? बापाचें नांव काढलेंस तर आतां नरडीचा घोट घेईन.

**तुकाराम**–देवा ! पुत्राचा उत्कर्ष ऐकिला म्हणजे ज्याप्रमाणें मातेला आनंद वाटतो, त्याप्रमाणें माझें मन आनंदांत राहो. हरिण जसा नादलुब्ध होऊन देह विसरून जातो, तसा तुझ्या ध्यानानें मला या शरीराचा विसर पडो. या समयीं मला क्रोधाच्या हातून सोडवून घे. माझी वृत्ति शांत असूंदे. हे कामक्रोध पाण्याशिवाय बुडावितात, आगीशिवाय जाळतात, शस्त्राशिवाय मारतात, आणि चिखलाशिवाय गाडून टाकतात. ज्याप्रमाणें चंदनाचे मुळीला सर्पाचें वेष्टण असतें, किंवा गर्भाला गर्भवेष्टण असतें, तसें ज्ञान ह्यांनीं रोधलेलें आहे. ह्यांनां जर अंतःकरणांत थारा दिला नाहीं तर यांनां आपण अगदीं ठारच केलें ह्मणावयाचें. हे षड्रिपु जर जिंकले, तर ब्रम्हींचें स्वराज्यच प्राप्त झालें म्हणून समजा. गुरु–शिष्यांची गुप्त गोष्ट हीच असते. जीवब्रह्माचें ऐक्य तें हेंच.

**मंबाजी**–(हात चोळून) मारतां मारतां थकलों. फुग्याच्या वाडीच्या भामट्याचा अभ्यास किती दिवस केला होतात ? इतक्या काठ्या मारल्या पण हूं किं चूं नाहीं ! माझ्या मात्र हाताची आग व्हावयाला लागली. निर्लज्ज, बेशरम, कोडग्यासारखा हांसतो ! तुला लाज नाहीं वाटत ?

( जिजाई प्रवेश करते. )

**जिजाई**–आग लागो त्या ब्रम्हज्ञानाला. त्याचें एकदाचें वाटोळें कसें होईना ? लोक मला ह्मणतात, त्याला वेडा वेडा कां म्हणत असतेस ? आतां वेड लागायला कांहीं बाकी का राहिली? इतका मरे मरे तों मार खाल्लांत पण एक श्रीमुखांत कांहीं उलटी

भडकाविली नाहीं. नुसते दगड आहांत ! त्याला जसे किती मारलें तरी तो बोलत नाहीं, तसे तुम्ही आहां. एखादा असता तर या गोसावड्याची ही अशी दाढी उपटून (दाढी उपटावयास धांवते. ) हातांत देता. आपलाच दाम खोटा आणखी परक्याशीं झगडा करून काय उपयोग ? ( तुकारामाच्या अंगावरून हात फिरवून मंबाजीला उद्देशून) तूं कोडगा, तुझा बाप कोडगा, कोणालारे मेल्या कोडगा म्हणतोस ? ( मंबाजीची शेंडी धरून त्याला गरगर फिरविते. तुकाराम मंबाजीची सुटका करतो. मंबाजी पळून जातो. ) हात् तुझें कपाळ फुटलें मेल्या पळपुट्या ! मेल्याच्या हाताचे कोळसे झाले. तुमचे हात का कोणीं बांधले होते का ? तुम्हाला नव्हतें का उलट मारतां येत ? सगळ्या अंगावर वळ उठले आहेत. चला घरीं हळदबोळ घालतें.

**तुकाराम**–साधुसंतांना अशा शिव्या देऊं नयेत. त्यांची शेंडी अशी उपटूं नये. मारलें तर मारलें. काय हरकत आहे ? माझ्या मनाला क्रोध येतो कीं काय याची देवानें परीक्षा पाहिली. आज क्रोधाच्या हातून अजिंक्यपत्र मिळविलें. केवढी आनंदाची गोष्ट आहे ! अशा आनंदांत मी असतां तूं त्याची शेंडी उपटून त्याचा हिरमोड केलास हें फार वाईट केलेंस. शरीर काय आहे ? क्लेशाचा मळा, आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक ह्या तापत्रय अग्नीची शेगडी, मृत्युरूप कावळ्याला टाकलेला कागवळी, दुर्गंधीचें कोठार, रोगाचें भांडार, विटाळाचें भांडवल, विषयवासना तृप्त करण्याचें यंत्र, ह्मणजे नरकप्राप्तीचाच रस्ता, पू, हाड, मांस, जंत यांचा केवळ उकरडा, असलें हें शरीर याचा पुनः संबंध होऊं नये ह्मणुन तर कामक्रोधाचा त्याग करून देवाचें ध्यान करावयाचें. या शरीरावर माझें प्रेम नाहीं. या शरीराला कोणीही शिक्षा केली तरी मला वाईट वाटणार नाहीं.

**जिजाई**–पुरे झाली तुमची बडबड. घरीं चला ह्मणजे हळदबोळ घालतें अंगावर. ( तुकारामाला हातीं धरून घरीं नेते. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**–इंद्रायणी नदीचा डोह.

( तुकाराम अभंगाच्या वह्या व कर्जरोख्यांचें दफ्तर घेऊन प्रवेश करितो. )

**तुकाराम**–गरीब बिचारे शेतकरी ! त्यांच्या जमिनी, घरेंदारें, गुरेंढोरें गहाण लिहून घेऊन त्यांच्या तोंडाला पानें पुसून व्याजाचें व्याज करून आह्मी सावकार लोक आपलीं पोटें जाळतों. एखादी निराश्रित गाय जशी चिखलांत रुतून बसते, त्याप्रमाणें हे शेतकरी रिणानें गांजलेले असतात. पाऊस किती उत्तम पडो, पीक किती उत्तम येवो, सावकाराला एका पैशाचे दहा पैसे पोहोंचले किंवा एका मणाचे दहा मण दाणे पोहोंचले तरी त्याची कुळाकडची बाकी ह्मणून चुकती होतच नाहीं. तो त्याच्या बरावर जप्ती नेऊन त्याचीं गाडगीं मडकीं बाहेर काढील तेव्हां त्याला चैन पडेल. सर्पाच्या जातींत जसें फुरसें दुष्ट तसे सावकारांत मारवाडी दुष्ट. आह्मांला एक शेंडी तर या बेट्यांना तीन. आमच्या एका शेंडीला तेव्हांच गांठ देतात. हे कर्जरोखे आणि हीं गहाणखतें, या कबुलायती, आणखी या भाडेचिठ्या ही आमच्या बाबाची मिळकत आह्मी या नदीच्या डोहांत गहाण ठेवणार. बिचाऱ्या शेतकऱ्यांना या जाचांतून मुक्त करणार. ( स्वताचा रुमाल डोहांत फेंकून देतो ). आमचे कनिष्ठ बंधू कान्होबा यांना ही गोष्ट पसंत नाहीं. त्यांनां निम्मीं खतें वाटून दिलीं. आमचा कर्जदार पांडुरंग. त्यानें आपले पाय माझ्याजवळ गहाण ठेवून माझ्याजवळून भक्तीरूप ऋण घेतलें आहे. प्रेम हेंच व्याज. देवा आमचा हिशोब लवकर करा. रोज कीर्तन करून देवानें घेतलेलें माझें कर्ज मी वाढवीत आहें. तुझें नाम हेंच खत आहे. याला साक्षीदार श्रीगुरु आहेत. एक कलम आटपलें. आतां या अभंगाच्या वह्या–यांना खालीं वर चांगल्या दगडी चिपा घातल्या पाहिजेत, ह्मणजे पुनः वर येणार

नाहींत. ( तसें करितो. ) रामेश्वरभटाची आज्ञा हीच पांडुरंगाची आज्ञा. वेदावर अभंग केले, श्रुतीवर केले, संहितेवर बारा हजार, निरुक्त, निघंट, ब्रह्मसूत्र इत्यादिकांवर अभंग केले, भक्तीवर एक कोट अभंग केला, एक कोटी ज्ञानावर केला, पंचाहत्तर लक्ष वैराग्याचें वर्णन केलें, तितकीच नामाची स्तुति केली, साठ लक्ष अभंगांनीं जनास उपदेश केला, परमेश्वराचे स्वरूपाचें वर्णन तितक्याच अभंगांनीं केलें, आणखी आत्मानुभव एक कोट वर्णन केला. एकंदर पांच कोट एकावन लक्ष अभंगांच्या या वह्या आज स्वसंतोषानें कृष्णार्पण करितों. ( वह्या नदींत टाकतो. )

( महादेव व काशी प्रवेश करितात. )

**महादेव**-( घाबऱ्या घाबऱ्या ) बाबा, बाबा, मंबाजीबुवाची प्रकृति फार हैराण आहे.

**काशी**-अगदीं तरवणी सुद्धां घोटत नाहीं. असें ती आपली शेजारची ठमाबाई सांगत होती.

**महादेव**-त्यांच्या सर्व अंगास गळवाप्रमाणें ठणका लागला आहे असें ह्मणतात.

**तुकाराम**-मग आज त्यांच्या कीर्तनाचें कसें होणार ?

**काशी**-अंथरुणावर उठून बसावयाची त्यांना पंचाईत.मानेखालीं हात घालून उठवून बसवावें लागतें. कीर्तन कशाचें आलें आहे ?

**महादेव**-पण बाबा, त्याला एकाएकीं असें होण्याचें कारण काय असेल बरें ?

**तुकाराम**-मनुष्याचा काय नेम आहे. आतां आहे आणि घटकेनें नाहीं. हें जीवित अत्यंत क्षणभंगुर आहे. माशी जशी सहज उडून जाते, तसाच प्राण हा शरीराला सहज सोडून जातो. चला आपण त्याचे समाचारास जाऊं. ( जिजाई प्रवेश करिते. )

**जिजाई**-कशाला जायचें आहे समाचाराला? कालचे अंगावरचे वळ बुजाले का ? मेलं हाड म्हटलं तर कुत्रें सुद्धां फिरून घरीं येत नाहीं. आतां आलेत मेल्याचे हातपाय उरावर. काल काळ्या

मारतांना कांहीं कसूर केली का ? मरूं द्या त्या मांगाला. तो मेला ह्मणजे मी खडीसाखर वांटणार आहें. तें असूं द्या. पण कर्जरोखे आणि गहाणखतें कोठें आहेत ?

**तुकाराम**-समुद्रास्तृप्यन्तु केव्हांच झालीं ! आपल्याला खतापत्रांचा व सोन्यानाण्यांचा विटाळ हवा कशाला ? जितके म्हणून ह्या खतापत्रांच्या जाळ्यांत गुंतले ते परमेश्वराला मुकले. त्यांच्या हातीं अखेर भुसाचे लाडू आले.

**जिजाई**-तुम्हांला पैशाची गरज नाहीं, पण आम्हांला आहेना ! मिरच्यांचा व्यापार करण्याकरितां कोंकणाला गेलांत. मेलं तीन गोण्या मिरच्या बैलावर भरून दिल्या. पण पळस कोंकणाला गेला तरी त्याला तीनच पानें. मिरच्या विकल्या. कोण मेला विठुजी चाकर मिळाला होता त्यानें पैसे वसूल करून दिले. पुढें पैसे तरी नीट संभाळून आणावयाचे कीं नाहीं ? वाटेंत एक मंबाजीसारखा लुच्चा भेटला, त्यानें सोन्याचा मुलामा दिलेलीं पितळेचीं कडीं देऊन तेवढे पैसे उपटले. आपण आले घरीं नारळाची आई घेऊन ! पुनः मी जामीन होऊन माझे भाऊ श्रीमंत आहेत ह्मणून मी आपल्या हिमतीवर दोनशें रुपये कर्ज काढून दिले. महाडाला व्यापारासाठीं पाठविलें. कोण मेला ब्राम्हण खंडोबाचे माले मागत आला, त्याच्या गळ्यांत लांकडाचा नांगर अडकवलेला पाहिला. कुटुंबासहित भीक मागत होता. फार झालें तर चवलपावला देतें माणूस. तुह्मीं सगळे पैसे त्याला देऊन टाकलेत. त्याला जाचांतून सोडविलात. तुमची अक्कल जात चालली. धनाजी पाटलानें तुह्माला पाखरें राखण्याकरितां शेतावार राखणदार म्हणून ठेविलें, पण तुमच्या अकलेचे इतके तारे तुटले कीं, खरोखरच शेत पांखरांना खायला घालून तुम्हीं पांखरें मात्र राखिलींत, मरूं दिलीं नाहींत ! आहांत कीं नाहीं अकलेचे खंदक.

**तुकाराम**-या रडकथेची मला ओकारी आली. नेहमीं पैसे ! पैसे !! जों जों आपण संपत्तीच्या नादीं लागतों तों तों ती एका-

या तरुण लाजाळु मुलीप्रमाणें लाजून दूर पळत असते. संपत्तीचा नाद सोडला तर ती आपण होऊन गळ्यांत पडते लक्ष्मीची आशा केली कीं ती कधींही मिळावयाची नाहीं. तिच्याविषयीं निराशा असली कीं, तिच्या ठेंचा लागावयाच्या.

**महादेव**–चला आपण मंबाजीच्या समाचारास जाऊं. कीर्तनाची वेळ भरत आली.

**जिजाई**–तुम्हाला लौकिकाची कांहीं लाज आहे का? हो, बरी आठवण झाली. लोक कीर्तनाला गेले ह्मणजे त्यांचे जोडे संभाळीत असतां ! कीर्तनांत मशाल धरून उभे रहातां ! कोणी थकला भागला वाटसरू वाटेंत भेटला कीं त्याचें ओझें आपल्या डोक्यावर घेतां ? आपल्या घरांत अन्नान्नदशा, पण त्या वाटसराला आपल्या घरीं घेऊन येतां, कारण तो पंढरीला जावयाचा. चालून चालून त्याचे पाय दुखूं लागले तर रगडीत बसतां. ऊन्ह ऊन्ह पाण्यानें त्याचे पाय शेकीत बसतां. गाय बैल रस्त्यांत भेटलीं कीं त्यांना कुरवाळतां. मुंग्याचे बिळांतून तूप, साखर, मैदा एकत्र करून घालतां. आणखी गाढवाला सुद्धां पाणी पाजतां. चिंचवडकर मोरया गोसाव्याच्या घरीं गेलांत. विठोबा आणि गणपती तुमचे पंक्तीला गिळायला आले असें सारें जग म्हणत आहे. लोकांना बेधडक तुह्मी सांगतां कीं विठोबान् गणोबा एकच. (मोठ्यानें ओरडून) गणोबाला सोंड असते सोंड ! आणि विठोबाला तोंड असतें तोंड ! विठोबा काळा ! आणि गणोबा तांबडा ! ढेरपोट्या ! मोदकांचा काळ ! म्हणे दोन्ही देव एकच. दिवे ओवाळा दिवे ! तुमचा लौकिक अगदीं जात चालला.

**तुकाराम**–आम्हीं लौकिकाचें गाठोडें कधींच झुगारून दिलें आहे. गाढव जर ऊन्हांत तडफडून पाण्यावांचून मरत असलें तर त्याला पाणी पाजूं नये कीं काय ? आपल्या जीवांत आणखी त्याच्या जीवांत काय फेर आहे ? तुझ्या बडबडीचा आम्हांला कंटाळा आला. महादेव, काशे, चला आपण कीर्तनाला जाऊं.

**जिजाई**–माझें सगळें ऐकून घ्या. मग मला आठवण रहात नाहीं. दम खा जरा माझेंच कीर्तन ऐका अगोदर. कोणी एक मेली ब्राम्हणाची म्हातारी बाई आली, तिचें तेल बाजारांतून आणलेंत. तिनें गांवांत पिकविलें कीं, या वेड्याचा हात एकदा भांड्याला लागला म्हणजे भांड्यांतलें तेल संपतच नाहीं. बरें जर असें असतें तर मग आमच्या घरचें धान्य कां संपतें? तेलाप्रमाणें धान्य कां नाहीं वाढत? गांवांतल्या सगळ्या गाडीवानांनीं या पिशाच्याच्या गळ्यांत तेलाचे नळे अडकवले. चांगले एका बैलाचें ओझें दिलें, आणखी दिला गांवांत पिटाळून तेल आणावयाला. त्यांत मेला तो मंबाजी बोकड सुद्धां होता. इथल्या लोकांनीं माझ्या नवऱ्याला अगदीं वेडा करून टाकला आहे. माझा नवरा, त्यां चीं कामें करून एकदां मेला ह्मणजे सगळ्यांना संतोष होईल.

**तुकाराम**–चल महादेव, हें येरंडाचें गुऱ्हाळ लवकर आटपणार नाहीं.

**जिजाई**–गुरासारखें धोपटलें असून तुमच्या अंगावरचे वळसुद्धां जिरले नाहींत, आणखी पुनः बेशरमासारखे त्याच्या समाचाराला जातां! मला तुमचा कसा संताप संताप येतो! (तुकाराम हांसतो.) पण तुमचा संताप अगदींच जळालेला. मंबाजीनें मारल्याबद्दल तुम्हांला त्याचा सूड नाहीं का उगवायचा?

**तुकाराम**–संतापाचें झाड जळून गेलें. तुझ्याच तोंडानें न्याय झाला. मग आतां सूडाचीं फळें कोठून येणार? (जिजाईचा हात धरून) चल आपण मंबाजीच्या समाचारास जाऊं.

**जिजाई**–चला व्हा घरीं. मंबाजी जाईना का तिकडे उलथून.

(जिजाई तुकारामास घराकडे ओढते. तुकाराम, महादेव, व काशी एकीकडे ओढतात. पडदा पडतो.)

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ** मंबाजीचें घर.

( मंबाजी कण्हत अंथरुणावर पडला आहे; एकदोन शिष्य जवळ बसले आहेत. )

**मंबाजी**–मेलों! मेलों!! मेलों!!! काय या माझ्या अंगाला कळा लागल्या आहेत! अग बया, बया, बया! आतां मी काय करूं! अरे तुकारामा! तुझा मीं मोठा अपराध केला! तुला मीं विनाकारण मारलें! तुझा विनाकारण छळ केला! देवानें मला योग्य शिक्षा केली! आतां कांहीं मी जगत नाहीं. आतां मरतों! एकदम प्राण जातील तर बरें! या यातना आतां सहन करवत नाहींत. सगळें माझें अंग दगडाप्रमाणें बधिर होत चाललें आहे! सगळ्या अंगांतून शिलका निघत आहेत! नारायणा! आतां तुकारामाचे पाय माझ्या कशानें दृष्टीस पडतील! त्याला शरण गेल्याशिवाय या माझ्या शरीरांतील वेदना नाहींशा होणार नाहींत! तुकाराम महा वैष्णव! मोठा संत! मी पापी! दुराचारी! अधम! चांडाळ! माझ्यासारखा दुष्ट मनुष्य साऱ्या त्रिभुवनांत सांपडणार नाहीं! जन्मापासून दुष्कर्मै करीत आलों! सत्य आचरण स्वप्नांत सुद्धां माहीत नाहीं! नेहमीं विषयावर चित्त, कधीं परोपकार ठाऊक नाहीं! ( एक शिष्य ताटांतील फराळाचें खातो. )

**भटंभट**–कायरे कोल्हंभट, बुवांचें फराळाचें खातोस काय? बुवा आजारी पडले आहेत, नाहींतर सांगितलें असतें कसें कायतें.

**कोल्हंभट**–भटंभट, तूं अगदींच मूर्ख आहेस. बुवा आजारी पडले आहेत तों बुवाकरितां आणलेले मिष्ट मिष्ट पदार्थ खाऊन आपण पुष्ट व्हावें. मग बुवासारखे गलेलठ्ठ बनलों कीं पुढें बुवाचें दुष्ट वरदान चालवायला आपलें ठीक.

**भटंभट**–दांडगेश्वर आहेस. तें असो; पण कायरे, आतां बुवांचें कसें काय होईल?

**कोल्हंभट**–काय व्हावयाचें आहे ? बुवा लागले आहेत आतां पंथाला; पण गादीवर आतां कोणाला नेमावयाचें तें आतां कांहींच ठरवीत नाहींत. तुला कीं मला ?

**भटंभट**–मला फार रडूं येतें. ( रडत रडत ह्मणतो. ) बुवासारखें मनुष्य पुनः दिसणार नाहीं.

**कोल्हंभट**–बुवा का फार सुंदर होते होय! पण अजून कांहीं बुवा वारले नाहींत, तों इतका चौपदरी गळा काढून रडूं नकोस.

**भटंभट**-तुझें नांवच कोल्हंभट, कोल्ह्याची जात लुच्ची असते ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं.

**कोल्हंभट**–कोल्ह्यापेक्षां मनुष्याची जात लवाड असते. सर्व जातींत ब्राह्मण लवाड, सर्व ब्राह्मणांत भट लवाड ह्मणजे हुशार आणखी त्या भटांचे तुम्ही भट, ह्मणून तुमचें नांव भटंभट. नेहमीं अंबट खाणारे. ( तुकारामाची बायको प्रवेश करिते. )

**जिजाई**–का मंबाजीबुवा, आतां कसें काय वाटतें ? माझ्या नवऱ्याला मारतांना कांहीं तुमचे हात दुखले नसतील बहुतकरून! या हातावरचे झाडे या हातावर येण्याला उशीर लागत नाहीं. समजलांत? करावें तसें भरावें. त्यांनीं तुझा अपराध तरी केला होता काय? अजून तुझी रग चांगली जिरली नाहीं, अजून जिरावयाची आहे. सुंदराजीला माझ्या नवऱ्याला नादीं लावण्याकरितां तूंच पाठविलें होतेंस नाहीं का? पुढें तिनें तुझी फजिती केली. तूं तिचे पायां पडलास. आम्हांला सर्व कळलें. असाच का तूं बुवा? असेच का तुम्ही संत? मग माळा कशाला वालतां शेण खायला ?

**मंबाजी**-या सर्व अपराधांचें आतां मला चांगलें प्रायश्चित्त मिळालें. आतां माझे मनांत तुकारामाच्या सद्गुणांचा चांगला प्रकाश पडला. परमेश्वरानें माझ्या अपराधांबद्दल मला योग्य प्रायश्चित्त दिलें.

**जिजाई**–अभंगांच्या वह्या रामेश्वरभटाला सांगून तूंच पाण्यांत

बुडविल्यास नाहीं का? माझ्या नवऱ्याचा हात कलम करणार होतास नाहीं का? त्यांनीं अभंग केले ह्मणून तुझ्या बापाचें काय गेलें? ह्मणे त्यांत श्रुतीचे अर्थ उमटतात. तुझ्या बापानें कधीं श्रुति पाठ केली होती काय? ह्मण पाहूं वेदांतली एखादी ऋचा. (मंबाजीचें डोकें हालविते व उभयतां शिष्यांस उद्देशून ह्मणते.) कायरे भटुरड्यांनों, तो मंबाजी मरतो आहे, आणखी तुम्ही इकडे फराळावर हात मारतां काय? पुनः माझे नवऱ्याचे वाटेस जाशील का? (मंबाजीचे कान उपटते.) मारूं का श्रीमुखांत. (दोन चार गुद्दे पाठींत मारते, शिष्य सोडविण्यास जातात त्यांसही मारते.) ब्राह्मण कशाला झालास तुला जर वेदाचें एक अक्षरही येत नाहीं तर? ठोंब्या मेला!

**कोल्हंभट**–तुम्हाला तुकारामानें मंबाजीबोवाचा समाचार घेण्यास मुद्दाम पाठविलें आहे असें दिसतें.

**जिजाई**–नुसता मंबाजीचाच काय पण तुमचाही समाचार घेतें. (त्यांस मारावयास धांवते. ते इकडे तिकडे लपून बसतात. इतक्यांत तुकाराम आला असें पाहून पळून जाते.)

**मंबाजी**–तुकाराम, तुला हा मंबाजी अनन्यभावानें शरण आहे. मी अत्यंत अपराधी आहें, तुझा मीं जो विनाकारण छळ केला, त्याचा मोबदला मला यथायोग्य मिळत आहे. (उभयतां एकमेकांचे पायां पडतात. तुकाराम मंबाजीचे पाय रगडतो, त्यास मंबाजी प्रतीकार करतो.)

**तुकाराम**–बोवासाहेब, मीच तुमचा अपराधी आहें. मीं विनाकारण तुमचा भोपळीचा वेल दुखविला, नाहीं तर मला मार मिळाला नसता. शिवाय मीं ह्मटलें कीं, देवाचें काम करण्यास मी कोणाच्या बापास भिणार नाहीं, त्यामुळें तुह्माला वाटलें कीं यानें माझाच बाप काढला, आणि संतापानें मला तुह्मीं मारलें, यामुळें तुह्माला फार श्रम झाले! मोठी तसदी पडली! अस्तु. तुमच्या सर्वांगास आतां कळा लागल्या आहेत हें पाहून मला फार वाईट वाटत आहे. मी जरा तुमचे पाय चेपतों, ह्मणजे तुह्मांला आराम वाटेल.

**मंबाजी**–अहाहा ! तूं प्रत्यक्ष धन्वंतरी आहेस. तुझ्या हाताचा स्पर्श या माझ्या शरीरास झाल्याबरोबर माझ्या अंगांतील सर्व कळा नष्ट झाल्या. मला परम सुख वाटतें आहे. आजपावेतों तुझा मीं विनाकारण छळ केला, त्याचें प्रायश्चित्त परमेश्वरानें मला दिलें. तुझ्यासारखा सत्पुरुष माझ्या संगतीला असून मीं व्यर्थ दिवस घालविले. मला आतां शिष्यशाखा नको. कांहीं नको. तुझ्याबरोबर आळंदीपंढरीच्या वाऱ्या करून सुखानें दिवस घालवीन. ( शिष्यांस उद्देशून ) अरे मुलांनों, तुम्ही आपापल्या घरीं स्वस्थ निघून जा.

**कोल्हंभट**–म्हटलें बुवांची गादी आपण कांहीं दिवस चालवूं; परंतु बोवांनीं गादीच काढून टाकिली. असो; भटंभट, चला हें फराळाचें घेऊन नदीवर. तेथें खाऊन पाणी पिऊन घटकाभर विश्रांति तरी घेऊं. ( जातात. )

**मंबाजी**–तुकारामा, मीं तुला इतकें मारलें असून तूंच होऊन माझ्या समाचारास आलास, माझ्याशीं गोड गोड बोलतोस, माझें अंग ठणकतें म्हणून तुला वाईट वाटून तूं चेपतोस, माझें सर्वस्वी समाधान करितोस. ही तुझी साधुवृत्ति पाहून तूं मला प्रत्यक्ष देव वाटतोस. सुंदराजीला पाठवून मींच तुझें सत्व हरण करण्याचा प्रयत्न केला. पण मला यश आलें नाहीं. तुझ्या उपदेशानें सुंदराजीची वृत्ति पालटून उलट तीच मला उपदेश करूं लागली. कामक्रोधाला तूं बंदीखान्यांत टाकलें आहेस. आह्मी इंद्रियांनीं दीन केलेले असून तूं त्यांचा धनी आहेस. तूं त्यांना आपल्या ताब्यांत ठेविलें आहेस, तस्मात् तुझ्यासारखा पुरुष त्रिभुवनांत नसेल.

**तुकाराम**–माझी स्तुति विनाकारण करूं नका. मी अत्यंत मूढ आहें. तुह्मास आतां बरें वाटत असल्यास कीर्तनास उभे रहा. मी तुमचें ध्रुपद धरितों.

**मंबाजी**–फार उत्तम. माझी प्रकृति आतां उत्तम झाली आहे. चला. ( उभयतां मित्रांप्रमाणें गळ्यास मिठी मारून जातात. )

तिसरा अंक समाप्त.

# अंक चवथा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**–पुणें येथील शिवाजीमहाराजांचे वाड्यासमोरील पटांगण.

( गोप्या व गण्या हांसत व उड्या मारीत प्रवेश करितात. )

**गोप्या**–लई मजा होती राव इचेभन.

**गण्या**–बसायला घोडा!

**गोप्या**–पायामंदी ऐटदार तोडा!

**गण्या**–पाठीला ढाल!

**गोप्या**–कंबरला तलवार!

**गण्या**–गळ्यामंदी मोत्यांचा हार!

**गोप्या**–डोईला मंदील भरजार!

**गण्या**–आन बायकाबी सरकारान दिल्या गुलजार! लई गम्मत व्हती इचेभन!

**गोप्या**–या गोप्याच्या नशीबाबराबर कुनाचबी नशीब नव्हत!

**गण्या**–कस गडी मर्दावानी दिसत व्हत.

**गोप्या**–सरकारच लइ लाडक, म्हुनशान संमद लोक हंग अस्स राम राम करीत व्हत!

**गण्या**–ते संमद खर, पन दादा सरकार गेल्यापुन अक्षी वंगाळ झालया. कुनालाबी चैन नाहीं बगा! थोरल्या आईसाब बी तकडच, बाईसाब बी तकडच, रंगुबाई तकडच, गंगुबाई तकडच, तानाजीराव तकडच, पंडितराव तकडच, आन सरकारबी तकडच.

**गोप्या**–मंग आपुन तरी हकड कशाला ऱ्हाव, आपुनबी जाव तकडच.

**गण्या**–पन सरकार डोंगरांत गेल्याती.

**गोप्या**–आपुन बी राव तकडच जानार.

**गण्या**–मला आन ग्वाड लागत नाहीं.

**गोप्या**–मला बी लागत नाहीं.

**गण्या**–मला पानी बी ग्वाड लागत नाहीं !

**गोप्या**–मला बी लागत नाहीं.

**गण्या**–मला झ्वाप येत नाहीं.

**गोप्या**–मला बी येत नाहीं.

**गण्या**–सरकार आन बाईसाब माझ मायबाप हायेती.

**गोप्या**– माजबी हायेती.

**गण्या**–मग आई जर आपल्या तान्ह्या लेकराला सोडुनशान गेली, तर मंग ते मरून न्हायीका जानार ?

**गोप्या**–आन डोंगरांत जाऊन सरकारच्या पायावर डोक ठेवनार.

**गण्या**–आन् सरकाराला घरीं घेऊन येनार.

**गोप्या**–मंग जें व्हनार असल तें व्हईल.

**गण्या**–चला आपुन डोंगरांत जाऊं. ( जातात. अरण्याचा पडदा पडतो. शिवाजी जप करीत बसला आहे. )

**शिवाजी**–कालपासून खायला कांहींच मिळालें नाहीं. भुकेच्या तीव्र यातना कशा असतात हें मला आज चांगलें समजलें. या पोटानें सर्व जग व्यापलें आहे. दुसऱ्याची चाकरी करावयाची पोटासाठीं, दुसरा खेटरें मारीत असला तरी पोट हांजी हांजी करावयाला लावतें. लबाड बोलावयाचें पोटासाठीं. चोरी चहाडी करावयाची पोटासाठीं. दुसऱ्याचे जीव घ्यावयाचे पोटासाठीं. हर हर ! देवा हें पोट साधुसंताला आडवतें ह्मटलें तरी चालेल. नुसत्या विवेकानें पोट भरत नाहीं. दोनप्रहरची वेळ होऊन जठराग्नि एकदां प्रदीप्त झाला ह्मणजे विवेक सुचत नाहीं, वैराग्य सुचत नाहीं, ज्ञान सुचत नाहीं, आणखी भक्ती सुचत नाहीं. विवेकानें कामक्रोध आवरण्याचें सोपें, पण अन्नपाण्यावांचून

राहणें कठीण. मिष्टान्न नाहीं तर भाजीभाकर, भाजीभाकर नाहीं तर फळेंमुळें, फळेंमुळें नाहीं तर वनस्पतीचा पाला उकडून ह्मणा, नाहीं तर कच्चा खाऊन या वीतभर पोटाची खांच भरलीच पाहिजे. तुकोबाचे कीर्तनाला रोज जातों. त्यांचें तरी नेहमीं ह्मणणें काय असतें. "पोटासाठींगा झालों पांगिला जना" "पोट लागलें पाठीशीं हिंडवितें देशोदेशीं" हें सर्व खरें. पण मी ह्मणतों या पोटाला रोज अच्छेर अन्न असलें ह्मणजे बस्स आहे. पण आह्मी पहा स्वताचे चैनीकरितां, स्वताचे ऐषआरामाकरितां, आणखी स्वताच्या इच्छा तृप्त करण्याकरितां दुसऱ्याचा छळ करून लाखों रुपयांचा फन्ना उडवतों. वास्तविक ज्याची गरज नाहीं अशा शेंकडों गोष्टींची महत्वाकांक्षा उत्पन्न होऊन आपल्या जीवाला व्यर्थ कष्ट देणें यासारखा मूर्खपणा कोणताच नाहीं. (डोळे मिटून बसतो.)

(गण्या व गोप्या फळें घेऊन प्रवेश करितात.)

**गोप्या**–भर्र, भर्र, वारा काय वाहतोया ?

**गण्या**–गडगडगड गड, आभाळामंदी म्हातारी हरभर भरडतीया ?

**गोप्या**–आक्शी मामांजी तुम्ही पळापळा आन् मी येते सळा सळा. अक्शी चळकावर चळका येत्याती.

**गण्या**–आज पाऊस बी लई पडतोया.

**गोप्या**–पावसांत भिजूनश्यानी थंडीन लई काकडुन गेलोया.

**गण्या**–देवा आता सरकारची आन् आमची कसी तरी एकदा गाठ पडुंदे

**गोप्या**–संमदा डोंगर हिंडलो पन सरकार कुठ गवसत नाहींत.

**गण्या**–रानामंदी कशी नामी नामी फळ गवसलेती, आन् फुलबी गवसलेती. ह्मटल सरकारांची पुंजा करू फुलान.

**गोप्या**–आन् ह्या फळाचा सरकाराला निवेद दाऊं.

**गण्या**–पन सरकार कुठबी गवसत नाहींत.

**गोप्या**–सरकार गवसल न्हायी तर आपुन हा पराण ठिवनार

न्हायीं इचेभन. ( लांब पाहिलेसें करून ) पन गड्या, त्या पल्याडल्या डोंगरावर झाडाखालीं कोन बसलयारे ?

**गण्या**–अहारे माझ्या नशीबा ! हे तर आमच सरकार ! कसल वंगाळ कपड अंगावर घातलेती !

**गोप्बा**–अक्षी मी तर् वळखले सुधा नाई.

**गण्या**–त्यांड लई सुकुनश्येनी गेलया.

**गोप्या**–डोळ मिटूनश्यान बगळ्यागत बसलेती.

**गण्या**–ध्वाप घेत्याती मला वाटत.

**गोप्या**–सरकार, सरकार, मायबाप, मायबाप–

**गण्या**–धनीसाब, आनदाता, ( शिवाजी डोळे उघडतो. )

**शिवाजी**–गोप्या ! गण्या ! अरे तुह्मीरे कोणीकडे हिकडे !

**गोप्या**–सरकार तुमचा सबुद लई ख्वाल गेलाया.

**गण्या**–तुह्माला लई भूक लागलीया.

( शिवाजीच्या गळ्यांत फुलांचे हार घालतात व फळें पुढें ठेवितात. )

**गोप्या**–सरकार आमची गरीबाची पुंजा. सरकारांनीं मानुनश्यानी घ्यावी. दुरपतीबाईच एक भाजीच पान कृष्णादेवाला आवडल तस आह्मी आणलेली फळ सरकाराला ग्वाड लागुंदे देवा.

**गण्या**–सरकार अदुगर ही फळ खा, मंग आम्हासंग ब्वोला.

**शिवाजी**–काय चमत्कार आहे ! या जगांत देव कोणालाही उपाशी ठेवीत नाहीं. एक त्याच्यावर विश्वास असला ह्मणजे बस्स. तो आपला योगक्षेम चालवितो. माझी बालंबाल खात्री झाली. मी भुकेनें अगदीं व्याकूळ झालों होतों, इतक्यांत देवानें मला हीं फळें पाठवून दिलीं !

**गोप्या**–सरकार देवान कशाची म्या आनल्याती.

**गण्या**–त्यातली निम्मी म्या आनल्यात. माझ्या पायामंदी काट मोडल्याती.

**गोप्या**–सरकार ह्मनत्याती देवान आनल्याती, पन देव तर इचेभन आपल्या देव्हाऱ्यामंदी बसल्याती.

**शिवाजी**–फळें आंबट आहेत कारे? अरे, ह्या फळांचे असे दातांनीं तुकडे कोणीं तोडले आहेतरे? ह्याला का पांखरांनीं चोंच्या मारल्या आहेत कायरे?

**गण्या**–सरकार चिमनीच्या दातान थोडी थोडी कुरतडल्याती. हंग ही अस्सी कुरतडली (फळाचा तुकडा तोडून दाखवितो.) म्या काय उष्ट न्हायी केल. म्हटल सरकारासनी खायची, तवा आंबाट हायती, का कडु हायती, का तुरट हायती, का ग्वाड हायती? आपल्या पायाच्यान म्या काय उष्टी न्हायी ती केली.

**शिवाजी**–(हांसतो.) हा मूर्खा! उष्टीं नाहीं केलीं तर काय? थोडीं थोडीं खाऊन पाहिलीं होय? आतां ह्याचा देवाला नैवेद्य कसा दाखवावा?

**गोप्या**–सरकार तुमच्या निवेदाला आनल्यातीन् देवाच्या बाच हिथ काय?

**शिवाजी**–गाढवा असें म्हणूं नये. (गोप्या तोंडांत मारून घेतो.) रामांनीं भिल्लिणीचीं उष्टींच बोरें खाल्लीं होतीं. श्रीकृष्ण परमात्म्यानीं गवळ्यांच्या पोरांच्या तोंडांतल्या ताकाच्या गुळण्या फार गोड लागतात म्हणून आपल्या तोंडांत घेतल्या. मी जातीचा मराठा आणि हीं माझ्यावर भाव ठेवणारीं मुलें जातिवंत मराठ्यांचींच आहेत. मी यांचीं उष्टीं फळें खाणार. फार तर काय, पण मी जर ब्राह्मण असतों, आणि मला कोणी एखाद्या कुणब्यानें सद्भावानें असली देणगी आणून दिली असती तरी सुद्धां मीं खाल्लीं असतीं. (फळें खाऊं लागतो.) अहाहा! हीं फळें अमृतासारखीं गोड आहेत! यांच्या पुढें पक्वान्नें रद्द आहेत. उघडच आहे कीं, पक्वान्नें मनुष्यांनीं केलेलीं असतात, फळें आणि फुलें ईश्वरनिर्मित असतात. तुम्हांला या वेळीं बक्षीस काय देऊं रे? (दोघे सरकारच्या पायां पडतात.) अरे, काय पाहिजे तें मागा.

**गोप्या**–देवाला निवेद दावला म्हंजी मग देवाच्या पाया पडाव लागत की न्हायी? तस आम्ही सरकाराच्या आता पाया पडतो.

आन सरकारच्या पायापाशीं इनती करतो कीं, सरकाराची कामगिरी बजाविली यांत बक्षीस काय म्हून मागायच ?

**गण्या**–पायाप मागन इतकच हाय कीं, सरकारानीं घरापोत चलाव. थोरल्या आईसाब रडत्याती, बाईसाब रडत्याती, रंगूबाई रडत्याती, गंगुबाई रडत्याती, तानाजीराव रडत्याती, पंडितराव रडत्याती.

**गोप्या**–सरकार आपुन आम्हासनी शिकवित व्हता कीं, आइच ऐकाव म्हुनश्यान, आन् आता सरकारच आइच ऐकत न्हायिती. तवा सरकाराला आता काय शासन कराव ? आन कुनी कराव ?

**शिवाजी** -काय लबाड आहेतरे हे ! गण्या, गोप्या, तुमचें बोलणें मला फार आवडतें.

**गोप्या**–आपुनबी आईला आन् बायकुला सोडुनश्यान सरकाराच्या पायाप हिथच डोंगरात राहणार.

**गण्या**–सरकार घरी आल्याविना आपुन घरी जानार नाहीं. घरी जाव तो इचेभन संमदी मानस रडत्याती. पागतली घोडी बी रडत्याती, चारा खात न्हायिती. गाई वासर हंबरत्याती चारा खात न्हायीति. त्यांच्या डोळ्यामंदुन पान्याच्या धारा लागत्याती. पाखर सुद्धा सरकार चोचीत चारा घेऊनश्यान उगच बसत्याती. वाड्यामंदी संमद भयान दिसतया. अंधार झालाया. आपुन आल्याबिगर उजेड पडायचा न्हायी.

**शिवाजी**–तुम्हांला कोणी पढवून पाठविलें आहे कायरे ? अगदीं शिकविल्यासारखें बोलतां तें ? तुमच्या भाषणानें माझ्या मनाला मोह उत्पन्न होतो; पण हें कांहीं बरोबर नाहीं. तुह्मी दोघे येथून चालते व्हा.

**गोप्या**–सरकार आम्हा गरीबावर असं कश्यापायी रागावता ?

**गण्या**–मायबाप. आई जर तान्ह्या लेकराला सोडुश्यान ग्येली तर ते लेकरू कस जगल ? राजा जर आपल्या लोकाला सोडून श्यान गेला तर त्या लोकाला कुनीबी लुटूनश्यान नेईल. समद्या लोकाच नाक राजा हाये.

**शिवाजी**–तुह्मांला कोणीं इकडे पाठविलें रे? खरेंच सांगा. माझ्याजवळ चोरलें तर खबरदार.

**गोप्या**–सरकार, बाईसाब कायी आन खात न्हायिती. त्यांची तुह्मांला दया येऊंद्या. त्या कायी जगायच्या न्हायिती. त्यांच आपल्यापाशी अस मागन हाय कीं, एकदा या पायाच दर्शन देऊन आपल्या हातान एकदा माझ दोन तुकडे करून टाका. ( रडत रडत ) असला निरुप सांगायलाबी आम्हाला रडु येत.

**गण्या**–सरकार न्हायि तर ही घ्या कटार, आन् जर तुह्मी परत येत नसताल, तर आमची हिथच खांडुळी करून टाका. ह्मंजी आम्हाला ही काळी त्वांड घेऊन बाईसायबाकडे जानबी नग.

**शिवाजी**–अरे लुच्चांनो, तिनें तुम्हाला पढवून पाठविलें आहे नाहींरे? चालते व्हा तुम्ही दोघे येथून. मी साफ घरीं येत नाहीं. कारे, तिची आणि तुमची कोठें गांठ पडली?

**गोप्या**-त्या पल्याडल्या खिंडीत पडली. त्यानला आतां काय निरोप जाऊन सांगू. त्यानला हे त्वांड कस दावाव? सरकार, आम्ही आपल्या बायका अशा सोडूनश्यान गेलों असतों तर सरकारानीं आमची चामडी लोळवली असती.

**गण्या**–पन आतां सरकारची चामडी कोन काढनार है. थोरानीं खाल्ल म्हंजी औषधाला खाल्ल, आन् गरीबान खाल्ल म्हंजी भर केली पोटाची.

**शिवाजी**–तुम्ही तिला असें सांगा कीं, मला तुझी गरज नाहीं. राज्य मिळविण्याची गरज नाहीं. प्रत्यक्ष मला माझ्या आईबापांची सुद्धां गरज नाहीं. आतां तुम्ही म्हणतां कीं ती कांहीं खात नाहीं, आणखी पाणीही पीत नाहीं, त्यास तिला असें सांगा कीं, तूं असे कडकडीत उपास काढूं नको. अशा करण्यानें माझें मन वळावयाचें नाहीं. ही माझ्या हातांतील आंगठी तिला द्या. हिच्यावर माझें नांव आहे. जोंपावेतों माझी आणि तिची गांठ पडली नाहीं

तोंपावेतों तिनें या आंगठीकडे पाहून माझें स्मरण करीत असावें. ( आंगठी मुलांच्या हातीं देतो. )

**गण्या**–सरकार मी असला निरोपबिरोप कायी सांगायचा न्हायी.

**गोप्या**–सरकार येत नसत्याल तर हीं कट्यार आम्ही आपल्या उरांत भोसकून घेतों. बाईसायबासनी आह्मी अस सांगितल कीं, सरकाराला आनल्याबिगर त्वांड दावनार नाहीं.

**शिवाजी**–घे कट्यार कशी भोसकून घेतोस पाहूं.

**गोप्या**–गण्या तुझ्या अदुगर मी भोसकून घेतो.

**गण्या**–चल हट, तू लांब बस. अदुगर हा मर्द सरकाराच्या पायाप हा जीव ठेवनार.

( उभयतांची आवेशानें झटापट लागते. शिवाजी भांडण सोडवितो. )

**शिवाजी**–( एकीकडे ) कसें नशीब आहे ! पुनः पुनः मला मोहपाशांत गुंतवीत आहे. पण मी आतां साफ भुलणार नाहीं. या मुलांना मीं जर आतां होय ह्मटलें नाहीं, तर हीं मुलें छातींत कट्यार भोंसकून प्राण सुद्धां देतील. आतां याला काय युक्ति काढावी ?–हं ठीक ही युक्ति बरी आहे. यांना डोंगरांत झुकापुरी देऊन कोठें तरी निघून गेलें पाहिजे. ( उघड ) चला मी तुमच्याबरोबर घरीं येतों. मग तर कांहीं हरकत नाहींना ? ( त्रिवर्ग जातात. )

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—अरण्य.

( सईबाई प्रवेश करिते. )

**सई०**–एका जन्मावरून तीन जन्मांची परीक्षा होते. पूर्वजन्मीं मीं कोणाचें तरी लग्न मोडलें आहे, किंवा नवराबायकोचीं मनें एकमेकांविषयीं कलुषित करून त्यांची ताटातूट केलेली आहे, नाहीं तर साधुसंतांचा छल केला असेल. कांहीं तरी घोर पातक माझ्या हातून घडल्याशिवाय परमेश्वरानें माझी आणखी इकडची

तातातूट केलेली नाहीं. या जन्मीं जर मीं सत्कृत्यें केलीं असतील, अनाथ दुबळ्यादिकांचीं कार्यें केलेलीं असतील, गोब्राह्मणांचें प्रतिपालन केलेलें असेल, श्रीशंकर आणखी श्रीविष्णु यांच्यांत भेदाभेद पाहिला नसेल, आणखी कायावाचामनेंकरून जर पतिव्रतेच्या धर्माप्रमाणें वागलें असेन, तर मला पायाचें दर्शन लवकर होईल. आतां मला एकेक पळ युगाप्रमाणें वाटतें आहे. भुकेनें प्राण व्याकुळ होत आहेत. चालून चालून जीव थकून गेला. आतां एक पाऊल टाकण्याची सुद्धां शक्ति राहिली नाहीं. म्हटलें तीं दोन मुलें–गोप्या आणखी गण्या,–माझी झालेली ही दीन अवस्था तिकडे कळवतील. कदाचित् दया आली तर आली, म्हणून सकाळपासून शोधाकरितां पाठवलेलीं आहेत. पण त्यांचा अजून कांहीं ठिकाण नाहीं. देवा, एकदां माझी गांठ पडूंदे, म्हणजे माझा त्याग करून कसें जाणें होतें तें पहातें. ( गण्या व गोप्या प्रवेश करितात. )

**गण्या**–अगदीं आपल्या मागुनश्यानी येत होते.

**गोप्या**–आन् येकायेकीं जनु गडप झाले !

**गण्या**–आतां बाइसाहेबाला कस तोंड दावाव ?

**गोप्या**–सरकारच्या मनामंदी मुळींच यायच नव्हत. पन आपुन परान द्यायाला तयार झालों, म्हुनशान आपल्या संग आल. आन् दिली राव झुकापुरी डोंगरांत, आन् हाय काय ?

**गण्या**–आह्मासनी मुलासनी सरकारानी फसवाव हा कांहीं चांगला इचार नाहीं. ( सईबाईचे जवळ येतात व सईबाईच्या पायां पडतात. )

**सई०**–कायरे गण्या, गोप्या, मोठी प्रतिज्ञा करून गेला होता नारे ? मग बरोबर आणल्याशिवाय परत कसेंरे आलांत ? (दुःखानें) तुमच्याकडे तरी काय दोष आहे ? माझ्या कर्मांत जें लिहिलें असेल तें ब्रह्मदेवालासुद्धां टाळतां येणार नाहीं. तुमची येण्याची मी

पांखराप्रमाणें वाट पाहत होतें. पण तुह्मी एकटेच आलांत, हें पाहून माझ्या आशेची निराशा झाली.

**गोप्या**–बाईसाहेब आह्मी त्यांना आपल्या संग घेऊनशान् आलो होतो. आमच्या दोघांच्या मागोमाग चालत होते. इतक्यामंदी एकाएकीं जंगलामंदी आह्मासनी झुकापुरी देऊन गेले निघुनशान् त्याचा पत्ता नाहीं.

**सई०**–तुमच्याबरोबर येण्याला कांहीं आढेवेढे घेतले कारे ? का बोलावल्याबरोबर लागलीच येतों ह्मणाले ?

**गण्या**–इतक अर्जव कराव लागल कीं काइ बोलायची सोय नाहीं बुवा. तें ह्मंगाले साफ येत नाहीं. तुह्माला सांगाव कीं मला तुमची गरज नाहीं. आईबापाची गरज नाहीं. कश्याची गरज नाहीं. मग जव्हा आम्ही दोघजन त्यांच्या पायावर खंजीर भोसकुन जीव द्यायाला लागलो, तव्हा म्हंगाले “ चला मीं येतो तुमच्या संग. ”

**सई०**–माझ्याबद्दल त्यांच्या मनांत अगदीं काडीभरसुद्धां दया, माया कांहीं राहिली नाहींनारे ? प्रत्यक्ष आईबापांचीसुद्धां गरज नाहीं म्हणतात. तिथें मला कोण विचारतो ? प्रारब्ध आपलें ! देवा, मला संसारसुखाचा कांहीं तरी अनुभव आहे कारे ? पति विरक्त होतात, पण केव्हां, बायकोच्या ऋणांतून मुक्त झाल्यावर. आमचें सगळेंच विपरित. माझ्या सुखास पारावार नव्हता. अगदीं कांहीं खूण पत्र कांहीं दिलें नाहींनारे ?

**गोप्या**–होय बाईसाहेब. त्यांनीं आपल्यासनी ही आंगुठी दिलेली हाय. आन् असा निरोप सांगितलाय, तुम्हासनी रडायच काम नाहीं. तुम्ही आनपानी खुशाल खात जाव. उपास केल्यान आम्ही तुम्हास भेटायच नाहीं.

**गण्या**–आमची भेट होईल तोपोतर या आंगठीची तुम्ही—

**सई०**–( मोठ्या आनंदानें ) काय मला आंगठी दिली म्हणतोस ? तर मग मी मोठी भाग्याचीच म्हणायची. त्या आंगठीला मी आपल्या जीवाच्या पलीकडे ठेवीन. श्री रामचंद्रांनीं हनुमंताच्या

हातीं सीतादेवीला आंगठी पाठवली होती, तशीच महाराजांनीं मला तुमच्या हातीं पाठविली आहे. फरक इतकाच कीं, रामानीं सीतेचा त्याग केलेला नव्हता. महाराजांनीं माझा त्याग केलेला आहे.

**गोप्या**–पन् बाईसाहेब सीतादेवीला मार्वतीन आंगुठी दिल्यावर त्या काय म्हंगाल्या ?

**सई०**–त्या काय म्हणाल्या? त्याचें गाणें एक मला सासूबाईनीं शिकविलें आहे. तें आतां माझ्या ध्यानांत येत नाहीं.

**गण्या**–बाईसाहेब, म्हना कीं चुकतमुकत. म्हनजे देवाला तरी आपली दया येऊनशान् सरकारची गांठ पडल.

**सईबाई**–बरं तर म्हणतें अं—

**भंगिलें शिवधनुष्य श्रीरामें वरिलें मला ॥**
**वनीं आलों उभयतां बाई ॥ उभयतां बाई ॥**
**कांचनी मृग पाहिला ॥ १ ॥**
**मनीं वाटे मृग चुकला गे काचोळीला ॥**
**पुरवावी हौस ही माझी ॥ हौस ही माझी ॥**
**मम वचनीं राघव गेला ॥ २ ॥**
**दुर्वाक्य धरुनि मनिं छळिलें भाऊजिशीं ॥**
**हें पाप साजणि मी अंगीं ॥ साजणि मी अंगीं ॥**
**भोगितें दिवसानिशीं ॥ ३ ॥ ध्रु० ॥**
**मुद्रिके राम टाकून आलिस तूं कशी ॥**
**हा वृत्तांत सांग मज बाई ॥ सांग मज बाई ॥**
**सोडि मौन्य बोल तूं मशीं ॥ ४ ॥**
**सद्गदीत जानकी मुद्रे हृदयीं धरी ॥**
**ह्मणे माये आण तुज माझी ॥ आण तुज माझी ॥**
**खरें राम आहे कुठें तरी ॥ १ ॥**
**एकली वनांत दिन मी अनाथ मुद्रे अशी ॥**
**किति दिवस लोटुं क्लेशांचे ॥ लोटुं क्लेशांचे ॥**
**जिवनाविण मासळी जशी ॥ २ ॥**

राघवें तुला धाडिलें मनिं ग मज कळलें ॥
आशा नाहीं कुठें या रीती ॥ कुठें या रीती ॥
तुज कुणें हातीं निर्मिलें ॥ ३ ॥
लक्ष्मणाशीं छळिलें तें न फिरविलें ॥
बाई प्राणचि देइन आतां ॥ देइन आतां ॥
वेणि दोर गळां बांधिले ॥ ४ ॥ मुद्रिके राम टाकून०॥
ऐकूनि मारुती नमून सद्गद तिशीं ॥
तव राम सुखी किष्किंधीं ॥ सुखी किष्किंधीं ॥
तेणें शुद्धि धाडिलें मशीं ॥ १ ॥
अमृतासुता मनीं आनंद झाला कसा ॥
चातका मेघजल वदनीं ॥ मेघजल वदनीं ॥
पडे अवचित् बरवा तसा ॥ २ ॥
श्री ब्रह्मानंदीं कसा ॥
नाहिं कुठें सुखाचा वारा ॥ सुखाचा वारा ॥
अनुभव त्या गुरुला पुसा ॥ ३ ॥
श्री रामनाम परिवार सत्य मानशीं ॥
जे कथा गाती ऐकती ॥ गाती ऐकती ॥
ते धन्य जन्मले कुशीं ॥ ४ ॥ मुद्रिके राम टाकून० ॥

**गण्या**–लइ ग्वाड गान. आमच्या आइला असल गान एक बी येत न्हायी. आमच्या आइच मंजी आपले कुठ नांगराला गान ह्मन, कुठ शेताला गान ह्मन, कुठ बैलाला गान ह्मन, कुठ म्हशीला गान म्हन.

**गोप्या**–गप्प बस. उगच बडबड लावलीया. चला बाईसाहेब आपुन हलक हलक त्या डोंगरामंधी सरकाराचा तपास करूं. त्यासनी आम्हासनी सोडून गेल्याला कायी लई नाहीं वखत झाला.

**सईबाई**–(एकीकडे) कदाचित् इकडची आणि माझी गांठ नाहीं पडली, आणखी मला आत्महत्या करून घ्यावी असें वाटलें तर हीं दोन मुलें मला कांहीं तसें करूं देणार नाहींत. तशीच वेळ

आली तर कांहीं तरी निमित्त काढून यांना कामगिरीवर पाठवावें ह्मणजे झालें. ( उघड ) तुम्ही कसें तरी करून एकदां गांठ घालून द्या, मग मला सोडून कसें जाणें होतें आहे तें पाहतें. सासूबाई, रंगू, गंगू, पंडितराव, तानाजीराव, सगळे आमच्या शोधांत हिंडत असतील. देवा ! निदान सासूबाईची आणि माझी गांठ तरी पडूं देऊं नकोस, नाहीं तर त्या मला घरीं घेऊन गेल्याशिवाय राहणार नाहींत. माझ्याच्यानें त्यांच्यापुढें कांहीं बोलवणार नाहीं.

**गोप्या**–चला बाइसाहेब, त्या समुखल्या खिंडीमंदी जाऊ. सरकार तिथ खात्रीन भेटत्याल. ( त्रिवर्ग जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ–डोंगर.

( शिवाजी प्रवेश करितो. )

**शिवाजी**–कोणाचे आईबाप, कोणाची बायको, कोणाचा पुत्र, कोणाचा मित्र, संसारसुख केवळ अभ्राची सावली आहे. क्षणांत नाहींसें होईल. विषयाचें सुख ह्मणजे आकाशांतील विजेची चमक. संसार हें स्वप्न आहे. देह उपजतांच मृत्यूच्या तोंडीं दिलेला आहे. मग माझें राज्य, माझी बायको, माझा मुलगा, माझें घर, माझें शेत, असें म्हणतांना आम्हांस लाज वाटूं नये का ? ज्याप्रमाणें सर्पानें अर्धवट बेडूक गिळावा, त्याप्रमाणें काळानें आम्हांस ग्रासिलें आहे. मग तो बेडूक जसा, इकडे तर सर्पानें गिळीलेंच असतें, परंतु आपण स्वतःपुढें माशा गिळीत असतो, त्याप्रमाणें आमची स्थिति आहे. आमचा उद्याचा भरंवसा नाहीं. काळ आम्हांला केव्हां दाढेखालीं रगडून टाकील याचा नेम नाहीं. आम्ही इकडे ईश्वराला विसरून जाऊन एकमेकाला कवटाळतों, मनसोक्त चैन मारतों, नेहमीं सुखप्राप्तीकरितां माशाप्रमाणें तर-

फडतों, केवढा आमचा मूर्खपणा आहे ? आजपावेतों माझें आयुष्य कवडीच्या मोलानें गेलें. रोज रात्रीं तुकारामाचे कीर्तनास गेलें ह्मणजे असें वाटतें कीं, जसा कांहीं अमृताचा पाऊस पडतो आहे ! आईबापाची आठवण नाहीं, राज्यप्राप्ति करून घेण्याची जरूर नाहीं. स्नेही नको, कुटुंब नको, कांहीं नको—( हंसून ) त्या मुलांना फसविण्यास मला कांहींच उशीर लागला नाहीं. माझ्यावर त्यांचा पूर्ण विश्वास. मला त्यांनीं मोहपाशांत अगदीं जखडून टाकलें होतें. ( आवाज होतो. ) आतां येथें आवाज कसला झाला बरें ? मला वाटतें, कोणी तरी श्वापद आलें असावें. माझ्या मनाला भिण्याचें कांहींच कारण नाहीं. सर्वांभूतीं परमेश्वर सारखा भरलेला आहे. कोणाला कोणी ठार मारण्याचा अधिकार नाहीं. ( सईबाई कड्यावरून गडबडत येऊन शिवाजीजवळ पडते. )

**सईबाई**–( कण्हत कण्हत ) हिंडतां हिंडतां अगदीं थकलें. तहानेनें जीव कासावीस झाला. भूक लागली. कांहीं खावयास मिळेल म्हणून या कड्यावर चढूं लागलें, तों पाय घसरून खालीं पडलें. सर्व अंग ठेंचलें. अग आई आई ? ( बेशुद्ध होते. )

**शिवाजी**–कोण बरें ही स्त्री असावी ? माझ्या ओळखीची दिसते. आपल्याला काय, कोणी का असेना. तहानेनें तिचे प्राण व्याकूळ झाले आहेत. तिला पाणी पाजणें आपलें काम आहे. भूतदया हेंच आमचें भांडवल. ( तिच्या तोंडांत पाणी घालतो. ) अरे, ही तर आमच्या घरची माणसं ! कसा मायापाश आहे ! या मूर्खपणाला काय ह्मणावं ! आईनें तरी हिला एकटीला कशी सोडली असावी बरें ? पण आपल्याला असले विचार मनांत आणणें योग्य नाहीं.

**सईबाई**–( एकीकडे ) हें स्वप्न तर नाहींना ! ज्यांचा शोध करीत मी या जंगलांतून भटकत फिरत आहें, ते परमेश्वराच्या कृपेनें माझ्या अगदीं जवळच आहेत. आतां जीव गेला तरी हे पाय ह्मणून सोडणार नाहीं. आतां क्षणभर बेशुद्धपणाचें सोंग घेतें.

**शिवाजी**—अजून कां बरें ही शुद्धीवर येत नाहीं? भुकेनें आणखी तहानेनें अगोदरच प्राण व्याकूळ झालेला, या प्रखर उन्हांतून हिंडून हिंडून ही अधिक थकली, आणखी कड्यावरून खालीं बेशुद्ध पडली. ( नाडी पहातो. ) नाडी अगदीं मंद चालते आहे. श्वासोच्छ्वास किंचित् वाहतो आहे. या वेळेला काय उपाय करावा? किंवा अशीच सोडून देऊन चालतें व्हावें? तुकारामानें सांगितलेल्या ब्रह्मज्ञानाची ही कसोटीच आहे? ते काय बरें ह्मणाले?

**न करीरे संग राहे रे निश्चळ ॥**
**लागो नेदी मळ ममतेचा ॥ १ ॥**
**या नांव अद्वैत खरें ब्रह्मज्ञान ॥**
**अनुभवावांचून बडबड ते ॥ २ ॥**

एकीकडे मायापाश खेंचतो आहे, एकीकडे विवेक ओढतो आहे. पण नाहीं. हा मायापाश ताडकन् तोडून हा मी अस्सा निघून जाणार.

**सईबाई**—( उठून बसते. ) अस्सा माणसाचा विश्वासघात करावा काय? उभाउभी तुकाराममहाराजांचें दर्शन घेऊन येतों म्हणून सांगणें झालें; तीन दिवस गेले, चार दिवस गेले, पत्ता नाहीं, म्हणून सासूबाई आणखी मी शोध करण्याकरितां देहूस आलों, तों आह्मांस बातमी लागली कीं, संसाराचा वीट येऊन, सर्व गोष्टीचा त्याग करून डोंगरांत जाणें झालें आहे ह्मणून. देवाच्या कृपेनें आतां गांठ पडली, आतां ह्मणून सोडावयाची नाहीं. आतां अगोदर घरीं चलायचें ना?

**शिवाजी**—कोणाचें घर, कोणाचें दार, तूं कोण, आणि मी कोण? आतां मला कोणी नको. आजपावेतों मला मायापाशांत गुंतवून खूप फसवलेंत. आतां माझें मला स्वहित चांगलें समजावयाला लागलें समजलांत?

**सईबाई**—अग बाई! काय तरी कठोर भाषण हें. असें निष्ठुरप-

णाचें भाषण मला आजपावेतों कधींसुद्धां बोलणें झालें नाहीं. काय ह्मणे, तूं कोण आणखी मी कोण ? तुकारामबोवांनीं आपल्या संसाराप्रमाणेंच, माझ्या संसाराचें वाटोळें केलें म्हणावयाचें. हें भाषण जर सासूबाईनीं ऐकिलें तर त्यांच्या मनाला किती तरी दुःख होईल त्याची कल्पना तरी आहे का इकडे ?

**शिवाजी**–त्यांत काय आहे ? माझ्या मनांत कांहीं कोणाला दुखवावें असें नाहीं. पण तुह्मी होऊन दुःख करूं लागलांत तर त्याला माझा काय उपाय आहे ? तुह्मी आपल्या देहाचें सार्थक करा. आजपावेतों तूं, मी अगदीं तुझा जीव कीं प्राण असें मला प्रेम दाखवून, माझें चित्त हरण करून घेतलेंस. स्वारी शिकारीवर असतांना सुद्धां मला तुझी आठवण होऊन कधीं कधीं माझें मन चंचल होई. आजपावेतों तुला देह विकला होता. आजपावेतों तुझ्याकरतां परमार्थ बुडविला, पण आतां मी तुझा नाहीं. इतर जन ज्याप्रमाणें बायको मेली असतां तिचें प्रेत मांडीवर आडवें घेऊन " संसार बुडाला ", " संसार बुडाला " म्हणून धडा धडा ऊर बडवून घेतात, त्यांतला मी नाहीं. तुझ्याकरितां मला किंचित् सुद्धां वाईट वाटत नाहीं.

**सईबाई**–अस्सं अस्सं काय ? त्या दिवशीं माझ्याकरितां फुलांचे गजरे कोण करीत होते ? माहेराहून येण्याला एक दिवस उशीर लागला म्हणजे सांडणीस्वारावर सांडणीस्वार कोण पाठवीत होते ? माहेरीं गेलीस म्हणजे मला चैन पडत नाहीं असें कोण म्हणत होते ? आपण जोडप्यानें श्रीरामदासस्वामीचें दर्शनास जाऊं असें कोण म्हणत होते ? आणखी असल्या प्रेमाच्या झाडाला अशीं विषानें माखलेलीं फळें आणलींत ? ( दुःखानें ) बायकांची जात गाईसारखी आहे ! आमचा असा त्याग केलांत तर आम्हीं कोणाच्या तोंडाकडे पहावें ? पुत्र झाल्याशिवाय स्त्रीचे ऋणांतून मुक्तता नाहीं अशी शास्त्रमर्यादा आहे. माझ्या मनाला इतकें दुःख आजपावेतों कधीं दिलेलें नाहीं, मग आजच कां इतकें कठोर मन

केलेंत ? आतां इकडचा एक एक शब्द मला विजेच्या कडकडाटा-सारखा वाटत आहे. आतां मी इकडचे पाय सोडून कुठें जाणार नाहीं. माझी मान तोडली तरी हरकत नाहीं. तुकाराम बुवांनीं नाहीं का संसार केला ? मग त्यांना नाहीं कां मुलें लेकरें झालीं. ते तरी आपल्या बायकोला वागवितात कीं नाहीं ?

**शिवाजी**– तुकाराम संसारांत असून अलिप्त आहे. आरशा-मध्यें आपण आपलें मुख पाहिलें असतां आपल्यास दिसतें, परंतु आपणाला पक्कें ठाऊक असतें कीं, आपण आरशांत नाहीं. सरो-वरामध्यें चंद्र, सूर्य यांचीं प्रतिबिंबें दिसतात, त्या प्रतिबिंबांच्या योगानें उदक सुद्धां प्रकाशमान भासतें; परंतु खरोखरीचे चंद्र-सूर्य हे आकाशांतच आहेत. त्याप्रमाणें तुकाराम संसारांत असून अलिप्त आहे. तसा मार्ग इतर कोणाचेच हातून होणार नाहीं. कनक, कांता आणि पुत्र यांचा आह्मांला क्षणांत मोह उत्पन्न होईल. म्हणून इंद्रियांचें दमन करण्याकरितां आम्हास वनप्रयाण केलें पाहिजे. मला सर्वत्रांचा वीट आला आहे. मी आतां येथून तीर्थयात्रेस जाईन. बारा ज्योतिर्लिंगांचें दर्शन करीन. काशीहून रामेश्वरास भागीरथीच्या कावडी नेऊन वाहीन. वाटेल तें मी करणार. तुमचा मला आतां पाश नको आहे. आणखी या पुण्य मार्गाच्या आड तुह्मीही पण येऊं नये.

**सईबाई**–एक तर मला बरोबर न्यावें, नाहींतर या हातांनीं माझा निकाल करून हवें तिकडे निघून जावें. मी कांहीं आतां हे पाय म्हणून सोडणार नाहीं. मी बरोबर येणार.

**शिवाजी**–मी येऊं देणार नाहीं. कशी येतेस तें पाहतों.

**सईबाई**–काय कराल ? ठार मारालना ? हा घ्या खंजीर, मी तरी त्याचीच वाट पाहत आहें. अशा प्रकारें प्रत्यक्ष पतीच्या हातून मृत्यू आला, तर माझ्यासारखी भाग्यवान कोणीच नाहीं. हं, आटपा लवकर, करा एका घावीं दोन तुकडे.

**शिवाजी**–( तिच्या हातची कट्यार घेऊन फेंकून देतो. ) जा

निघ आपल्या घरीं. ( धक्का देतो, ) तुझा माझा काय संबंध ! सईबाई मूर्च्छित पडते. शिवाजी निघून जातो. जिजाबाई, रंगू, गंगू, पंडितराव व तानाजीराव प्रवेश करितात. )

**जिजाबाई**–अरे, आतां धाडकन येथें काय बरें पडलें ?

**रंगू**–अहो, या पहा बाईसाहेब, याच आतां धाडकन जमिनीवर आपटल्या बरं का ? ( जिजाबाई तिला मांडीवर घेते.)

**गंगू**–यांना पडण्याला कारण काय बरें झालें असावें.

**तानाजी**–यांची आणखी महाराजांची गांठ पडली असावी, महाराजांनीं यांच्या मनाला लागेल असें कांहीं तरी खोंचून बोललेलें असावें असा माझा तर्क धांवतो.

**पंडितराव**–हा येथें खंजीर कसला पडला आहे बरें ?

**जिजाबाई**–काय करावें या आमच्या दुर्दैवाला ? देवानें माझ्या कपाळीं आणखी काय काय सोहळे लिहिले आहेत कोण जाणे ? मुली, मुली, ( तिजला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करिते. सईबाई शुद्धीवर येते. ) म्हटलें तुझी आणखी बाळाची गांठ पडली होती का ? ( ती मानेनें होय म्हणून सांगते. ) मग तो कोणीकडे गेला ? केव्हां गेला ? तुला काय म्हणाला ? त्याला माझी आठवण आहे काय ? घरच्या माणसांचें कांहीं नांव काढलें कां ? सांग. सांग.

**सईबाई**–कांहीं नाहीं. त्यांना कोणी नको. कोणाची गरज नाहीं. निक्षून सांगणें झालें कीं, तुम्ही माझी आशा सोडा. तेव्हां मीं म्हटलें कीं, या खंजिरानें माझा आपल्या हातानें निकाल करून जा. तेव्हां तो रागेंरागें फेंकून दिला, आणखी या पलीकडच्या झाडींत झपाट्यानें निघून जाणें झालें.

**तानाजी**–आईसाहेब चला आपण तेथें शोध करूं; नाहींतर तसेच तुकारामबुवाचे घरीं जाऊं; कारण रात्रीं तेथें कीर्तनाकरितां खात्रीनें स्वारी ठेवलेली. ( सर्व हळूहळू जातात. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—देहू येथील विठोबाचें मंदिर.

( तुकाराम प्रवेश करतो. )

**तुकाराम**—( एकीकडे ) मन म्हणजे काय ? कल्पनेची केवळ मूर्ति. या मूर्तीचे संगतीनें नानाप्रकारचे जन्म प्राप्त होतात. या मनाचा संचार सर्वत्र आहे. याला भ्रमण करण्यास दहाही दिशा पुरत नाहींत. आकाश आणि सप्तपाताळें हीं पुरत नाहींत. एवढी याची व्यापकता असून आपण याला क्षणभर धरूं म्हटलं तर सांपडणार नाहीं. मर्कट कधीं समाधी लावील काय ? तसें हें मन आहे. निश्चयाला हटकून ढांसळून टाकणारें, धैर्याला नष्ट करणारें, विवेकाला भ्रष्ट करणारें, जाऊं नये तेथें हटकून जाणारें, खाऊं नये तें खाणारें, पिऊं नये तें मुद्दाम पिणारें, बोलूं नये तें बकणारें, करूं नये तें जाणूनबुजून करणारें, सर्व इंद्रियांना चेतना उत्पन्न करणारें, आशा, तृष्णा, कल्पना, काम, क्रोध यांचें ठाणें जागृत ठेवणारें, आणि शुद्ध बुद्धीची राखरांगोळी करणारें असें हें अनिवार आहे. गिरिकपाटांत एकांतीं आसन ठोकून ऋषिजन म्हणतात आम्ही मनोनिग्रहीं सावधान आहों, पण हें मन त्यांना केव्हांच ठकवून निघून जात आहे. मनाचें आकलन करण्याकरितां कितीएक अन्नाचा त्याग करून बसले, पण मनानें त्यांना रात्रंदिवस जागृतींत आणि स्वप्नांत अन्न अन्न करावयाला लाविलें. मला वाटतें आकाशाची चौघडी करतां येईल, मेरुपर्वत पुडींत बांधतां येईल, शून्याची नरडी दाबतां येईल, प्रचंड वाऱ्याची मोट बांधतां येईल, सप्तसमुद्राचा एकच घोट करतां येईल, भयंकर वडवानळ प्राशन करतां येईल, पण मनोनिग्रहाची वार्ता भगवंताशिवाय कोणी करूं नये. अहो, प्रत्यक्ष सृष्टी निर्माण करणारे ब्रह्मदेव, संहार करणारे श्रीशंकर, आणि प्रतिसृष्टी उत्पन्न करणारे विश्वामित्र अशा अशा बहाद्दरांचे कौपिन मनानें ताडकन्

उडविले, तेथें इतरांची कथा काय ? अभंगाच्या वह्या पाण्यांत बुडविल्याबद्दल, परमेश्वरा, माझ्या मनाला खेद होऊं देऊं नको. हेंच तुझ्याजवळ रात्रंदिवस मागणें आहे. या गांवच्या लोकांनीं माझी अगदीं पाठ पुरवली आहे. त्यांतून या म्हाताऱ्यानें तर अगदीं कमाल केली. आलाच तो. ( एक म्हातारा प्रवेश करतो. )

**म्हातारा**–तुकारामबुवा, तुम्हाला मी लहानपणापासून पहात आहें. तुमच्याविषयीं माझा मोठा पूज्यभाव होता. तुम्हाला मी अत्यंत शहाणा समजत असे, मोठा साधु समजत असे. परंतु मला आतां तुमच्यासारखा मूर्ख या जगांत कोणी दिसत नाहीं.

**तुकाराम**–कसें म्हणतां आजोबा ? माझ्यासारखा मूर्ख !

**म्हातारा**–अरे तर गृहस्था, तूं आपलीं खतें पत्रें पाण्यांत बुडवलींस. मी म्हणतों कांहीं हरकत नाहीं, त्यांत तुझी सात्विकवृत्ति दिसून आली. पण अभंगांच्या वह्या तूं पाण्यांत बुडवून टाकल्यास ? यांत काय पुरुषार्थ केलास ? आजपावेतों स्वार्थ तर बुडविलास; पण आतां परमार्थही बुडविलास. तुझा देव भक्तासाठीं मोठा धांवण्या धांवणारा आहे, मग वह्या कशारे पाण्यांत बुडाल्या ? तस्मात् तुझ्या अभंगांत ईश्वरी प्रसाद मुळींच नाहीं. काशींतल्या पंडितांनीं साधु एकनाथाचें भागवत भागीरथींत फेंकून दिलें होतें. तें जसें भागीरथीनें हात वर करून झेललें, तसें तुझे अभंग इंद्रायणीनें कां नाहीं झेलले ? आजपावेतों तूं व्यर्थ त्या देवाची स्तुति केलीस. त्या देवांत देवपण नाहीं समजलास ?

**तुकाराम**–वह्या बुडवल्याबद्दल हा वेळपावेतों मला यत्किंचित् सुद्धां वाईट वाटलें नव्हतें. पण मला तुमचें म्हणणें आतां कांहीं अंशीं खरें दिसतें.

**म्हातारा**–कांहीं अंशीं कां ह्मणतोस ? माझें ह्मणणें अक्षरशः खरें आहे. रात्रंदिवस कष्ट केलेस, सुखाची झोंप घेतली नाहींस, मुलाबाळांना कधीं डोळाभर पाहिलें नाहींस, नेहमीं उदास राहिलास, मलिन वस्त्रें धारण केलींस, जगाचा वीट मानलास,

संपत्तीला शिवला नाहींस, घरादाराला झुगारून देऊन घरावर तुळशी-पत्र ठेवलेंस, ब्राम्हणाला सर्वस्वी मत्ता अर्पण केलीस, आळंदीपंढरी-च्या वाऱ्या करून पाय झिझविलेस, रात्रंदिवस मुखानें त्या काळ्याचें विठ्ठल विठ्ठल म्हणून भजन केलेंस, संसाराला तिळांजली दिलीस, क्रोधाचा उपयोग इंद्रियदमनांत केलास, लोभाचा उपयोग तीर्थ-प्रसादाकडे केलास, सज्जनांचा मोह धरिलास, आणखी केलेंस काय, तर त्या विठोबाच्या स्तुतिपर लाखों अभंग केलेस. पण त्याला तुझी दया आली काय? त्यानें तुझे ग्रंथ—

**तुकाराम**–हां बस्स बस्स. जास्त बोलूं नका तुमच्या बोलण्या-चा माझ्या हृदयांत पूर्ण प्रकाश पडला. व्यर्थ! व्यर्थ! मी या भूमी-ला भार झालों. व्यर्थ मीं त्या देवाचें पोवाडे गायिले. हाय रे दैवा! मग हा सर्व भ्रम कारे! का पिशाच्च! काय? म्हणूं तरी काय?

**म्हातारा**–काय म्हणतोस? जीव दे जीव. एवढाले ग्रंथ लिहि-लेस, त्या तुला हें असें बक्षीस मिळालें आहे. माझ्यासारखा असता तर त्या विठोबाच्या नांवानें जोत्याशीं टक्कर घेऊन प्राण सोडता. (जातो.)

**तुकाराम**–हे पांडुरंगा, तूं महा निष्ठुर आहेस. तुला दया माया कांहीं एक नाहीं. यमनियम, पापपुण्य सर्व आमच्या मागें लावि-लेलीं आहेत, पण तुझ्या घरीं कोणता न्याय रडतो आहे? बि-चाऱ्या हरिश्चंद्राचें सर्व वैभव हरण करून त्याचा पुत्र रोहिदास आणि त्याची स्त्री तारामती यांना डोंबाघरीं गुलाम बनविलेंस. नळदमयंतीची ताटातूट केलीस. चक्रवर्ती शिबी राजा, दयेची केवळ मूर्ति, त्याच्याकडून त्याचेंच मास काढून तोलून घेतलेंस, कर्ण वीर घायाळ होऊन रणांगणीं पडला असतां त्याचे दांत पाडून घेतलेस. अत्यंत उदार बळी, त्याला पाताळीं दडपलास. श्रियाळा-चें बाळक त्याच्याकडून करवतानें कापविलेंस. प्राणांत होईप-र्यंतों ज्यानें राम राम असा सारखा उच्चार केला, त्या दशरथाला प्रत्यक्ष बापाला–अधःपात! सकल तीर्थांचा आणि मंत्रांचा

केवळ अवतार अशा मांडव्य ऋषीला सुळावर चढविलेंस ! कां तर त्यानें लहानपणीं एक भुंगा कांटा टोंचून मारला. यज्ञाचे ठायीं ऋषिजन तुला अवदान देतात तिथें काळें तोंड करतोस, आणखी गोकुळांत घरोघरीं जाऊन बायकांचीं दारें उघडून लोणी चोरून खातोस. तस्मात् धिःकार असो अशा देवाला. अरे दुष्टा, शेंडीला दोरी बांधून जागरणें करून भक्तिपूर्वक मीं तुझें ज्यांत वर्णन केलें, ते माझे अभंग पाण्यांत बुडवून तुला काय मिळालें. विनाकारण तं मला खेद उत्पन्न केलास.

**माझे लेखीं देव मला ॥ असो त्याला असेल ॥ १ ॥**
**गोष्टी न करी नांव ने घे ॥ गेलों दोघे खंडोनी ॥ २ ॥**
**स्तुतिसमवेत निंदा ॥ केला धंदा उदंड ॥ ३ ॥**
**तुका ह्मणे निवांत ठेलों ॥ वेचित आलों जीवित्व ॥ ४ ॥**

काय तें वाळवंटीचें सुख ! ज्या वाळवंटांत वैष्णवांनीं खेळ मांडला आहे, कामक्रोध पायाखालीं तुडवून टाकले आहेत, जेथें एकपेक्षां एक बळी " कळी काळावर बळकट कास कसून उभा आहे. " अहाहा काय अनुपम्य सुखसोहळा मला वाटत होता ! पण हा भ्रमरे भ्रम. ज्या नामामृताच्या आनंदकल्लोळांत देहाची शुद्धि जाऊन जेथें पंडित, ज्ञानी, योगी, महानुभव, सिद्ध आणखी साधक वर्णाभिमान विसरून जाऊन एकमेकाला लोटांगणें घालतात, सर्वांगाला गोपीचंदनाची उटी लावलेली असते, ज्यांच्या गळ्यांत तुळशीच्या माळा मिरवत असतात, टाळमृदंगाची घाई उडून गेली असते, ज्या ठिकाणीं सुरनर पुष्पांचा वर्षाव करीत असतात, कठोर अंतःकरणें जेथें लोण्याप्रमाणें मृदु होतात, आणि जेथें पाषाणाला सुद्धां पाझर फुटतात, असें मी लाखों लोकांना सांगत आलों, पण तो सारा भ्रम ! तें सुख या तुकारामाचे कपाळीं नाहीं. हाय हाय ! धिक्कार ! ( जमिनीवर आंग टाकून देतो. )

अंक ४ था समाप्त.

---

# अंक पांचवा.

## प्रवेश १ ला.

स्थळ–नागनाथाचे देवळाजवळच्या ओढ्यांतील झरा.

(अनगडशा फकीर व त्याचा चेला असे दोहरा ह्मणत प्रवेश करितात.)

॥ दोहरा ॥

मगदूर हमे कब तेंरे वसूफों[1]कि रकम् का ॥
हक्कों[2]के खुदावंद है तू लुं[3]हो कलम् का ॥
इसमसूनदे इजत पेके तूं जुल्व[4]नुमाहे ॥
क्या ताप गुजर होवे तौ कु[5]ल्के कदम् का ॥
बसते हे तेरे सायमे सब शेक और बेरामन् ॥
आबाद तुजसेही तू घर्[6]देरो हरम[7] का ॥
है खोप् अगर जीमे तौ है तेरे गजबसे ॥
द[9]र्दिल्मे भरोसा हे तौ तेरे करम[10]का ॥
मानिंद हु[11]बाब आंख तौ दई खुली थी ॥
खींचा न फेर् इस बेहर[12]मे आरसाकु इदम[13]का ॥

### वरील दोहऱ्याचा गोषवारा.

तुझी तारीफ करण्याची आम्हाला शक्ति नाहीं. पृथ्वीचें संरक्षण करणारा आणि तारण करणारा तूंच आहेस. या सर्व पृथ्वीवर तुझा उजेड आहे. तुझ्या पायाचा भरंवसा असल्यानें आमचें कांहीं वाईट होणार नाहीं. तुझ्या छायेमध्यें हिंदु आणि मुसलमान बसलेले आहेत. देवळें आणि मशिदी तुझ्या योगानें आबाद आहेत. तुझ्या रागाची जरी आम्हाला भीति वाटते, तथापि तुझ्या कृपेचा आम्हास भरंवसा आहे. बुडबुड्याप्रमाणें तुझे डोळे टवकारलेले आहेत. तुझ्या मनांत आलें तर एका पळांत ही पृथ्वी बुडवून टाकशील.

---

१ तारीफ करण्याचा. २ खरा. ३ पृथ्वीवरचे चांगले पदार्थ. ४ प्रकाश. ५ ईश्वरावरचा भरंसा. ६ देऊळ. ७ मशीद. ८ भय. ९ आंत. १० मेहेरबानी. ११ बुडबुडे. १२ तुफान. १३ जीव.

लाये लाहा इल्लिला महंमद रसुल्लिल्ला

**चेला**–अल्लाहो अक्बर. ( असें ह्मणत ह्मणत इकडून तिकडे फिरतात ).

**अनगडशा**–या परवर दिगर, ये अलम् दुनियेके पड्डे पर तूहि पाक है. हम तमाम लोग गुन्हेमे गिरफ़्तार है. हम् लोगोके लिये तूनें पानी और अनाज पैदा किया है. वास्ते हमारे तंदुर्स्तिके तू बरसात् गिराता है. अदमियोके चमनके लिये और वास्ते खुषबोंके तूनें हरकिसमके फूले गुलचमन्मे पैदा किया है. खुप्सूरत औरतोंके वास्ते खुपसूरत मर्द पैदा करते. तवंगर लोग दिलखुषीके वास्ते माषुक माषुक दुलन और दुलाकी शादी बनाते. लेकिन् कुई ये ख्याल नहि करता के इस्का पैदा करनेवाला कोन् है. और हम इस्के एहसान मंद है और नहि. अये मेरे दोस्तों अबनमाज पढने का वख्त हुवा है. अब ये पानीके झीरेमे हात पाव और मू सफा करके खुदाहुतालाकी याद करेंगे.

( रामेश्वरभट, सदानंद व नित्यानंद प्रवेश करतात. )

**सदानंद**–नारायण! नारायण! रामेश्वरभटजी, ब्राह्मणांचा झरा यवनांनीं विटाळला हें फार गैर केलें. आपण रोज येथें स्नान करतों.

**नित्यानंद**–नारायण! नारायण! जाऊं द्या, आज आपण दुसरीकडे स्नानास जाऊं.

**रामेश्वर**–असें कशालाहो ? झरा पाहिजे असला तर उपसून काढूं, किंवा हा झरा वाहता आहे. त्याला कांहीं हरकत नाहीं. या फकीरांना आपण येथून हांकून देऊं. आणखी रोजच्याप्रमाणें येथें स्नानविधि उरकून घेऊं.

**सदानंद**–या कामांत त्यांचें आपलें भांडण होणार आहे. ह्मातारी मेल्याचें दुःख नाहीं, पण काय ह्मणतात ना काळ सोकावतो. आज हे येथें स्नानास आले तसे रोज येतील.

**नित्यानंद**–तें कांहीं नाहीं. यांना येथून भांडाभांडी करून हांकून दिलेंच पाहिजे.

**रामेश्वर**–तुम्र चले जाव ह्यासे, ये झीरा हमारा है. हम रोज इस जगे आकर न्हाते है. और संध्यावंदन और भगवतका पूजन करते है.

**अनगडशा**–भटजी बावा, ये पानी अल्लानें सबकु सरीका दिया है. इसमे तुमारे बडे बडे शास्त्री पानी पीते है. हमारे उस्ताद काजीशरीफ पानी पीते है. चमार पानी पीते है. और जानवर घोडा कुत्ता पानी पीता है. पानी पाक है, तुम और हम नापाक है.

**सदानंद**–नारायण ! काय आह्माला अपवित्र ह्मणतोस? सर्व संगपरित्याग करून सन्यासदीक्षेचें ग्रहण केलें, तरी आह्मी नापाक असें ह्मणणाराला शिक्षा केलीच पाहिजे.

**नित्यानंद**–येथें सोवळ्याओवळ्याचा विचार अगदीं रहात नाहीं. क्षेत्राचे ठिकाणीं या गोष्टींचा विचार चांगला असतो. या फकीरांना येथून हात धरून काढून दिलें पाहिजे. हे कांहीं बऱ्या बोलानें जाणार नाहींत. सावित्रीबाई भिक्षा घाला म्हणून चालणार नाहीं.

**रामेश्वर**–तुम हमारा झीरा च्छोड देव्र और ह्यांसे चले जाव. इसमे तुमारा और हमारा दोनोका भला है.

**अनगडशा**–नहि तो तुम हमारा क्या करोगे पंडत? पानी कुच बजारमेसे मोल नहि लाते. ये नाला बडा है. पानी इसमे मुब्लक है. तुमे चाहे तो चले जाव उदर. हम तो एक उंगल ह्यासे पिच्छे नहि हट जायगे. पिछे जो होसो हो. तुमकु क्या करनेका होसो करलो. चाहे तो हमको जला डालो, नहि तो मार डालो, मगर तुम ये खुब समजना के तुम लोग्र खुदाका बडा गुन्हा करते है. इस लिये वाह्यात् हमे सताते हो.

**सदानंद**–<br>**नित्यानंद**–<br>**रामेश्वर**– } तुम ह्यांसे फोरन निकल जाना.

**अनगडशा-**
**चेला-** } जाते नही.

( पांच जणांची झटापट होते, त्यांत अनगडशा व त्याचा चेला हरले जातात. )

**अनगडशा**-( संतापून ) पानी अद्नासा चीज है. इस् वास्ते तूने मेरा कलिजा इतना गरम किया ! तेरा कुच खुदा भला नहि करेगा. तेरा सत्यानाश हो जायगा ! तेरा खाना खराब हो जायगा ! ये पानीसे तू न्हाया तो तेरे सब तनका अङ्गार अङ्गार हो जायगा. ये अङ्गारके मारे तू मर जायगा. हम गरीब फकीर लोग् कोनसेही बारेमे किसीकु सताते नहि. मगर तूने हमकु खाली सताया. तुम तीनोने मिलकर हमकु मारा. अब देखो इस्का नतीजा कैसा होता है. अब तुम् ऐसे डुबते रहो. बाहेर आया तो तुमारे तनकी अंगार अंगार हो जायगी. ( हातपाय आपटीत संतापानें निघून जातात. )

**रामेश्वर**-अरे जा. अशीं कावळ्याच्या शापानें ढोरें मरूं लागलीं तर काय होणार नाहीं ? काय ह्मणे स्नान केलें तर तुझे सर्व अंगाचा डोंब होऊन जाईल. मोठा ईश्वराचा अवतारच पडलास कीं नाहीं !

**सदानंद**-आपल्या पुराणांतरीं ऋषिवर्गांनीं क्षुल्लक कामांत चूक झाली तर मोठमोठे शाप दिले आहेत. त्यांतलाच हा प्रकार झाला ह्मणावयाचा जें आहे तें.

**नित्यानंद**-अहो का वेडे अहांत का ? जें आहे तें ऋषींच्या खेटरांची सुद्धां यांना सर येणार नाहीं. अगस्ति ऋषीनें समुद्र प्राशन केला. यांच्यानें जें आहे तें घागरभर पाणी सुद्धा पिववणार नाहीं. विश्वामित्रानें प्रति सृष्टी निर्माण केली जें आहे तें, यांच्यानें झाड सुद्धां बनवितां येणार नाहीं.

**रामेश्वर**-या जगांत ब्राह्मणाप्रमाणें तपस्वी पुण्यवान् कोणी आहे का ? आह्मीं जें सहा शास्त्रांचें अध्ययन केलें आहे, त्याचें तेज आमच्या अंगांत कांहींच नाहीं का ? यःकश्चित् फकीराच्या

शापानें आह्माला पीडा होऊं लागली तर काजव्याच्या तेजापुढें सूर्याचा प्रकाश फिक्काच पडला ह्मणावयाचा. चला, आतां जाऊन मी स्नान करितों. ( पाण्यांत शिरतो. )

**सदानंद**–प्रातःस्नान क्षेत्राच्या ठिकाणीं फार उत्तम होतें. नाशकास गंगेच्या कांठीं किंवा वांईस कृष्णेच्या कांठीं, भिल्लवडी औदुंवर इत्यादि ठिकाणीं प्रातःस्नानें करून स्नानसंध्येंत कालक्रमणा करणें फारच सुखकर वाटतें. परंतु काय करावें एक्या ठिकाणींच वास्तव्य केलें तर जें आहे तें पुडीची पंचाईत पडते.

**नित्यानंद**–आपल्याला जेथें तेथें पुडीचीच तर पंचाईत पडते. नाहीं तर आपण आपला पुष्कळ वेळ परमार्थसाधनाकडे घाल-विला असता. आतां रामेश्वरभटाकडे तरी जें आहे तें आपण किती तरी दिवस भोजनास जावें ? आपल्या मनाला आतां संकोच वाटूं लागला आहे. इतर ब्राह्मण जें आहे तें श्राद्ध आहे, पक्ष आहे, हव्य आहे, जें आहे तें कव्य आहे, हवे तिकडे जातात, विपुल, जें आहे तें, दक्षणा मिळते. पण आह्मी काय बोलूनचालून संन्यासी. आह्मांला कोण बोलावतो ? खरेंच सांगूं का मला असें झालें आहे कीं, या संन्यासाच्या पेंचाटींतून कोणी सोडवील तर बरें.

**सदानंद**–आतां बाबा या संन्याश्यांच्या दीक्षेंतून कोण मुक्त करणार ? माझें मन सुद्धां तुझ्याप्रमाणेंच चंचल झालें आहे. इतर ब्राह्मणांना मिष्ट मिष्ट पदार्थ, ह्मणजे बासुंदी, पुऱ्या, लाडू, जिलबी, केशरी भात खातांना पाहून माझ्या तोंडास पाणी सुटतें. लोक काय संसारांत राहून चैन मारतात ! सुंदर सुंदर स्त्रिया, संपत्ति, संतती, जे आहेत्ते मोठमोठाले वाडे, जे आहेत्ते बसायला घोडे, आह्माला काय आहे ! आमचे तेवढे कपडे मात्र भगव्या रंगाचे, आह्मी नेहमीं उपास करावेत, जे आहेत्ते चांद्रायणें करावीत. एकभुक्त असावें, कारण कामवासना उत्पन्न होतां कामा नये. बाकी ती व्हावयाची ती होतेच.

**नित्यानंद**–मला तर माझ्या प्राणप्रियेची क्षणोक्षणीं आठवण

होतें. मला असें वाटतें कीं, मी किती मूर्ख ? मी यत्किंचित् कारणासाठीं तिच्यावर रागावलों काय ? संन्यास घेतला काय ? आणखी आतां अहोरात्र जागरणें करीत बसलों काय ?

**सदानंद**–पण जे आहेत्ते, बायकोवर रागावयाचें कारण झालें तरी काय ? मला एकदां सांग पाहूं.

**नित्यानंद**–कांहीं नाहीं ! मला सांगण्याची सुद्धां शरम वाटते.

**सदानंद**–माझ्याजवळ सांगण्याची कसची शरम आली आहे? तुह्मी आम्ही आपले बोके संन्यासी !

**नित्यानंद**–अहो, काय सांगावें, जेआहेत्ते दर साल बाळंतपण! गरोदर राहिली कीं पारठें मूल आपलें अवथणायचेंच. सगळ्या घरांत जे आहेत्ते त्यानें शौच्याला बसायचें. एक दिवस मी उन्हाच्या वेळेस अगदीं तापून बाहेरून आलों. अगोदर भुकेनें संतापलेला, त्यांत जे आहेत्ते, माझा पाय भरला, मी घसरलोंन् पडलों. मला अतिशय क्रोध आला. बायकोला खूप मारलें. तसाच रागें रागें मठांत गेलों आणि संन्यास घेतला. आतां रात्रीच्या रात्री दुःखांत काढतों आहें. पण काय उपाय ? बरें पण तुला संन्यास घ्यावयाला काय निमित्त झालें ?

**सदानंद**–मला ह्मणतोस होय ! जे आहेत्ते तुझें कारण पुष्कळ बरें. तूं बायकोवर तरी रागावलास. मी तर फारच मूर्ख. मी पहिल्यापासून बाहेरख्याली. बाहेर चैन मारीत असतां आमच्या अंगवस्त्राकडे दुसऱ्यानें संधान लावलें. तें आमच्या कानावर येऊन आमची आणि त्यांची मारामारी झाली. त्यांत तिनें त्याची बाजू धरली. याबद्दल आह्माला संताप येऊन कोणत्याच स्त्रीचें आतां मुखावलोकन करावयाचें नाहीं असा निश्चय मनांत करून आह्मीं घरीं सुद्धां न जातां एकदम संन्यास घेतला.

**नित्यानंद**-हर हर !! आपण संन्यास घेऊन संन्यास या पवित्र शब्दाला आणखी संन्यासवृत्तीला काळीमा मात्र आणली !

**सदानंद**–श्रीक्षेत्र वाराणशी, पंचवटी, रामेश्वर इत्यादि स्थळीं

काय उत्तम उत्तम यति आहेत त्यांच्या नुसत्या नामस्मरणानें आपला देह पुनीत होऊन आपण उद्धरून जाऊं. ( रामेश्वरभटाच्या आरोळ्या ऐकूं येतात. )

**रामेश्वर**–( मोठ्यानें ) अरे बापरे ! सर्व अंगाचा डोम झाला ! मेलों ! मेलों ! ठार मेलों ! ! या झऱ्यांत स्नान मात्र केलें, पाण्यांतून बाहेर आल्याबरोबर सर्वांगावर जसा विस्तव ठेवला आहे ! आतां मी काय करूं ! पाण्यांत गेलें ह्मणजे थंड वाटतें. पाण्यांतून बाहेर आलों कीं, माझे पंचप्राण व्याकूळ होतात ! देवा, आतां काय करूं ! अहो यतिमहाराज, व्यर्थ व्यर्थ त्या फकीराला आपण त्रास दिला ! तो कोणी तरी सिद्ध पुरुष असावा ! नाहीं तर मोठा मांत्रिक तरी असला पाहिजे ! मी ब्राह्मण, जातीचा श्रेष्ठ, परंतु त्यानें मंत्रानें माझ्या शरीराला आग लाविली ! माझे शरीरावर पाण्याची गळती धरा ! मला पाण्यांत बसवा ! आतां कोणाला शरण जाऊं ? माझी पीडा दूर होते कशी ?—

**सदानंद**–पण असें झालें कसें ! जें आहे तें आपण ब्राह्मण, श्रेष्ठ, आम्ही पवित्र संन्यासी तुमच्याबरोबर, मग असें असून त्याचा मंत्रप्रयोग चालावा तरी कसा ! आतां त्याला शरण जावें तर आपल्याला कमीपणा येतो. आपण त्याच्याशीं व्यर्थ तंटा केला. यत्किंचित् पाण्याची गोष्ट ! त्यानें आपणाला पुष्कळ समजावून सांगितलें, पण आपण कांहीं ऐकिलें नाहीं. लागलींच ऐकेरीवर आलों. आज मुंगीनें मेरूचें उल्लंघन केलें म्हणायचें.

**नित्यानंद**–( एकीकडे ) आतां आमच्या पुडीची काय वाट ! रामेश्वरभट तर पांचजन्य करण्याचे बेतांत आहेत. आतां काय करावें ! अगोदरच मला भूक लागली होती. आतां तर जास्तच लागली. ( उघड ) कांहीं हरकत नाहीं जें आहे तें. चला आपण श्रीक्षेत्र आलंकापुरास जाऊं. तेथें श्री ज्ञानेश्वरमहाराज प्रत्यक्ष पांडुरंगाचा अवतार आहेत. तेथें जाऊन उपास करूं. तेथें दृष्टांतानें जशी आज्ञा होईल त्याप्रमाणें करूं.

**रामेश्वर**–मला तुमचा उपदेश मानवला. पण माझ्या या शरीरावर हे असे ओले कपडे असूंद्या. तुह्मी पाण्याची गळती धरा, नाहीं तर मी ठार मेलोंच म्हणून समजा ! अरे देवा, आतां मी काय करूं ?

( रामेश्वरभटाच्या अंगावर पाण्याची गळती धरून सर्व जातात. )

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**–देहू येथील विठोबाचें मंदिर.

( तुकाराम निजलेला आहे. म्हातारा प्रवेश करतो. )

**म्हातारा**–अरे तुकाराम. अरे तुकाराम. तुला मी अति आनंदाची एक बातमी सांगतों. तूं कष्टी होऊं नकोस. तुझ्या वह्या श्रीपांडुरंगानें इंद्रायणीच्या डोहांत कोरड्या ठणठणीत ठेवल्या आहेत.

**तुकाराम**–( जोरानें उठून उभा रहातो. ) काय माझे अभंग इंद्रायणींत कोरडे ! खरोखर ते अभंगच आहेत. अहाहा पांडुरंगा, मीं तुझा मोठा अन्याय केला. तुला मीं व्यर्थ दोष दिला, आणखी तेरा दिवसपावेतों प्राण निघून जावा ह्मणून डोळे झांकून या दगडावर निजलों. आजोबा, मला या कालीं किती आनंद झाला आहे ह्मणून सांगूं ! तुह्मी मला पांडुरंगस्वरूपीं दिसतां, तुह्माला मी लोटांगण घालतों. आज हा तुकाराम सात समुद्र आपल्या या वीर बाहूंनीं पोहून गेला. उपमन्यूला क्षीरसागर, ध्रुवाला अढळपद, सुदामाला सुवर्णपुरी, अथवा सती द्रौपदीची कौरवसभेंत जशी लाज राखलीस, तशी या तुकारामाची तूं आज मनकामना पूर्ण केलीस. तूं आपलें ब्रीद खरें केलेंस. आजपावेतों निरापेक्षबुद्धीनें तुझी एकनिष्ठपणें सेवा केली, त्या तुला आज संकट घालून तेरा दिवस पाण्यांत उभा करून मीं आपल्याला काळिमा लावून घेतली. आजपासून माझी कोणी जरी चरा चरा मान

कापली, सगळ्या जनानें माझी निंदा केली तरी तुला शीण होईल असें संकट मी कधीं घालणार नाहीं. माझा अधिकार काय? आणखी मी अन्नपाणी वर्ज करून तुला सांकडें घातलें काय? श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं पशुमुखानें ऋग्वेद बोलवून सगळ्या जनाला जसें चकित केलें तसें तूं आज अनिर्वाच्य कृत्य केलेंस! असें कृत्य मागेंही झालें नसेल, आणखी पुढेंही होणार नाहीं.

**म्हातारा**-म्हटलें मला थोडें बोलूं देतां काय? आपणच सारखी टकळी चालवितां. लोक आतां असें म्हणतात कीं, तुमच्या वह्याकरितां श्रीपांडुरंगानें हा एक अकरावा अवतार धारण करून तुमच्या वह्या आपल्या मस्तकावर कोरड्या धरिल्या होत्या. लोकांनीं त्या आतां वाजतगाजत पालखींत मिरवत तुमच्याकडे आणल्या आहेत.

**तुकाराम**-पांडुरंगा, तुला मी आतां काय देऊं? तुझ्या नामावरून हा माझा देह ओवाळून टाकतो. चला आजोबा, आपण आतां कीर्तनास उभे राहणार.

**म्हातारा**-अरे पण, तेरा दिवसांत अन्नाचा लेश तुझ्या पोटांत नाहीं याचा कांहीं विचार.

**तुकाराम**-तहानेला तहान पिऊन गेली, भुकेला भूक खाऊन गेली. पांडुरंग माझ्या हृदयांत वास करीत असल्यानें माझी तहान, भूक हरून गेली. ( म्हातारा जातो. जिजाबाई, सईबाई, तानाजीराव, पंडितराव, रंगू, गंगू, प्रवेश करितात. सर्व तुकारामास नमस्कार करितात. सईबाईस पुत्रवती भव असा तुकाराम आशीर्वाद देतो. )

**जिजाबाई**-महाराजांचे चरणापाशीं विनंती आहे कीं, शिवाजी, आमचा सर्वांचा त्याग करून घरादाराचा त्याग करून विदेही होऊन अरण्यांत फिरत आहे. त्याला कृपा करून आपण संसारांत घालावें, नाहीं तर आमचे सर्वांचे प्राण निघून जातील.

**तुकाराम**-यमुनेचे डोहांत श्रीकृष्ण बुडाले, त्यावेळीं यशोदेनें यमुनेंत उडी घालून जीव देण्याचा निश्चय केला. मोठ्यानें आ-

क्रोश करीत धांवत धांवत यमुनेपावेतों आली. सर्वत्रांस वाटलें कीं, आतां ही जीव दिल्याशिवाय राहणार नाहीं. परंतु डोहाजवळ आल्यावर जीव न देतां डोहाचे अलीकडेच तिनें धरणीवर अंग टाकिलें. ही तिची अवस्था ! मग आपण तर माणसेंच आहोंत. शिवाजी कांहीं पाण्यांत बुडाला नाहीं. तो जिवंत असून सत्कार्यीं जर आपला देह लावीत आहे, तर तुह्मी त्याला पुनः संसाररूपी जाळ्यांत कशासाठीं गुंतवितां ? तुह्मी त्याचे कोण आणि तो तुमचा कोण ? तुह्मी विनाकारण दुःख कां करितां ?

**जिजाबाई**–झालें. तुमच्यावर आमचा मुख्य भरंवसा. तुम्हीच असं बोलूं लागलां तर मला माझ्या मुलाची आशा उरली नाहीं. माझ्यावर आकाशच कोसळलें म्हणावयाचें. साधुसंगतीनें फार सुख होतें म्हणतात, त्याचा मला अनुभव आला. व्यर्थ, व्यर्थ मी महाराजांकडे आलें.

**सईबाई**–असें होतें तर मला पुत्रवती भव असा कसा आशीर्वाद् दिला ? महाराजांचें बोलणें असत्य होणार नाहीं. खरें कीं नाहीं रंगू?

**तानाजी**–बाईसाहेब, असें मनांत आणूं नका. महाराज केवळ आपलें सत्व पहात आहेत.

**रंगू**–माणसाचं मेलें जीव जाईपावेतों सत्व पहाणें हें कांहीं साधूस उचित नाहीं.

**गंगू**–आपण कशालाग मध्यें तोंड घालावें. आपली किंमत काय, हें आपण ओळखावें.

**पंडितराव**–तानाजीराव विनाकारण वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं. आपण महाराजांचा अरण्यांत जाऊन पुनः तपास करूं. मग आपल्यास जें उचित दिसेल तसें करूं.

**तुकाराम**–पंडितरावांची कल्पना उत्तम आहे. तुह्मी सर्व त्यांना गांठा. तुमच्या ह्मणण्यावर ते काय ह्मणतात तें पहा.

**जिजाबाई**–महाराज, असें उडवाउडवीचें भाषण आपण कां करितां बरें? आह्मी आपल्यास शरणागत आहों. आपण आतां या

माझ्या सुनेस दिलेला आशीर्वाद पूर्ण करा. शिवाजीचे पोटीं अद्याप संतान नाहीं. मराठ्यांच्या गादीची स्थापना होणें अशक्य आहे. गोब्राह्मणांचा आपल्यास अभिमान असला पाहिजे.

**तुकाराम**–माझ्या अभिमानानें काय होणार आहे? सर्वसाक्षी परमेश्वरास सर्व गोष्टी श्रुत असतात. त्याच्या इच्छामात्रेंकरून सृष्टीची घडामोड होत आहे. त्याची इच्छा नसल्यास आपले प्रयत्न व्यर्थ होत.

**सईबाई**–माझ्या बोलण्याकडे महाराजांचें लक्ष्य मुळींच नाहींसें दिसतें. मला काय आशीर्वाद दिला तो ध्यानांतच नाहीं वाटतें?

**तुकाराम**–या मुलीनें तर मला अगदीं कैचींतच पकडलें म्हणावयाचें. मुली, तुझ्या इच्छेप्रमाणें करणार पांडुरंग समर्थ आहे.

**सईबाई**–पति विदेही असल्यावर पांडुरंग काय करणार हें मला कळत नाहीं. महाराजांचे पाण्यांत बुडवून टाकलेले ग्रंथ तेरा दिवसांनंतर कोरडे निघाल्याचें आम्हाला आतांच एका म्हाताऱ्यानें सांगितलें. त्यानेंच आम्हांस आपले पाय घट्ट धरण्यास सांगितलें आहे. देवानें आपले ग्रंथ कोरडे काढल्याचा आपल्यास किती आनंद झाला आहे! अशा वेळीं आह्मी दुःखांत असावें हें आपणास योग्य दिसतें काय?

**तुकाराम**–तुम्ही फार चतुर आहांत. तुमचे बोलण्याचें मोठें कौतुक वाटतें. बरें असो. आतां शिवाजीची माझ्याकडे येण्याची वेळ झालेली आहे. तुम्ही क्षणभर बसा. तुमच्या देखतच मी आपल्याकडून त्याला चार बोधाच्या गोष्टी सांगून पुनः त्यास संसारांत घालण्याचा प्रयत्न करून पाहतों. (तुकाराम बाजूस उभा राहतो. शिवाजी प्रवेश करितो. आश्चर्यचकित मुद्रेनें उभा राहतो.)

**जिजाबाई**–(शिवाजीच्या गळ्यास मिठी मारून) बाळा शिवबा, मला सोडून तुला अरण्यांत जाववलें तरी कसें? अरे, माझी आज्ञा घेतल्याशिवाय तूं कधीं घराचे बाहेर पाऊल सुद्धां टाकलें नाहींस, असें असून आतांच मजविषयीं इतका निष्ठुर कसारे झालास?

आतां मला आई म्हणून तोंड भरून हाक कोण मारील? मला नेहमीं म्हणत होतास कीं, आई तूं माझें नऊ महिने ओझें बाळगून, असंख्य कष्ट सोसून मला लहानाचा मोठा केलास, रात्रंदिवस माझ्या अंथरुणावर बसून अहोरात्र जागरणें करून, जिवापाड कष्ट करून नानाप्रकारच्या दुखण्यांत औषधें देऊन तूं मला बरें केलेंस, अंगाचें अंथरूण केलेंस, योग्य गुरूकडून माझा विद्याभ्यास करविलास, मला सुख व्हावें म्हणून स्वतःचे जीवाकडे न पाहतां नानाप्रकारचीं संकटें भोगिलींस. आई मी तुझा कसाने उतराई होईन? प्रत्यक्ष मीं आपल्या अंगाच्या कातड्याचा जोडा करून तुझ्या पायांत घातला, तरी तुझे उपकार फिटणार नाहींत. या सर्व भाषणाचा मला आज चांगला परिचय आला. आतां तुला मी जाऊं देणार नाहीं. (बाजूला उभी राहते.)

**शिवाजी**–आई, हा देहही माझा नाहीं, आणखी हा वेशही पण माझा नाहीं. हे हात, पाय, डोळे हे माझे प्रत्यक्ष अवयव असून ते सुद्धां वाटेल त्या वेळीं मला सोडून जातील. माझ्या पाठीपोटीं कोणी नसून एकटा मी अनेक दुःखप्रद जन्म घेऊन चौऱ्यायशी लक्ष योनी सारख्या फिरत आहें. दर जन्मीं आईबाप आहेतच. त्यांना म्हणून खंड नाहीं. पतंग जसा दिव्याला भुलतो, त्याप्रमाणें–मी आणखी माझें–यांत मी गुरफटून गेलों आहें. हजारों लोक आजपावेतों माझ्यापुढें निघून गेले, परंतु मरणानंतर त्यांचें काय झालें त्याची वार्ता सुद्धां नाहीं. तुकाराममहाराजांनीं माझ्या डोळ्यांत अंजन घातलें आहे त्यामुळें आजपावेतों जें अदृश्य होतें तें आतां दिसूं लागलें आहे. आतां त्रिकूटाच्या शिखरावर सुखानें निद्रा करीत आहें. त्रिगुणांचे वळसे आतां चुकविले. वित्त, गोत, स्त्री, पुत्र, माता, पिता, यांचीही मायावळ आतां तुटलेली आहे. सर्व प्रकारें निष्काम झालों आहें. सतरावी जी जीवनकला, ती प्राप्त होऊन तिनें इच्छा पूर्ण केली. आणि ऊर्ध्व मुखानें सोहं शब्दानें मी परमेश्वराला आळवीत आहें. आई, तुकोबाचें असें म्हणणें आहे कीं,

परमेश्वराच्या ठिकाणीं अंतर पडत असेल तर प्रत्यक्ष आईबाप असलें तरी त्यांचा सुद्धां संबंध तोडून टाकावा; मग इतरांची काय कथा? प्रऱ्हादानें आपला बाप जो हिरण्यकश्यपू त्याचा त्याग केला. बिभीषणानें आपला बंधु जो रावण त्याचा त्याग केला. भरतानें श्रीरामचंद्रासाठीं कैकेयी मातोश्रीचा त्याग केला. सांगावयाचें तात्पर्य इतकेंच कीं, तुह्मी माझा नाद आतां सोडून द्या- तुह्मी सुखानें घरीं जा.

**तुकाराम**-( एकीकडे ) शाबास शिवराया शाबास. तुझें भाषण ऐकून माझी चित्तवृत्ति प्रसन्न झाली. गोरक्षनाथाप्रमाणें तूं श्री रामदास स्वामीचें शिष्यत्व करशील-तुझ्या अंगीं वैराग्य पूर्ण बाणलें. देहाचे ठिकाणीं उदास आहेस. आशापाश तुझ्यामागें राहिला नाहीं. श्री ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात कीं, जन्म आणि मृत्यु यालाच मी "संसार" म्हणतों, तो तूं जाळून टाकलास. आतां तुला मोठें राज्य प्राप्त झालें, अथवा तूं मोठाले पराक्रम करून तुझी कीर्ति दिगंत झाली, तरी तूं जनकराजाप्रमाणें विदेही राहशील अशी माझी खात्री झाली. आतां याला क्षात्रधर्माचा उपदेश करावा, ह्मणजे हा आपल्या मातोश्रीच्या आज्ञेप्रमाणें कार्यभाग करील.

**जिजाबाई**-(एकीकडे) माझी अक्कल अगदीं गुंग झाली. मला असें वाटलें नव्हतें कीं, तुकोबाचे उपदेशानें शिवबा इतका पालटेल- इतक्या थोड्या अवधींत इतका पालटावा! उपदेशाचा परिणाम किती जलद झाला पण! तुकाराममहाराजांनाच जर गोब्राह्मणांचा अभिमान नाहीं, तर मी तरी कशाला तळमळ करूं? (उघड) आतां मी फार दिवस जगत नाहीं समजलास? विजापुरास ही बातमी समजली ह्मणजे तिकडे मोठा शोक होणार आहे, याचा तुला कांहीं तरी विचार आहेका?

**राईबाई**-( एकीकडे ) सासूबाईनीं आपली पराकाष्ठा केली, पण उत्तरें कशीं चोख येतात. त्यांना सुद्धां आतां काय बोलावें तें सुचत

नाहीं. आतां तुकाराममहाराजांनीं जर कृपा केली तर माझे पाय भुईला लागतील. माझा सर्वस्वी घात झाला आहे.

( तुकाराम प्रवेश करतो. )

**तुकाराम**–शिवाजी, भगवंतांनीं गीतेमध्यें अर्जुनास क्षत्रियांचे अंगीं काय काय गुण असले पाहिजेत, हें सांगतांना काय सांगितलें आहे बरें ? त्याच्या अंगीं सिंहासारखा पराक्रम, सूर्यासारखें तेज, अंगावर आकाश कोसळून पडलें तरी धैर्य न सोडणें, कमलपुष्प ज्याप्रमाणें अथाक पाणी फोडून वर उमलतें त्याप्रमाणें असंख्य संकटें प्राप्त झालीं तरी क्षत्रिय वीरांनीं आपलें दक्षत्व न सोडणें, सूर्यकमळाचीं पुष्पें जशीं सूर्याकडेच नेहमीं तोंडें करितात, पाठ कधीं दाखवीत नाहींत, त्याप्रमाणें शत्रूस पाठ न दाखवितां युद्धचापल्य दाखविणें, आम्रवृक्षाप्रमाणें औदार्य आणि ईश्वराचे ठिकाणीं निस्सीम भक्ति, हा सातवा गुण त्यांचे अंगीं असला म्हणजे आकाश जसें सप्तऋषींनीं शोभिवंत दिसतें, त्याप्रमाणें ते क्षत्रिय दिसतात. तात्पर्य शौर्य, तेज, धैर्य, दक्षता, युद्धचापल्य, दानशौंडत्व आणि ईश्वरभक्ति हे तुमचे स्वाभाविक गुण असले पाहिजेत. तुम्ही जर सर्वसंगपरित्याग करून तपश्चर्या केली आणि वैराग्य धारण केलें, तर स्वधर्मत्यागाचें मोठें पातक तुह्माला लागेल. शांति, क्षमा, तपश्चर्या, एकांतवास, संसारत्याग, अत्यंत नम्रता आणि वैराग्य इत्यादि ब्रह्मकर्में चांगलीं खरीं. पण तीं कोणास ? ब्राह्मणास मात्र. तुह्मीं जर तीं आचरलींत तर कांहीं पुण्य नाहीं. पातकाचा मात्र संचय. तस्मात् ज्यांनीं त्यांनीं आपआपल्या धर्माप्रमाणें चालावें. तुह्मी या वैराग्यवृत्तीचा एकदम त्याग करा. घर्षणानें जसा अग्नि प्रदीप्त होतो तशी माझ्या भाषणानें तुमची वीर वृत्ति, तुमचें पूर्वींचें क्षात्रतेज, इत्यादि गुण प्रकाशमान होऊं द्या. तुह्मी श्री रामदासस्वामीचे चरणारविंदीं लक्ष ठेवून त्या सद्गुरूची एकनिष्ठपणें सेवा केल्यास तुमचें सर्वस्वी कल्याण होऊन तुमचे जीविताचें सार्थक्य होईल.

**शिवाजी**–महाराजांचे आज्ञेची अवज्ञा करणें हें महत्पाप आहे असें मी समजतों. महाराजांनीं सांगितल्याप्रमाणें श्री रामदासस्वामींचे चरणीं लक्ष ठेवून ही संसारयात्रा सुखाची करण्याचा प्रयत्न करितों. ( तुकाराम वस्त्रें, भूषणें शिवाजीचे आंगावर घालतो.)

**जिजाबाई**–महाराजांनीं मला आज पुत्ररत्न दिलें यावद्दल मी महाराजांचे काय उतराई व्हावें बरें ?

**तुकाराम**–श्री पांडुरंगाची भक्ति करा, म्हणजे आम्हास सर्व पोहोंचलें. तुम्ही आपापले घरीं आतां जा. तुम्ही फार थकला आहांत. ( सर्व नमस्कार करून जातात व तुकारामही एका बाजूनें जातो.)

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**–आळंदी येथील ज्ञानेश्वरमहाराजांचें देवालय.

( रामेश्वरभट अंगाची आग होते म्हणून तळमळतो आहे. जवळ नित्यानंद, सदानंद बसले आहेत, व इतर शिष्यमंडळी बसली आहेत, असा पडदा उघडतो)

**रामेश्वर**–यतिमहाराज, आतां माझी वांचण्याची आशा नको. माझ्या सर्वांगाचा डोंब झालेला कायम आहे. माझ्यानें आतां जास्त बोलवत नाहीं.

**नित्यानंद**-महाराजांनीं फारसें बोलूं नये. आम्हांस इतकेंच सांगावें कीं, आज आठ दिवस आपण जें ज्ञानेश्वरमहाराजांचे घरीं धरणें धरून बसलों आहोंत त्याचा कांहीं उपयोग झाला किंवा आपले सारे श्रम फुकट गेले ?

**सदानंद**–जे आहेत ते आपणांस कांहीं साक्षात्कार किंवा दृष्टांत वगैरे कांहीं झाला किंवा नाहीं ? म्हणजे त्याप्रमाणें वागण्यास बरें पडेल, याला जे आहेत ते औषध नाहीं कांहीं नाहीं.

**रामेश्वर**-मला जो दृष्टांत झाला आहे तो जर तुम्ही ऐकला

तर तुह्मांस अत्यंत वाईट वाटणार आहे. त्यावर तुमचा विश्वास बसणार नाहीं. तुह्माला माझा राग येईल.

**नित्यानंद**–काय, ज्ञानेश्वरमहाराजांचे वाक्यावर आमचा विश्वास नाहीं ? असें ह्मणूं नका.

**सदानंद**–जे आहेत ते मी सांगूं का काय दृष्टांत झाला आहे तो ? त्या फकीराला शरण जावें ह्मणजे यांची व्याधि दूर होईल.

**नित्यानंद**–मग यांत आम्हांस वाईट कां म्हणून वाटावें ? परंतु त्या तुकारामास शरण जा असा जर दृष्टांत झाला असेल तर तुमची आमची ही शेवटचीच भेट.

**रामेश्वर**–त्या यवनाला शरण जाण्यास तुमची हरकत नाहीं; पण तुकारामास नको म्हणतां ? काय तुमची दुष्ट बुद्धि ! जा मला तुमची संगति पुरे झाली आतां !

**नित्यानंद**–फकीरानें तुमच्या अंगाचा एका पळांत भडका केला हेंच त्याच्या साधुत्वाचें दर्शक आहे; म्हणून आम्ही ह्मणतों त्यालाच शरण जावें, म्हणजे आपली व्याधि दूर होईल. आतां तुह्माला आमची संगति पुरे झाली ह्मणतां तर तुमचीही पण संगति आह्मांस पुरे झाली. तुमची आमची हीच भेट. दादोजी कोंडदेव सर न्यायाधीश यांच्याकडे जाऊन त्या तुक्याला पकडून आणवितों. तुह्मी त्याला तिकडे शरण जा नाहीं तर इकडेच राम ह्मणा. ( दोघे जातात. )

**रामेश्वर**–( आत्मगत ) खरोखर मी आतां व्याधीनें पडलों आहे, नाहीं तर या बोक्या संन्याशांची खोड बरीच जिरविली असती. त्यांच्या नादानें आणखी त्या मंबाजीच्या नादानें त्या महा साधूचे प्रासादिक ग्रंथ मीं पाण्यांत बुडविले. परंतु भगवंतानें ते तेरा दिवस उदकांत कोरडे राखले. अहाहा ! त्या महा साधूची ही केवढी थोरवी ! हे नीच संन्यासी मला म्हणतात त्या फकीरास शरण जा. श्री ज्ञानेश्वरमहाराजांचा मला असा दृष्टांत झाला आहे कीं, तूं त्या महात्म्याचा व्यर्थ छळ केलास, ह्मणून श्री

पांडुरंगानें तुला त्या फकीराकरवीं अशी शिक्षा केली आहे. आतां तूं तुकाराममहाराजांना शरण जा, ह्मणजे तुझी व्याधि तावडतोब नष्ट होईल. ( एक शिष्य प्रवेश करितो. )

**शिष्य**–महाराज, आपला निरोप मी तुकाराममहाराजांस कळविला. आपल्या शरीरास व्याधि उत्पन्न झाली आहे, अशी तुकारामास बातमी कळतांच त्यांना फार वाईट वाटलें. ते आपल्या समाचारास इकडे येण्यास निघाले आहेत. हा अभंग त्यांनीं आपल्यास लिहून दिला आहे. तो आपण पाठ करावा ह्मणजे आपला दाह कमी होईल असें त्यांनीं सांगितलें आहे. ( अभंगाचा कागद हातांत देतो व जातो. )

**रामेश्वर**–( कागद मस्तकाला लावून नमस्कार करितो. ) काय बरें महाराजांनीं या कागदांत लिहिलें आहे ? महाराजांचे ग्रंथ इंद्रायणीचे डोहांत तेरा दिवस कोरडे राहिले, हें पाहून महाराजांविषयीं मीं पूर्वीं धरलेली माझी दुष्ट बुद्धि नष्ट झाली. ( पत्र वाचतो. )

**चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र हे न खाती सर्प तथा ॥ १ ॥ विष तें अमृत अघात तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ॥ २ ॥ दुःख तें देईल सर्व सुखफळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ॥ ३ ॥ आवडेल जीवां जिवाचिये परी । सकळां अंतरीं एक भाव ॥ ४ ॥ तुका ह्मणे कृपा केली नारायणें । जाणिजे तें येणें अनुभवें ॥५ ॥**

अहाहा ! काय हीं वाक्यें आहेत बरें ! एक एक अक्षर बिनमोल आहे. शुद्ध चित्त असल्यावर काय होणार नाहीं बरें ! हा अभंग वाचल्याबरोबर माझ्या अंगाची आग कमी व्हावयास लागली. आतां मी याचीं पारायणें करितों ह्मणजे माझी प्रकृति अगदीं साफ होऊन जाईल. अशा सत्पुरुषाच्या

पायाचें दर्शन घेण्यास आपण सत्वर जावें हेंच उचित आहे. (जाऊं लागतो, तों त्यास तुकाराम भेटतो. उभयतां एकमेकांच्या पायां पडतात.) महाराज, मी आपला अत्यंत अपराधी आहें. मीं आपला विनाकारण छळ केला. त्याचें प्रायश्चित्त मला परमेश्वरानें योग्य दिलें. आपण श्रीविठ्ठलभक्त, जीवनमुक्त, नेहमीं ब्रह्मानंदांत मग्न, कामक्रोधाला तिळांजळी अर्पण केलेले, मूर्तिमंत क्षमा अंगांत बाणलेले, देव, द्विज यांचें पूजन करणारे, आणि संतग्रहमंडळांत केवळ सूर्याप्रमाणें प्रकाशमान, असे जे तुह्मी त्या तुह्माला मी अनन्यभावें शरण आहें. हेतु इतकाच कीं, या पायांची रात्रंदिवस सेवा घडावी.

**तुकाराम**-छे छे. आपण असें भाषणसुद्धां करूं नका. आपण ब्राह्मण, मी यःकश्चित् शूद्र. आपल्या चरणाची सेवा रात्रंदिवस करण्यास मीच तयार असलें पाहिजे. आपल्या शरीरास आराम झालेला पाहून मला फार आनंद झाला आहे. श्री ज्ञानेश्वरमहाराजांनीं आपल्या संकटाचें निरसन केलें. आपल्याला ज्यानें एका शब्दानें व्याधि उत्पन्न केली, तो कोणी तरी सिद्ध पुरुष असला पाहिजे. त्याचें दर्शन आपणास पुनः झालें, तर फार उत्तम होईल. पण हें कोण बरें आपणाकडे येत आहे?

(अनगडशा प्रवेश करितो.)

**अनगडशा**-(आत्मगत) नीहायत बडे ताजूबकी बात हय् के रामेश्वर भटजीके तनकी गर्मी तुकारामनें एक लव्हजमे नेस्त नाबूद किया. इस्में हासल मतलबकी बात ये हय के, तुकाराम बडा साई हय. मेरे दिलकी खायश अब ये हय के मय् उस्कू आखोंसे देखूं और उस्की मेहेरनजर पैदा करूं. ये दो शक्स कौन हय भला? पहिला तो मैने पूरा पैछाना. योहि रामेश्वरभट हय. लेकिन उस्के सात दुसरे दो संन्यासी थे, ओ कहां निकल गये?

और जो दूसरा चेहरेपरसे बहुति अकलमंद और दानीशमंद नजर आता हय, और जिसका मिजास बहोत थंडा नजर आता हय, येहि शायद तुकाराम हय ऐसा मालूम होता हय. ( उघड ) आदाब् अर्ज् आदाब् अर्ज् बंदेकी तसलीम हय.

**तुकाराम**–सलाम सलाम, मेरे भाईसाहेब आपकी रहा ये गरीब देखताथा. भगवान्ने आपकी मेरी मुलाकत किया, ये निहायत दिलखुशीकी बात होगयी.

**अनगडशा**–मै तो मुसलमीन, आप तो हिंदू, दोनो महजबमे तफावत जमीन–आस्मानका;तुमारी हमारी दोस्ती कैसी हो जायगी?

**तुकाराम**–ऐसा नही समजना. देव एक हय. हाम उस्कू राम कहते हय. तुम रहीम कहते हय, या खुदा कहते हय. दोस्ती होनेकू क्या हरकत हय? मेरे दिलमे हिंदू हो या मुसलमीन हो दोनो सरीके कोम हय. खुदाको दोनो सरीके हय. मुसलमीन लोग मेरे भाई हय. मेरे देशमे रहनेवाले हय. कायमके रहनेवाले हय. इसलिये हिंदू मुसलमीन बिरादर हय. मुसलमीनके वास्ते मैने आपने ख्यालमे मुंढा, डोईफोडा, मलंग, दर्वेस, हकीमकी गोली, वगैरा लिखा हय. उस्मे मैने ये कहा हय के, अल्ला देवे, अल्ला दिलावे, अल्ला दिखावे, अल्लाबिगर कोई नहि, अल्लाकरे सोई होय. आप लोगोके समजनेके लिये मैने आपने ख्याल उर्दु जबानमे बनाया हय.

**अनगडशा**–वहावा, सुभानअल्ला, आपकी मिजास कितनी आच्छा हय्. आपलोगोकूं इसलाम हो या हुनूदहो दोनो सरीके हय् आप् अकब्बर पादशहा हो या जगन्नाथ पंडत हो, आपके ख्याल मै पढ चुका हय्. आजसे हिंदूमुसलमीन मेरे दिलमे बिरादर ठैरे.

**तुकाराम**–दुरुस्त. सब् महजब्का हासल् मतलब् ये हय् के गरीबके उपर रहिम नजर करना. ओ आदमी हो या जान्वर हो

हरगिज् उस्कू सताना नहि. दुसरे लोगोंके औरतांकू आपनी मादर समजना और दुसरेके दौलतकू लाथ मारना. झूटि बात् नहि करना. अम्मल नही करना. खुदाहुताला जिस्कू हम् राम कहते और तुम् रहिम् कहते उस्की हम्मेश याद् करना.

**अनगडशा**–बहुत बेहेतर. हमारे कुरानेशरीफमे येहि कलम् किया हय्. आजसे मै तुमारा दोस्त या चेला बनता हूं. मेरे उपर एहेसान करना, रामेश्वरभटजीकूं मैंने ताराज् किया उस्की मुजे माफ हो.

**रामेश्वर**–आजसे तुमारी हमारी दिलजमाई होचुकी. तुकाराम-महाराज आपने दोनोंके उस्तादेशरीफ हय्. आब् हातसे हात मिलाव. मीठी मीठी बाते करेंगे. ( तुकाराम दोघांचे हात धरून हातांत हात घालितो ).

**तुकाराम**–हिंदुमुसलमान या देशमातेचीं लेकरें आहेत. ज्या परमेश्वरानें हिंदूला उत्पन्न केलें, त्यानेंच मुसलमानाला उत्पन्न केलें. एकाच आईबापाचीं लेकरें. सूर्याला निरनिराळ्या भाषेंत निरनिराळ्या देशांत निरनिराळीं नांवें आहेत, ह्मणून सूर्य कांहीं निराळा आहे काय ? तसाच परमेश्वर एकच आहे. मुसलमान निराळ्या नांवानें हाक मारतात, आह्मी निराळ्या नावानें हाक मारतों. ईश्वरानें अनेक पशु पक्षी उत्पन्न केले आहेत. त्यानें चवदा भुवनें केलीं आहेत. गगन, चंद्र, सूर्य, तारे उत्पन्न केले आहेत. पंचमहाभूतें उत्पन्न केलीं आहेत, तो नाटकी प्रभु आहे, त्याची लीला अगाध आहे. हा त्याचा खेळ आहे. त्यांत कोणी कोणाला ठार मारण्यास अधिकारी होत नाहीं. स्थूल, सूक्ष्म जीवजीवांचे अंतरीं परमेश्वर आहे, ह्मणून आपण सर्व जीवावर सारखी ममता करावी. मुंगीपासून तों हत्तीपावेतों सर्व जीव ममतेनें वागवावे. आपलें चित्त शुद्ध असल्यावर व्याघ्र आपणास खाणार नाहींत. सर्प दंश करणार नाहींत. विषाचें अमृत होईल. ( रामेश्वरभट व अनगडशा जातात. तुकाराम ज्ञानेश्वरमहाराजांची प्रार्थना करितो ).

**तुकाराम**–ज्याप्रमाणें गंगेची पूजा करावयाची ह्मणजे गंगेचेंच उदक घ्यावें लागतें, त्याप्रमाणें श्री ज्ञानेश्वरमहाराजांची स्तुति करावयाची म्हणजे त्यांच्याच वाणीचा आधार धरून केली पाहिजे. स्तुति करण्यापुरता सुद्धां माझा अधिकार नाहीं. ज्यांच्या चरणांचे रजःकण कपाळीं लागले तर वासनेचें बीज जळून जातें, रामनामाची आवड उत्पन्न होते, घटकोघटकीं सुख वाढूं लागतें, प्रेमानें कंठ दाटून येतो, नेत्रावाटें आनंदाश्रूचा लोट चालतो, हर्षानें ब्रम्हांड उकलतें कीं काय असा भास होतो, आणखी मीपणा समूळ नष्ट होतो. मुक्तांत अग्रगण्य, ब्रह्मचर्याचा शिरोमणि, योग्यांनीं ज्याला आपल्या मुकुटाच्या स्थानीं जागा द्यावी, आणखी भक्तमंडळींत परम श्रेष्ठ, असे जे परब्रह्म ज्ञानेश्वर, त्यांना माझा नमस्कार असो. ज्या गीतार्थाची थोरवी प्रत्यक्ष शंकरानें वर्णन केली आहे, जिच्यापुढें वेद स्तब्ध राहतात, त्या भगवद्गीतेवर टीका करून आम्हां भाविक जनांना सोपी केली, प्रतिष्ठानच्या विप्रांच्या गर्वाचें खंडन करून रेड्याच्या तोंडांतून ज्यानें वेद बोलविले, आणि ज्यानें निर्जीव भिंत चालविली, ते प्रत्यक्ष पांडुरंगच असून या कलियुगांत गोब्राम्हण त्रस्त झाल्यानें प्रत्यक्ष त्यांनींच अवतार धारण केलेला आहे. तस्मात् त्यांना हा तुकाराम अनन्यभावें शरणागत होऊन अशी प्रतिज्ञा करतो कीं, त्यांचेच चरणाचे प्रसादानें फक्त नामस्मरणाच्या योगानें ही काया ब्रम्हरूप करीन आणि सदेह वैकुंठाला जाईन – ( जातो. )

---

## प्रवेश ४ था.

---

**स्थळ**–शिवाजीमहाराजांचा वाडा.

( शिवाजी प्रवेश करतो. )

**शिवाजी**–(एकीकडे) हे परमेश्वरा, तुझी स्तुति करण्यास कोण समर्थ आहे? सहस्रमुखी शेष, पण तोही बापडा भागला. वेदाला तुझा

अंतपार लागला नाहीं, ब्रम्हादिकांच्या लक्षांत येत नाहींस, तेथें आमची कथा काय? अव्यक्त, अलक्ष्य, अपार, अनंत आणि निर्गुण असा तूं आहेस. ज्याचा जसा भाव असेल तसा तूं त्याला पावतोस अशी माझी आतां खात्री झाली. माझ्या पहिल्या वृत्तींत आणि सांप्रतच्या वृत्तींत किती तरी तफावत पडला? कोंवळ्या उसाचा रस जर आपण प्यालों तर त्यांत गोडी कांहीं लागणार नाहीं, तसें ज्या मनुष्याला परमेश्वराच्या स्वरूपाचें ज्ञान झालें नाहीं त्याचें भाषण फिक्कें लागतें. माझ्या आयुष्यक्रमांतील अत्यंत सुखाचा दिवस म्हटला म्हणजे स्वामी रामदास आणि तुकाराम यांचें दर्शन ज्या दिवशीं झालें तो होय. सारांश, कामक्रोधादि षड्रिपु आणि अहंतातृषादि षडूर्मि यांचा मजवर ताबा होता, मी त्यांचा बंदा गुलाम होतों, परंतु आतां मींच त्यांना आपल्या ताब्यांत ठेविलें आहे. माझ्या वीरवृत्तीला आणि क्षात्रधर्माला त्यांची गरज आहे म्हणून मर्यादितपणें मी त्यांचा उपयोग करीन, आणि ज्या कुळांत आणि ज्या देशांत माझी उत्पत्ति झाली आहे त्या कुलाचें आणि त्या देशाचें नांव अजरामर करीन.

( सईबाई प्रवेश करते, शिवाजी उघड बोलतो. )

श्री तुकाराममहाराजांनीं माझें मन पुनः या संसारांत गोवून टाकिलें. मातुश्रीकरितां आणि स्वामीची आज्ञा मान्य केलीच पाहिजे म्हणून मी पुनः घरीं आलों. शिवाय मराठ्यांचे गादीची स्थापना करणें हा जो माझा हेतु तोही पण संन्यास वृत्ति घेऊन सिद्धीस गेला नसता. मराठ्यांचे गादीची स्थापना करण्याचा संकल्प जरी सिद्धीस गेला, तरी तें सर्व श्रेय तुकाराममहाराजांकडेसच आहे, माझ्याकडे कांहीं नाहीं. कारण त्यांच्याच उपदेशानें मी पुनः संसार पाहूं लागणार. आमच्या मातुश्रीवर त्यांनीं मोठाच अनुग्रह केला म्हणावयाचा. कारण मी जर पुनः घरीं आलों नसतों, तर मातुश्री कांहीं फार दिवस वांचली नसती. तुमचीही पण हीच गति झाली असती. सर्व प्रकारें स्वामीचे

मजवर तर काय परंतु या महाराष्ट्र देशावर अनंत उपकार झाले. आज तुकाराम आहेत म्हणून मराठ्यांच्या गादीची स्थापना होण्याचा संभव तरी आहे–असो; आतां माझ्याबरोबर तुकाराममहाराजांचे दर्शनाला चलायचें का? आज त्यांची स्वारी येथें आपल्या गांवांत आली आहे ह्मणून म्हणतों. असा संकल्प मनांत करून जायचें कीं, जर आपल्यास राज्यप्राप्ति होणार असेल तर श्री तुकाराममहाराज आपल्यास प्रसाद ह्मणून आपल्या पदरांत भाकर घालतील. तीच आपण शकून गांठ बांधूं.

**सईबाई**–(एकीकडे) पहिल्या स्वभावांत आणि आतांच्या स्वभावांत जमीन–अस्मानचें अंतर. आतां खरा राग कसा तो येतच नाहीं. आलाच कदाचित् थोडासा तर आपले आपणच हंसूं लागायचें. विस्तव हातांत धरवेल, पण मर्जी संभाळण्याचें कठीण होतें. अगदीं सर्व गोष्टी मर्जीबरहुकूम झाल्याच पाहिजेत. आतां स्वभावांत इतकी कांहीं शांतता उत्पन्न झाली आहे कीं एखाद्याला वाटेल हे स्वयंभू देवच आहेत. अत्यंत सुखाच्या गोष्टी इकडे निरस वाटतात. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, चंदनाच्या शेजारीं जरी कडुनिंबाचीं झाडें असलीं, तरी तींही सुवासिक होतात, त्याप्रमाणें इकडच्या संगतीनें घरांतील चाकरमाणसांच्या वृत्ति सुद्धां पालटूं लागल्या आहेत. (उघड) तेवढें राज्य मिळालें ह्मणजे काम झालें वाटतें? मला काय त्यांत आहे? मी आपली कोरडीच.

**शिवाजी**–मराठ्यांच्या गादीची स्थापना झाली, आणि मी आपल्याला छत्रपति ह्मणवूं लागलों तर यांत तुला कांहींच कां मिळालें नाहीं! तुला महाराणीसाहेब असें नाहीं का या जगांत म्हणणार!

**सईबाई**–मला नको इतका मोठेपणा. मला इकडची तेवढी सेवा असली म्हणजे झालें. पण आपल्यामागें मराठ्यांचें राज्य चालणार कसें, याची कांहींच काळजी नको का?

**शिवाजी**–हं हं ! आतां आलें माझ्या ध्यानांत. आपल्यास चिरंजीव पाहिजेत हेंच किनई ?

**सईबाई**–इकडे नकोच असेल अगदीं. मलाच तेवढी गरज आहे वाटतें ?

**शिवाजी**–आपल्याला नाहीं गरज. असेल देवाच्या मनांत तर होईल. मला फक्त मराठ्यांच्या गादीची स्थापना व्हावी एवढीच इच्छा आहे. आतां तुझ्याकरतां दुसरा संकल्प तूंच मनांत धरून स्वामीस नमस्कार कर. जर तुला त्यांनीं श्रीफल प्रसाद ह्मणून दिलें, तर तुला पुत्ररत्न खास होणार असें पक्कें समज. तानाजीराव आणि पंडितराव यांच्या हातीं स्वामीस मी निरोप पाठविला आहे कीं, हा दास चरणाचें दर्शन घेण्याकरितां येत आहे. शिवाय आईसाहेबांची मला अशी आज्ञा आहे कीं, जोंपावेतों महाराजांची स्वारी येथें आहे तोंपावेतों नित्यशः दर्शनाला जात जावें.

**सईबाई**–मला सुद्धां त्यांचें असेंच सांगणें आहे. ह्मटलें रंगूला आणि गंगूला बरोबर घ्यावयाचें का ?

**शिवाजी**–नको. आपला हा गुप्त बेत कोणासच कळवावयाचा नाहीं. नाहीं तर स्वामींनीं आपल्यास भाकरच प्रसाद दिला ह्मणून जिकडे तिकडे बातमी पसरेल. घरीं आल्यावर फक्त मातुश्रीस मात्र झालेली हकीकत कळवायची.

**सईबाई**–जर स्वामींनीं आपल्यास भाकर आणखी नारळ दोन्ही जर प्रसाद ह्मणून दिले, तर सासूबाईंना किती पण धन्य धन्य वाटेल ?

**शिवाजी**–तें सारें खरें, पण तुकाराममहाराज आपल्याजवळून कांहींच घेत नाहींत, याला तोड काय करावी ?

**सईबाई**–याला एक युक्ति आहे. स्वामी तर कांहीं धनद्रव्याला शिवत नाहींत. तेव्हां मला असें वाटतें कीं, त्यांचे कुटुंबास आणखी मुलाबाळांस चार दिवस आपण आपल्या घरीं आणून ठेवूं. त्यांना चांगले मौल्यवान् दागिने, उंची उंची कपडे, असे गुप्त

रीतीनें बरोबर देऊन, देऊं परत पाठवून. मला वाटतें आपण बोलावण्याचा उशीर आहे कीं, त्यांची बायको आपल्या घरीं येण्याचें तेव्हांच कबूल करील. मुलेंही पण मोठ्या आनंदानें आपल्या समागमें येतील.

**शिवाजी**-तूं अजून जिजाईला आणखी तिच्या मुलांना ओळखलें नाहींस. पतीच्या ठिकाणीं तिचें अत्यंत लक्ष असून ती माउली मोठी सत्वशील आहे. निष्कपट आहे. रावणाप्रमाणें ती पांडुरंगाची विरोधभक्ति करते. आपल्या कानीं गुणगुण आलेली तुला स्मरते का ? ती एक दिवस नहात असतां एकाएकीं व्याह्याकडील मोठी दणक्याची अक्षत आली. लौकर लौकर नेसण्यास वस्त्र पाहूं लागली तों तुकोबानीं अगोदरच तिचें वस्त्र एका अनाथ ब्राह्मणस्त्रीला धर्मार्थ देऊन आपण गेले होते निघून भामनाथडोंगरावर ! अक्षतीचे लोक घरांत भराभर शिरले. अशा संकटांत पडतांच पांडुरंगानें आपल्या अंगावरचा पितांबर तिला वरून फेंकून दिला ! केवढी तिची योग्यता ! द्रौपदीला देवानें असाच आपल्या अंगावरचा पितांबर नेसविला होता. दुसऱ्या अनेक गोष्टी आपल्या कानावर आल्या आहेत.

**सईबाई**-ऐकलें होतें खरेंच कीं, तुकोबाचे वडलाचें श्राद्ध होतें. श्राद्धाची वेळ तर टळून गेली. तुकोबा गेले होते गहूं आणण्याकरितां. बायको वाट पाहून पाहून कंटाळली. शेवटीं तुकोबा जों घरीं येऊन पाहतात तों हजारों पात्र जेवून गेलेलें आहे. मग शोधांतीं समजलें कीं, पांडुरंग तुकोबाच्या स्वरूपानें येऊन सर्व प्रकारचें साहित्य बरोबर आणून सर्व देहूगांवाला भोजन घालून भांडीं परत करण्याच्या निमित्तानें जे घराबाहेर पडले ते पुनः परत आले नाहींत. मग खरे तुकोबा विठोबाच्या देवळांत जाऊन शोक करूं लागले. तेव्हां देव प्रसन्न होऊन त्याच्याबरोबर घरीं येऊन जेवले.

**शिवाजी**-अहाहा ! केवढा अधिकार तुकारामबोवांचा ! मला नाहीं वाटत कीं, आपल्या नवऱ्याला सोडून एक दिवस तरी ती

आपल्या घरीं राहण्याला येईल. मुलें सुद्धां तशींच. तीं आपलें स्वतःचें घर सोडून आपल्या घरीं येणार नाहींत.

**सईबाई**–पण तुकोबाच्या बायकोचा समज तर असा आहे कीं, मला माझ्या माहेरच्या बहिरोबा देवानें आणखी मंगळाई देवीनें पितांबर दिला; म्हणून म्हणतें कीं, ती आपल्या घरीं खात्रीनं येईल.

**शिवाजी**–बरें तर हातच्या कांकणाला आरसा कशाला? चला प्रयत्न करून पाहूं. ( जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळ**—तुकारामाची पुण्यांत राहण्याची जागा.

( तानाजीराव व पंडितराव प्रवेश करितात. )

**तानाजी**–सरकारांनीं श्रीतुकाराममहाराजांस दोन लक्षांचे गांव जहागीर करून दिले त्याच्या सनदा आपल्याकडून रवाना झाल्या किंवा नाहीं ?

**पंडितराव**–तुह्माला कांहींच बातमी नाहीं तर? बरोबर आहे, तुम्हीं मध्यंतरीं परगांवीं गेला होता हें माझे लक्षांत नाहीं. तुकाराम जवाहिराला शिवले नाहींत, हें तर तुह्मांस माहीत आहेच. पुढें महाराजांनीं विरक्तपणाचा बाह्य दृष्टीनें त्याग करून घरीं आल्यावर त्यांच्या नांवें दोन लाखांच्या सनदा करून मजबरोबर पाठविल्या. त्या पाहून तुकारामानें जवाहिराप्रमाणेंच त्यांचा निषेध केला, व सनदा परत पाठविल्या.

**तानाजी**–पण कायहो, पंडितराव, सरकारचा तर असा नियम आहे कीं, धर्म केलेली वस्तु ह्मणून पुनः परत घ्यावयाची नाहीं. जवाहीर तुकारामानें घेतलें नाहीं तें त्यांनीं ब्राह्मणांस वाटून दिलें. आणखी त्यांतला कांहीं भाग त्या गरीबाच्या मुलांना

ह्मणजे गण्याला आणखी गोप्याला दिला. महाराजांनीं मग सनदांचें काय केलें ?

**पंडितराव**–सरकाराला मोठेंच कोडें पडलें. आईसाहेबांची सल्ला घेतली, सर्व वृद्ध मंडळीची सल्ला घेतली, परंतु कोणालाच तोड निघेना. जो तो तुकाराममहाराजांची निस्पृहता वर्णन करूं लागला. नंतर सरकारांनीं आपले गुरु श्रीरामदासस्वामी यांना जाऊन विचारिलें. त्यांनीं तुकाराममहाराज, हे केवळ अवतारी आहेत, महावैष्णव आहेत, ज्या ज्या वेळीं भगवंतांनीं अवतार घेऊन धर्माची संस्थापना केली त्या त्या वेळीं त्यांचेबरोबर तुकारामांनीं अवतार घेतलेला आहे, ते निरिच्छ असणारच, असें सांगितलें.

**तानाजी**–भगवंताच्या प्रत्येक अवतारीं तुकाराम आहेतच, ह्मणजे मी नाहीं समजलों.

**पंडितराव**–आपल्या सरकारांनीं सुद्धां श्रीरामदासस्वामीस असाच प्रश्न केला. त्यावर ते ह्मणाले कीं, नरसिंह–अवतारीं प्ऱ्हाद तुकारामच होता. रामावतारीं भरत होता. कृष्णावतारीं उद्धव होता. नंतर नामदेव, श्रीपांडुरंगाचा केवळ प्राण झाला, आणि आतां तोच हा तुकाराम. रामदास ह्मणाले देव आणि भक्त हे निरनिराळे होत नाहींत. जशी सूर्य आणि त्याची प्रभा एकत्र असते, तसेच ते आहेत. आपले रामदास सुद्धां मारुतीचा अवतार आहेत.

**तानाजी**–पण पुढें सनदांचें काय झालें ?

**पंडितराव**–रामदासांनीं त्या सनदा चिंचवडच्या देवाला देण्याविषयीं आज्ञा केली. याप्रमाणें मौज झाली. आतां तुकारामाच्या मुलाला कांहीं तरी जहागीर करून द्यावी असा आपल्या सरकारचा विचार आहे. पण तो केव्हां, तुकारामानंतर. तें असो. हे पहा तुकारामबुवा आले.

( तुकाराम प्रवेश करितो. उभयतां त्याचे पायां पडतात. )

**तुकाराम**–का बुवा झालें का तुमच्या मनाप्रमाणें ? आले शिवाजी पुनः संसारांत ?

**तानाजी**–महाराजांनीं कृपा केली ह्मणून सरकारचे पाय आमच्या पुनः दृष्टीला पडले. सर्व महाराजांच्या उपदेशाचा परिणाम आहे. सरकार आणि त्यांचें कुटुंब स्वामीचे दर्शनास यावयाकरितां निघालीं आहेत.

**तुकाराम**–विनाकारण आमच्या दर्शनाचा सोहळा काय ह्मणून करतात, कळत नाहीं. आमच्या दर्शनापासून त्यांना काय सुख वाटत असेल तें असो; श्रीरामदास त्यांचे गुरु आहेत, त्यांच्या दर्शनास नित्यशः जात जा ह्मणजे झालें, असें मी त्यांना आतां सांगतों. ( शिवाजी व सईबाई प्रवेश करितात. पायां पडतात. तुकाराम उलट पायां पडतो. ) का सईबाई, झालें का तुमच्या मनाप्रमाणें आतां ? आतां शिवाजी तुमच्या ताब्यांत सांपडला आहे, त्याला आतां सोडूं नका.

**शिवाजी**–महाराजांच्या पुढें आलों ह्मणजे मी यां संसाराच्या जाळ्यांत पुनः विनाकारण पडलों, ह्मणून माझ्या मनाला पश्चात्ताप वाटावयास लागतो.

**तुकाराम**–संसारांत राहून परमेश्वराकडे लक्ष लावल्यास तो संसार सुखाचा होतो. जरी संसाराचे अंगीं पुष्कळ व्यसनें आहेत तरी कीर्तनाच्या योगानें आपल्या ठिकाणीं शुद्धता आणितां येते. आपल्या अंगीं शुद्धता आल्यानंतर सर्व जग आपल्याला शुद्धच दिसूं लागतें. कोठेंच विषम भासत नाहीं. सर्व त्रिभुवन सोवळेंच आहे, असें भासूं लागतें. अशी स्थिति झाली ह्मणजे ईश्वराशीं व आपल्याशीं तादात्म्य होऊन जातें.

**शिवाजी**–संसारांत राहून माझ्या मनांत अशी स्थिति उत्पन्न होण्याला मीं काय करावें ? मला वाटतें मला निरंतर आपला सहवास होईल, तर माझ्या मनाची स्थिति आपण सांगतां त्याप्रमाणें होण्यास फार अवधि लागणार नाहीं.

**तुकाराम**–तुम्हीं रामदासस्वामींची कृपा संपादन केलेली आहे. त्यांचे सन्निध वारंवार वास केला ह्मणजे तुमचे चित्तास संसार दुर्धर वाटणार नाहीं. तुमच्या जन्माचें सार्थक होईल. यापेक्षां अधिक इच्छा काय आहे ?

**शिवाजी**–मीं काय सांगावें ? आपण सर्व जाणतच आहां. आपल्या महाराष्ट्रदेशांत मराठ्यांच्या गादीची स्थापना व्हावी ही माझी जन्मापासून इच्छा आहे. कुटुंबाचा मनोदय काय आहे, हेंही पण महाराज जाणतच आहेत. तथापि लौकीकार्थ अथवा त्यांच्याच तोंडांतून ऐकावयाचा असल्यास महाराजांनीं त्यांनाच पुसावें.

**सईबाई**–( एकीकडे ) हें काय बाई ? मला काय म्हणून विचारावें ? माझ्या गळ्यांत दिली आपली घोरपड अडकवून. आपल्या मनांत नाहींच जसें ? शिवाय मला बोलावयाची लाज नाहीं का वाटत ? ( उघड ) मला अगदीं बोलावयाला लावायाचें नाहीं वर कां ? सगळें इकडेच बोलणें व्हावें.

**शिवाजी**–त्यांच्याशीं बोलावयाला काय हरकत आहे ? देवाशीं नाहीं का आपण मनांत बोलत ? आपल्या आईबापांबरोबर आपण किती लडिवाळपणें आणि प्रेमानें बोलतो ? तसेंच यांच्याशीं बोलावयाचें.

**तुकाराम**–मी कांहीं जोतिषी नाहीं, ह्मणून तुमचे ग्रह पाहून तुम्हीं ह्मणतां त्या गोष्टी मी तुह्मांस सांगूं शकेन. मी कांहीं सामुद्रिक शास्त्र जाणत नाहीं. देवरुषी किंवा पंचाक्षरी नाहीं ह्मणून तुह्मांला भुताकेतांची, यक्षकिन्नरांची अथवा राक्षसांची बाधा आहे किंवा काय तें पाहूं शकेन. मला जन्मकुंडली समजत नाहीं. तें असो; पण कायहो सईबाई तुमची इच्छा काय आहे ?

**सईबाई**–( लाजून ) जन्मोजन्मीं याच पायाची दासी असावें, वंशपरंपरेनें या भरतभूमीची सेवा घडावी, आणखी आपल्यासारख्यांचा सहवास रात्रंदिवस असावा, ह्मणजे संसारयात्रा सुखदायक वाटेल.

**तुकाराम**–शाबास बाई, तूं महा साध्वी आहेस. तुझे मनोरथ श्रीपांडुरंग पूर्ण करील. कोण आहे तिकडे ?

**जिजाई**–( पडद्यांतून ) काय काम आहे ?

**तुकाराम**–ह्मटलं जरा बाहेर येऊन जा बरें.

**जिजाई**–( प्रवेश करिते. शिवाजी व त्याची बायको पायां पडतात. ) माझ्या पायां पडण्याचें कांहीं कारण नाहीं. मी कांहीं पंढरीची वारी करीत नाहीं, आणखी माळाही पण माझ्या गळ्यांत नाहींत. या पंढरीच्या विठोबानें माझा नवरा वेडा केला आहे, आणखी आतांशा आम्ही वैकुंठाला जाणार ह्मणून सारखी बडबड करीत असतात. मला ह्मणतात तूं येतेस का बरोबर ? घरांत ह्मैस व्यायला झाली त्याची कांहीं यांना काळजी आहे का ? अहो इतकें कशाला ? प्रत्यक्ष यांचा मुलगा महादेव मुतखड्यानें अत्यवस्थ होता, पण हे आपले स्वस्थ. मग जेव्हां पोराची तंगडी धरून पोरगं फरफर ओढीत विठोबाचे देवळांत नेलें, आणि चांगला एका हातांत मोचा घेऊन त्याला मारण्याची जेव्हां भीति घातली तेव्हां त्या मुलाला लघ्वी होऊन तावडतोब गुण आला. पण त्याचा कांहीं यांना आनंद तरी आहे का ? यांना तुम्ही मराठ्यांची गादी स्थापन व्हावी ह्मणून प्रसाद कसला मागतां ? आणखी ही तुमची वेडी बायको मुलबाळ कसली मागते ? हे जर तुह्मांला राज्य मिळवून देते तर यांचीं बायकामुलें अन्नान्न करून उपाशीं कां मरतीं ? याचा तुम्हांला विचार नाहीं का ? या वेड्याच्या नादीं लागून तुह्मी सुद्धां बावचळलां होतां. रानांत निघून गेलां होतां. पण लवकरच आलांत शुद्धीवर. यांच्या नादीं लागूं नका. नाहीं तर यांच्यासारखे तावडतोब व्हाल.

**शिवाजी**–यांच्यासारखे आह्मी होऊं म्हणतां ? यांच्या नखाची आमच्यानें बरोबरी होणार नाहीं. यांच्या तुह्मी धर्मपत्नी आहांत. तस्मात् तुह्मी भाग्यवान् आहांत. मला माझ्या आईप्रमाणें आहांत.

महाराज धनद्रव्याला स्पर्शसुद्धां करीत नाहींत; नाहीं तर तुमच्या घरीं गजांतलक्ष्मी करून सोडली असती.

**सईबाई**–तुह्मी आमच्या घरीं चलानात आपल्या ? तुम्हांला मी आपल्या सासूबाईप्रमाणें समजेन. तुम्हांला कांहीं कमी पडावयाचें नाहीं. मी तुमची रात्रंदिवस सेवाचाकरी करीन.

**जिजाई**–एवढें मात्र बोलूं नका. हे जें खातील तेंच मी खाईन. यांना भोजन घातल्याशिवाय मीं अन्न खाल्लें नाहीं. मला दोन दोन दिवस उपाससुद्धां काढावे लागले आहेत. याला साक्ष माझ्या माहेरची मंगळाई आहे. आतां हे वैकुंठाला जाईन म्हणतात, तर मला रात्रंदिवस काळजी लागली आहे. म्हटलं बरोबर चार दिवसांच्या दशम्या घेऊन जा, तर हंसायाला लागतात. सांगतात कीं तूं वेडी आहेस. मी क्षीरसागरीं भगवान् शेषावर निजलेले आहेत तिकडे जाणार. आतां बाई काय करावं ? तो शेष म्हणजे मेली विखारी सापाची जात. तें किरडूं यांना चावलें बिवलें तर तिथं कांहीं भैरोबाचें देऊळसुद्धां नाहीं. यांना अगदीं वेड लागलें. वेडाच्या भरांत यांनीं दोन तीन गोष्टी अगदीं जगांत हंसूं होईल अशा केल्या. चिंचवडच्या मोरयागोसाव्याला हे म्हणाले कीं मुंगीहून मी लहान आहें आणि आकाशाहून थोर आहें. यांच्या भारंभार जर तराजूंत मुंग्या घातल्या तर कोट्यावधी भरतील. आभाळापेक्षां जर हे मोठे तर चांदोबाला का हात लावीत नाहींत ? बरं मी असें शहाणपणानें बोललें, तर मूर्खाप्रमाणें ते हंसूं लागतात. तें असो. पण तुह्मी मला येण्याविषयीं आग्रह करूं नका. हें पहा, तुपाच्या अंगीं जरी पाण्यापेक्षां अधिक गुण आहेत तरी त्यांत मासा राहूं शकत नाहीं.

**तुकाराम**–पुरे झाली तुझी बडबड. आपल्या घरीं शिवाजी आले आहेत त्यांना आपल्या घरांतून खायला एक भाकरी आणून दे. आणखी या बाईच्या ओटींत एक नारळ घाल.

**जिजाई**–आतां या बेअकलीपणाला करूं तरी काय ? एवढा

शिवाजीसारखा मनुष्य तुमच्याजवळ राज्य मागायला आला, आणि तुह्मी त्याच्या पदरांत भिकाऱ्यासारखी भाकर घालावयास मला सांगतां ! असेंच त्या चिंचवडच्या देवाला यांनीं आपली मांडीच चिरून दाखविली. चिंचवडकर देव म्हणतात यांच्या मांडींत कापूस भरलेला आहे. तेही यांच्यासारखे खुळेच आहेत. वाघ, सिंह यांना मारून त्यांच्या पोटांत पेंढा भरून ठेवतांना आपण ऐकतों, पण माणूस मेल्यावर त्याच्या पोटांत कापूस भरून ठेवतांना कोठें पाहिलें नाहीं. एकदां हे आळंदीला गेले, तेथें त्या मेल्या सोन्याच्या पिंपळाखालीं कांहीं पांखरें-राघू चिमण्या-दाणे टिपीत बसलीं होतीं. प्रदक्षिणा घालून हे जसे जवळ आले तशीं तीं भरकन् उडून गेलीं ! यांना वाटलें कीं, पांखरें मला काय म्हणून भ्यालीं ? झालें. बसले खुंटून सकाळपासून तों संध्याकाळपावेतों. पुढें तीं पांखरें जेव्हां यांच्या अंगावर येऊन बसूं लागलीं तेव्हां हे जाग्यावरून हलले. लोहगांवच्या शिवजी कासाराच्या बायकोनें तर यांच्या अंगावर अधणाचें कढत कढत पाणीच ओतलें, कां तर तिचा नवरा यांच्या भजनीं लागला ! पुढें तिला रक्तपिती भरली, आणखी यांच्या अंघोळीनें झालेला चिखल मलमाप्रमाणें तिला लावून ती बरी केली. देवीनें मेलेलें मूल एका बाईनें आणून यांच्या कीर्तनांत दिलें टाकून. तें म्हणे काय यांच्या भजनाच्या तडाक्यांत जीवंत झालें, आणि उठूनच बसलें. यांचे वेडेपणाचे मासले तुह्मांला जर सांगूं लागलें तर एक भारत होईल. ( जाते. )

( महादेव प्रवेश करतो. )

**शिवाजी**-महादेव, तूं येतोस का आमच्या घरीं राहण्याला ? तुला काय पाहिजे तें देऊं. हत्ती देऊं, घोडा देऊं, मोठा वाडा देऊं तुला रहावयास.

**महादेव**-महाराज, मी एक वेळ रस्त्यावर मोठी मजा पाहिली.

**शिवाजी**-कोणची रे ती ?

**महादेव**-एक लहान मूल चुकलें होतें तें साऱ्या रस्त्यानें रडत

फिरत होतें. त्याची आई लंगडी, आंधळी, कोळशासारखी काळी, अशी होती. हें मग आम्हांस पुढें समजलें. तें लहान मूल बोबड्या बोबड्या शब्दानें माझी आई कोठें गेली म्हणून विचारीत होतें. तें मूल ब्राम्हणाचें होतें, म्हणून पुष्कळ ब्राम्हणांच्या बायका रंभेसारख्या सुंदर आणि अंगावर लाखों रुपयांचे दागिने घातलेल्या त्या मुलास घेऊन जाऊं लागल्या; पण तें मूल कांहीं केल्यानें त्यांच्याकडे गेलें नाहीं. शेवटीं त्याची ती आंधळी आणखी पांगी आई बाळ्या बाळ्या करीत जेव्हां आली, तेव्हां तें तिच्याकडे झाप टाकून एकदम गेलें ! मग उभयतांना कितीपण आनंद झाला ह्मणून सांगूं ?

**सईबाई**—पाहिलें का याच्या बोलण्यांत किती खोल अर्थ उत्पन्न होत आहे तो ? हा कांहीं याचे आईबाप गरीब जरी आहेत तरी आपल्या घरीं द्रव्याच्या आशेनें म्हणून कधींच येणार नाहीं. मुलगा कोणाचा ?

**तुकाराम**—धर्माचीं तत्त्वें तरी अशींच आहेत. तुपाचा उपयोग जसा माशाला नाहीं, किंवा आपल्या आईला सोडून दुसऱ्या सुंदर स्त्रियांजवळ जसें तें बालक गेलें नाहीं, तसें स्वधर्म सोडून परधर्माचें अवलंबन करणें व्यर्थ होय. पाणी जसें माशाला जीवित किंवा मुलाला जशी आई प्रिय, तसा तुम्ही आपल्या धर्मावर विश्वास ठेवा; परमेश्वराला स्मरा, मग तुम्हांला तिळमात्र कमी पडणार नाहीं. तुम्हांला शेवट उपदेशाचे दोन शब्द सांगतों त्यांच्याकडे लक्ष द्या. ही मायानदी महा दुस्तर आहे. हिच्या वारंवार येणाऱ्या लोंढ्यांनीं सत्यलोकचे बुरुज कोसळतात. त्यांच्या धक्क्यांनीं ब्रह्मलोकचे धोंडे ढांसळून पडतात. ह्या पाण्याच्या वेगाला उतार म्हणून अजून झालेला नाहीं. हींतून तरून जाण्याकरितां जो जो ह्मणून उपाय करावा, तो तो अपायच होतो. कोणीं आपल्या बुद्धिरूप भुजबळाच्या जोरावर आंत उडी ठोकली, त्यांचा मागमूससुद्धां उरला नाहीं. कोणी ज्ञानडोहांत शिरले होते, त्यांस गर्वानेंच मिळून

टाकलें. कोणी वेदत्रयांच्या सांगडी करून, अहंभावाचे धोंडे कमरेस बांधले, ते सगळेच्या सगळेच मदमत्स्याच्या तोंडांत पडले. कोणी तारुण्याचें बळ बांधून मदनाचे कासेस लागले, ते विषयरूप सुसरीनें चावून त्यांचीं हाडें चूर करून टाकलीं. हिच्यामध्यें वैराग्याची नाव घालतां येत नाहीं. विचाराचा तागा लागत नाहीं. ह्या माया-नदींतून पार पडणें जिवावरचें आहे. कसें म्हणाल तर अपथ्य करणाराला जशी व्याधी, किंवा साधूला जशी दुर्जनाची बुद्धि, हीं जर कांहींच अपाय करणार नाहींत, किंवा घरीं चालून आलेली सिद्धि जर विषयलोभी टाकून देईल, चोराची जर सभा भरेल, अथवा मत्स्याला जर गळ गिळवेल, भित्र्याला जर भूत भिऊन पळेल, तर हे जीव मायेच्या पैलतीरास पोहोंचतील. सारांश, विषयी पुरुषाला ज्याप्रमाणें स्त्री जिंकवत नाहीं—म्हणजे तिचा शब्द मोडवत नाहीं-त्याप्रमाणें माया-नदी जीवांना तरवत नाहीं. जे सर्व भावेंकरून पांडुरंगाला भजतात, ज्यांच्यापुढें सद्गुरु हा नावाडी आहे, जे अनुभवाच्या घट्ट कासेला लागलेले आहेत, आणखी आत्मनिवेदनरूप गलबत ज्यांचे हातीं लागलें आहे, तेवढे मात्र ही नदी हां हां म्हणतां तरून जातात. असो; तुम्हांस राज्य प्राप्त झालें म्हणजे तुम्हीं इतकेंच पाहणें कीं, स्वधर्मत्याग करणाऱ्यास योग्य शासन करणें आणि धर्माप्रमाणें चालणाऱ्यांचें संरक्षण करणें. हें राजाचें मुख्य कर्तव्य आहे.

(जिजाई भाकर व नारळ प्रसाद म्हणून शिवाजीच्या व सईबाईच्या पदरांत टाकते. उभयतां तुकारामाच्या पायां पडतात. पडदा पडतो.)

---

## प्रवेश ६ वा.

**स्थळ**–देहू येथील नदीचा किनारा.

(नित्यानंद व सदानंद प्रवेश करितात.)

**नित्यानंद**–काय चमत्कार आहे हो! साऱ्या साऱ्या जन्मांत आपल्याला असा चमत्कार दिसला नाहीं.

**सदानंद**–मला सर्वांत आश्चर्य वाटतें तें हेंच कीं, तुकारामाचें कीर्तन ऐकल्याबरोबर आपल्या उभयतांचे वृत्तींत एकदम कसा फरक पडला? उभयतांची विचारसरणी एकदम कुंठित होऊन तुकारामाबरोबर काय बोलावें हें सुचेनासें झालें !

**नित्यानंद**–दादोजी कोंडदेव तरी अति दुराग्रही मनुष्य हो ! आपण वादांत हरलों असें पाहतांच तो आपली शिक्षा एकदम अमलांत आणूं लागला. मग मात्र माझ्या काळजानें ठाव सोडिला.

**सदानंद**–ह्मणजे हें कसें ? आपण जर दादोजीजवळ " एक तर तुकारामास आह्मी वादांत जिंकूं, नाहीं तर तो तरी आह्मास जिंकील, जो हरील त्यास गाढवावर बसवून त्याची धिंड काढावी " असें कबूल केलें होतें, तर मग दादोजी सर न्यायाधीश जें करीत होते तें न्यायाला धरूनच होतें. तुकारामानें आपल्याविषयीं त्यांच्याजवळ जर मध्यस्थी केली नसती, तर खरोखरच आपल्यास शिक्षा भोगणें प्राप्त होतें.

**नित्यानंद**–हेंच तुकारामाचें अत्यंत दयाभूतपणाचें लक्षण. आजपावेतों जो तुकारामाचा आम्हीं द्वेष केला, त्याचा मला आतां फार खेद वाटतो. अशा सत्पुरुषाची सेवा घडणें आपल्या प्रारब्धीं पाहिजे.

**सदानंद**–मलाही पण तुमच्यासारखेंच वाटूं लागलें आहे. आणि असाच विचार करून मीं मुद्दाम तुम्हास पुण्याहून येथें देहूस आणलें आहे. आतां येथें राहून आपण रामेश्वरभटजीबरोबर तुकाराममहाराजांची एकनिष्ठपणें सेवा करूं.

**नित्यानंद**–दादोजीपुढें तुकारामानें जेव्हां कीर्तनास आरंभ केला आणि जेव्हां कीर्तन ऐन रंगास आलें, नामस्मरणाचा जेव्हां कडाका उडाला, आणि सर्वांच्या अंतःकरणाची जेव्हां एकाग्रता झाली, तेव्हां त्या विठ्ठलनामाच्या जयघोषाचे भरांत मला तो तुकाराम केवळ श्रीदत्तात्रयस्वरूपी भासूं लागला. वादाला प्रवृत्त होण्याची माझी जिज्ञासा नष्ट झाली. मीं मनांत तेव्हांच निश्चय

केला कीं, जर या दादोजीचे तडाख्यांतून वांचलों तर या सत्पुरुषाची अनन्यभावें सेवा करावयाची.

**सदानंद**—चला तर आतां. आपल्या उभयतांचें एक मत झालें हें फार उत्तम झालें. ( जातात. तुकाराम भजन करीत येतो. रामेश्वरभटजी, मंबाजी, नित्यानंद, सदानंद, वगैरे सर्व मंडळी टाळमृदंग वाजवीत विठ्ठलनामाचा जयघोष करीत तुकारामावरोबर येतात. )

**तुकाराम**—

**कास घालोनी बळकट ॥ झालों कळिकाळासी नीट ॥**
**केली पायवाट ॥ भवसिंधूवरूनि ॥ १ ॥**
**यारे यारे लहानथोर ॥ याति भलते नारीनर ॥**
**करावा विचार ॥ नलगे चिंता कोणासी ॥ २ ॥**
**कामीं गुंतले रिकामे ॥ जपी तपी येथें जमे ॥**
**लाविले दमामे ॥ मुक्त आणि मुमुक्षा ॥ ३ ॥**
**एकंदर शिका ॥ पाठविला इहलोका ॥**
**आलों ह्मणे तुका ॥ मी नामाचा धारक ॥४ ॥**

अहो भाविक जनहो, मी शेवटीं काय सांगतों तें चित्त देऊन ऐका. तुह्मी निरनिराळीं मतमतांतरें शोधीत बसाल तर तुम्हांस खऱ्या देवाचा उकल कधींच पडणार नाहीं. तुमचें अल्प आयुष्य तावडतोव आणखी व्यर्थ निघून जाईल. एक पांडुरंगाचे नामावर विश्वास ठेवून त्याचेंच स्मरण करा. विनाकारण कुतर्क काढून वाद घेणाऱ्या लोकांची संगति सोडून द्या. कलियुगीं आणि त्यांतही मृत्युलोकीं नामस्मरणासारखा सोपा मार्ग नाहीं. वैष्णव वीरांचा हा नामस्मरणाचा अथवा कीर्तनाचा सोहळा पाहून, त्यांचा टाळमृदंगाचा आणि पताकांचा थाट पाहून, कलिकाळांची वाट बंद पडली. हें सुख पाहून ब्रह्मादिकांचे तोंडाला पाणी सुटलें. ते म्हणतात, मृत्युलोक धन्य धन्य आहे! काशींत मृत्यु आल्यानंतर मुक्ति. गयेस जाऊन विष्णुपदावर पिंड पडल्यावर पितर मुक्त होतात. पण इतकें उधारखातें पंढरीस नाहीं. पंढरीचे

वाटेनें नामस्मरणाचे योगानें पावलोपावलीं यज्ञ केल्याचें पुण्य. " मुखीं नाम हातीं मोक्ष ऐसी साक्ष बहुतांसी." ज्यांचे दोषाला परिहार नाहीं, ज्यांच्या दोषाला शास्त्रांत प्रायश्चित्त नाहीं, त्यांनीं पंढरीस जावें, म्हणजे ते दोषमुक्त होतील. जर तुह्मांस जन्मास आल्याचें सार्थक करावयाचें असेल तर एक वेळ तरी पंढरीस जा. जें श्रीविष्णूचें नगर, जेथील नरनारी चतुर्भुज, जेथें सुदर्शन चरटी करीत आहे, आणि जेथें काळाची गति कुंठित झाली आहे, अशा स्थलाचें वर्णन करायला माझी मंद मति चालत नाहीं. ज्याला माझ्या भाषणाची सत्यता वाटत नसेल, ज्याचा माझ्या बोलण्यावर विश्वास नसेल, तो जन्मांतरीचा अधम आहे असें समजावें. नामस्मरणाचे योगानें मी आपली काया ब्रम्हभूत करितों, इतकेंच नाहीं; पण

**घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्याहातीं ॥ मुक्तां आत्मस्थिति सांडवीन ॥ १ ॥ ब्रह्मभूत होते कायाच कीर्तनीं ॥ भाग्य तरी ऋणी देव ऐसा ॥ २ ॥ तीर्थभ्रामकासी आणीन आळस ॥ कडु स्वर्गवास करिन भोग ॥ ३ ॥ सांडवीन तपोनिधा अभिमान ॥ यज्ञ आणि दान लाजवीन ॥ ४ ॥ भक्ति भाग्य प्रेमा साधीन पुरुषार्थ ॥ ब्रह्मींचा जो अर्थ निज ठेवा ॥ ५ ॥ धन्य ह्मणवीन इह लोकीं लोकां ॥ भाग्य आह्मीं तुका देखियेला ॥ ६ ॥**

आजपावेतों शेकडों लोकांनीं माझी निंदा केली आणि शेकडों लोकांनीं माझी स्तुति केली; कित्येकांनीं माझी पूजा केली आणि कित्येकांनीं मला मारिलें; नाहीं नाहीं ती माझी भंडाई झाली; पण मला या सर्व गोष्टींपासून आनंदही नाहीं आणि दुःखही नाहीं. मी दोहोंपासून वेगळा. ॥ अवघे पावे नारायणीं । जनार्दनीं तुक्याचें ॥

तुम्हांस संतपणा पाहिजे असल्यास तो कांहीं बाजारांत धनाच्या राशी ओतल्या तरी मिळणार नाहीं, स्वर्गांत मिळणार नाहीं,

आणि पाताळांत मिळणार नाहीं. तुम्हांस जगाचे आघात सोसले पाहिजेत, वन-पट्टण एक भास झाला पाहिजे, सुखदुःखाची आठवण न ठेवितां आनंदानें आणि कौतुकानें नाचलें पाहिजे-जोंपावतों तुम्हाला मागची आशा सुटत नाहीं, तोंपावेतों या संतपणाच्या नादीं लागूं नका. उघडच आहे कीं, जर कुलस्त्रीला व्यभिचार कर्तव्य असेल तर तिनें तळहातावरच शीर घेतलें पाहिजे. तसें हें संतपण आहे. आपल्या हातानें संसाराला आग लाविली पाहिजे. पतंगाप्रमाणें धीट होऊन दिव्यावर झडप घातली पाहिजे.

## अभंग.

**रज्जुसर्पाकार ॥ भासयेलें जगडंबर ॥ १ ॥**
**म्हणोनि आठवती पाय ॥ घेतों आला बलाय ॥ २ ॥**
**दृश्य द्रुमाकारलाणी ॥ केलों सर्वस्वासी धणी ॥ ३ ॥**
**तुकीं तुकला तुका ॥ विश्वीं भरोनी उरला लोकां ॥४॥**

( कंठ भरून येऊन ) येतों मी आतां. तुम्ही सर्वांनीं माझी बोळवण केलीत याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. तुमचें कल्याण होवो. फार वेळ झाला. पांडुरंग माझी वाट पहात उभा आहे. श्रीविठ्ठल मला वैकुंठाला नेण्याकरितां स्वतः आले आहेत. अंतकाळीं मला विठ्ठल पावला. येतों मी आतां. तुमचे वाडवडिलांस या बालकाचा नमस्कार सांगा. त्यांना सांगा कीं आतां मी परत येणार नाहीं. मजकडून जर तुमचा कांहीं चुकून अपराध झाला असेल, कठोर शब्दानें जर मीं कोणाचें मन दुखवलें असेल, न कळून कोणाचा अपमान केला असेल, तर त्याची मला क्षमा करा. माझी आठवण ठेवा. या तुमच्या तुकारामाला विसरूं नका.

सुजनहो, आज रोजीं या जन्ममरणाचें सुतक फेडून टाकतों. वैराग्याच्या शेणी शरीराला लावून ब्रम्हाग्नी चेतवून ब्रम्हत्वाला मिळून जातों. छत्तीस तत्त्वांचें बनलेलें जें शरीर त्याचा घट आज पांडुरंगाच्या चरणावर फोडून हरिहराच्या नांवानें बोंब मारून

मोकळा होतों. जाती, कूळ, नाम, रूप, यांना आज तिळांजळी देतों. त्याचें शरीर त्याला अर्पण करून टाकतों. सर्व कर्मांचा आज घटस्फोट करून टाकतों. सव्यापसव्य आजपासून बंद करतों. आपल्या हातांनीं पांडुरंगाच्या पायावर पिंड देऊन पितरांच्या ऋणांतून मोकळा होतों. सर्व जग विष्णुमय झालें. जनीं जनार्दन अभेद झाला. आनंदी आनंद झाला. पांडुरंगरूपी दीप सर्व शरीरांत प्रकाशमान झाला.

**अभंग**

**तुका उतरला तुकीं ॥ नवल झालें तिहीं ॥ १ ॥**
**नित्य करितों कीर्तन ॥ हेंचि माझें अनुष्ठान ॥ २ ॥**
**तुका बैसला विमानीं ॥ संत पाहाती लोचनीं ॥ ३ ॥**
**देव भावाचा भुकेला ॥ तुका वैकुंठासी नेला. ॥ ४ ॥**

**॥ २ ॥**

**डोळां भरिलें रूप ॥ चित्ता पायांपें संकल्प ॥ १ ॥**
**अवघी घातली वांटणी ॥ प्रेम राहिलें कीर्तनीं ॥ २ ॥**
**वाचा केली माप ॥ राशीं हरिनाम अमुप ॥ ३ ॥**
**भरूनियां भाग ॥ तुका बैसला पांडुरंग ॥ ४ ॥**

( तुकारामाचा दिव्य प्रकाश पडतो. सर्वांची तंद्रि लागते. सर्व डोळे झांकतात. तुकाराम विमानांत बसून वैकुंठास जातो. )

**अंक पांचवा समाप्त.**

**समाप्त.**

# पुरवणी.

( पान ५३ वरून पुढें चालू. )

## अंक २ रा. प्रवेश ४ था.

**स्थळ**-वाघोली येथील रामेश्वरभटाचें घर.

( तुकाराम प्रवेश करितो. )

**तुकाराम**-( एकीकडे ) आलोंच आपण वाघोली गांवांत. रामेश्वरमहाराजांचें हेंच घर. वाघोलीचे पाटलानें देहूचे पाटलास अशी ताकीद-चिटी पाठविली आहे कीं, तुकाराम रामेश्वरभटजींस शरण आल्यास बरें, नाहींतर त्याजला देहूंतून हाकून द्यावें. ब्राह्मणाला शरण जाण्यास हा तुकाराम एका पायावर तयार आहे-( रामेश्वरभट, मंबाजी गोसावी, व दोन संन्यासी प्रवेश करितात, तुकाराम त्यांना नमस्कार करितो. )

**रामेश्वर**-कायरे तुकाराम, तुला देहूच्या पाटलानें ताकीदपत्र दिलें किंवा नाहीं ?

**तुकाराम**-होय महाराज, दिलें. ह्मणूनच आपल्या चरणाचें दर्शन घेण्याकरितां आलों. आपण सर्व वर्णांत श्रेष्ठ, मंत्रविद्येचें माहेरघर, तपश्चर्येची केवळ मूर्ति, सर्व तीर्थांचें आदिदैवत, वेदांचे केवळ कवच, समुद्राचें आचमन करणारे, आपली चरणमुद्रा प्रत्यक्ष भगवान आपल्या वक्षस्थळावर भूषण ह्मणून धारण करितात, असे आपण परमपूज्य आहांत, तेथें हा तुकाराम आपली आज्ञा कशी मोडणार ? देहूच्या पाटलानें मला आपली भेट घेऊन देहूंत राहण्याची परवानगी घेऊन ये ह्मणून ताकीद केली आहे.

**मंबाजी**-आतां कसा मऊ आला. हेंच जर आह्मीं सांगितलें असतें तर आला असता का साधूबोवा ? आज कोठें, गेले भामानाथावर, आज कोठें, गेले पंढरीला, गेले आळंदीला. पाटला-

कडून जेव्हां कान पिळले गेले तेव्हां आले आतां शुद्धीवर. सोनाराकडून कान टोंचला गेला पाहिजे.

**सदानंद**–यावेळीं यानें तर ब्राह्मणांची स्तुतिच केली. बाकी आह्मी ब्राम्हण तसेच आहोंत. कांहीं कमी नाहीं. ;याला आतां चांगली शिक्षा झाली पाहिजे.

**नित्यानंद**–आतां स्तुति केली यांत कांहीं अर्थ नाहीं. ती खरी नव्हे. देहूच्या पाटलानें गांवांतून हाकून दिला ह्मणून ही स्तुति आहे. आजपावेतों रामेश्वरमहाराजांचे दर्शनास नाहीं कधीं आलांत !

**रामेश्वर**–कायरे तुकाराम, तूं कीर्तन करतोस, कवित्व करतोस, तुझ्या कवितेंत श्रुतिस्मृतीचे अर्थ उमटतात. तूं जातीचा शूद्र, तुला वेदोक्त मार्गाचा अधिकार नाहीं. तुझें करणें शास्त्रविरुद्ध आहे. तूं आणखी तुझें कीर्तन ऐकणारे श्रोते उभयतां नरकांत जाल.

**तुकाराम**–हे दोन्ही यतिमहाराज आमचें कीर्तन ऐकावयास आले होते, यांना तरी नरकयातना देऊं नका.

**नित्यानंद**–कर्ममार्गाचा उच्छेद करण्यास प्रवृत्त झालांत काय ! नाममहात्म्य प्रतिपादन करून भोळ्या भाविक जनांला भ्रष्ट करीत असतां काय ?

**सदानंद**–कितीएक लोक जातीचे ब्राम्हण, परंतु या तुकारामाच्या जे आहेत ते पायां पडतात. हा कांहीं त्यांना नको म्हणत नाहीं. आम्हीं लोहोगांवीं हा कीर्तन करीत असतां प्रत्यक्ष पाहिलें.

**मंबाजी**–आतां ब्राह्मण पायां पडायाला लागले तर शूद्रांचें बरेंच झालें. निदान तुकोबाचें तरी बरेंच झालें आहे. तुकोबा आतां ब्राह्मण बनत चालला आहे. कांदे लसूण उघड उघड खात नाहीं. ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगतो, मुद्रा लावतो, माळा घालतो, आमच्या देहूस नुसतें बंड माजविलें आहे. जो उठतो तो तुकाराम तुकाराम करतो. आणखी मी मंबाजी बसलों कोकलत

**रामेश्वर**–जातीचा कुणबट, ज्ञानशून्य असतां उगीच पाखांड मत माजविलें आहे काय ? आतां देहूचा पाटील गांवांत तुला कोणाला भिक्षा तरी घालून देईल काय ?

**तुकाराम**–म्हणूनच आपल्याला मी शरण आलों आहें. देहूंत राहण्याकरितां नव्हे, पण आपण ब्राह्मण आहांत म्हणून. आतां महाराजांची काय आज्ञा आहे ?

**रामेश्वर**–आजपासून तूं कवित्व करूं नये अशी आमची तुला आज्ञा आहे. (तुकाराम हंसतो.) दांत काढायला काय झालें ? तुला थट्टा वाटली काय ?

**तुकाराम**–आपण अपरसूर्य ब्राम्हण आज्ञा करितां त्यापेक्षां आजपासून कवित्व करणें सोडून देतों. परंतु आजपावेतों ज्या कविता केल्या आहेत त्यांची काय वाट ? श्रीपांडुरंगानें स्वप्नांत येऊन आज्ञा केल्यावरून आजपावेतों कांहीं तरी कवितारूपानें वडवड केली. ( सचिंत उभा रहातो. )

**मंबाजी**–हें सांगण्याची कांहीं गरज होतीका ? पण लोकाला दिसलें पाहिजे कीं, हाच कायतो पांडुरंगाचा भक्त ! पांडुरंग याच्या स्वप्नांत येत असतो. हे मोठे साधुच पडले कीं नाहीं ! माझ्या नाहीं स्वप्नांत पांडुरंग येत तो ? प्रत्यक्ष रामेश्वरमहाराज त्यांच्या सुद्धां स्वप्नांत पांडुरंग येऊन कांहीं चमत्कार दाखवीत नाहीं. इतकें कशाला ? याचे अभंग आपण आतां नाहींसे करणार आहांत, मग पांडुरंगानें यावें कीं नाहीं आपले स्वप्नांत ? अहो, सगळ्या थापा. त्याखेरीज याचें ढोंग माजणार कसें ? बरें तें असो (रामेश्वरास व दोघां संन्याशांस एका बाजूला करून) काय, आतां केलेल्या अभंगांच्या वह्यांचें काय करितां ?

**नित्यानंद**–मला वाटतें जाळून टाकाव्यात.

**सदानंद**–जाळूं नयेत. त्यांत श्रुतीचे अर्थ आहेत. पुरून टाकाव्यात.

**मंबाजी**–मला वाटतें यानें हातकलम करून द्यावा, पुढें अभंग

करणार नाहीं अशी पांडुरंगाची शपथ घ्यावी. मग रामेश्वरमहाराजांना जसें वाटत असेल त्याच्याबाहेर आह्मी नाहीं.

**रामेश्वर**–बस्स. हेंच करावयाचें. तुकाराम, ज्याप्रमाणें जैमिनीनें केलेलें भारत व्यासानें बुडवून टाकलें, अथवा श्री शंकराचार्यांनीं ज्याप्रमाणें जैनमताच्या ग्रंथांना जलसमाधी दिली, त्याप्रमाणें आम्ही तुझे आजपावेतों केलेले सर्व ग्रंथ पाण्यांत बुडवून टाकणार. तुझ्या अभंगांच्या वह्यांचें एक गांठोडें कर. त्याच्यावर वर आणि खालीं चांगल्या मोठाल्या दगडी चिपा घालून त्या इंद्रायणीच्या डोहांत बुडवून टाकल्याबद्दल देहूचे पाटलाचा आह्मांला दाखला आणून दाखीव.

**मंबाजी**- ठीक, ठीक. उत्तम आहे.

**तुकाराम**–पण महाराज जैमिनीच्या कवितेंत एक अश्वमेध ग्रंथ व्यासानें राखिला. जैनमतांचे ग्रंथांत आचार्यांनीं अमरकोश ठेविलेला आहे.

**मंबाजी**–गुलामाची माहिती बघा कशी आहे ती. जातीचा शूद्र पण माहितीनें आम्हा ब्राह्मणांना खालीं पहायला लावील. खरोखर मला सुद्धां आजपावेतों माहीत नव्हतें कीं व्यासानें कोणता ग्रंथ राखला, आणखी श्रीशंकराचार्यांनीं कोणता ग्रंथ राखला !

**रामेश्वर**–तुकाराम, तुझें म्हणणें काय आहे यावर ?

**तुकाराम**–विनंति म्हणून इतकीच कीं, श्रीकृष्णाची बाळक्रीडा आणि नाटाचे अभंग एवढीं दोन प्रकरणें राखण्याची आज्ञा व्हावी.

**रामेश्वर**–तें कांहीं होणार नाहीं. सर्व ग्रंथ इंद्रायणीचे डोहांत बुडवून टाकावे अशीच आमची आज्ञा आहे. चला आतां आपण पुण्यास नागनाथाचे दर्शनास जाऊं.

( तुकारामाशिवाय सर्व जातात. )

**तुकाराम**–ॐ तत्सदिति सूत्राचें सार । कृपेचा सागर पांडुरंग ॥१॥
हरिः ॐ सहित उदत्त अनुदत्त । प्रचुरीश्वरासहित पांडुरंग ॥२॥

गोत्राम्हणहिता होऊनि निराळे । वेदाचें तें मूळ तुका म्हण
अशा पांडुरंगाच्या नामाला हे ब्राह्मण वाईट ह्मणतात. असे
म्हणांला तरी त्यानेंच बुद्धि दिली ह्मणायची. संन्याशाचें
वाटेल त्याला साधतां येईल, परंतु विवेकाचें अंग कसें दा
येणार ? पांडुरंगाची आपल्यास अशी आज्ञा आहे कीं,
पावेतों केलेले अभंग इंद्रायणींत नेऊन बुडवावे. त्याप्रमाणें
वरीं जाऊन प्रथम हें काम केलें पाहिजे. परंतु पांडुरंगा तुझ
चून आणखी कोणाचें वर्णन त्या अभंगांत केलें असेल तर
जीभ झडून जावो. तुझ्याखेरीज इतरांवर स्त्रीपुत्रांवर बरा
अथवा द्रव्यावर जर मनें करून आवड धरली असेल, तर ह
झ्या शरीराचे शतशः तुकडे तुकडे होवोत. तुझ्याखेरीज
इतराला अवलोकन केलें असेल तर, या नेत्राच्या खाची हो
आणखी या कानांनीं तुझ्या नामामृताचें श्रवण केलें नसेल
जन्माचा बधिर होऊन जावो. असो, ब्राह्मणाची आज्ञा तीच
आज्ञा असें मी समजतों, आणि आज्ञेप्रमाणें वह्या पाण्यांत बु
टाकतों. ( झपाट्यानें निघून जातो. )

[ अंक दुसरा समाप्त ]

॥३॥
त्रा-
सोंग
वितां
आज
ातां
वां-
ाझी
ावर
मा-
ानें
ति.
मी
ुझी
वून

B
/28